| | | एकूण | | | 1,32,948 |

उपरोक्त तक्त्यामधील घनकचरा वाहतुकीसंदर्भात कंत्राटदाराने देयकासोबत पुरविलेल्या वजनापैकी अतिरिक्त वजनाचा नमुनेदाखल 01.02.2015 ते 15.02.2015 या प्रथम पंधरा दिवसांचा तपशील नमूद असून त्यानुसार या कालावधीत रु. 1,32,948/- चे अतिप्रदान झाले आहे असे दिसते. या सरासरीने संपूर्ण वर्षात पुढीलप्रमाणे अतिप्रदान झाल्याची शक्यता आहे.

1) अतिप्रदानाच्या परीगणनेचा नमुनादाखल कालावधी - 01.02.2015 ते 15.02.2015 (15 दिवस)

2) वरील क्र. 1 वरील निदर्शनास आलेले अतिप्रदान - रु. 1,32,948 /- म्हणजे रु. 1,30,000/- अंदाजे.

3) वरील दराने 30 दिवसांत संभाव्य अतिप्रदान - रु. 1.30 लक्ष x 2 = रु. 2.60 लक्ष

4) 2014-15 या वर्षातील संभाव्य अतिप्रदान - रु. 2.60 x 12 = रु. 31.2 लक्ष

मनपा ने विविध प्रमाणकान्वये वरील खर्चाचे प्रदान केले असून प्रमाणक क्र. 1924, दि. 26.03.2015 रु. 22,00,330/- च्या तपासणीत नोव्हेंबर 2014 महिन्यातील प्रथम पंधरा दिवसात रु. 1.30 लाख एवढे अतिप्रदान आढळून आले. सबब मनपा प्रशासनाने वर्षभरातील संपूर्ण प्रदानांची वरील पद्धतीने झालेले अतिप्रदान निर्धारित करून वसुलीसह मानणा



Scanned by CamScanner

निधीत जमा करावी.

मोटर वाहन कायदा 1988 नुसार सुरक्षित वाहतूक व नागरिकांची सुरक्षा या दृष्टीने वाहनातून अतिरिक्त वजन (Overload) वाहून नेणे यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. व त्यासाठी दंडात्मक कार्यवाही विहित कायद्यात झाली आहे. त्यामुळे कायद्याचे उल्लंघन करून वाहतूक केल्याचे दर्शविलेल्या अतिरिक्त वजनासाठी केलेले रकमेचे प्रदान सुद्धा नियमबाह्य व वसूलपात्र ठरते.

या संदर्भात अर्धसमास पत्र क्र. 81 दि. 20/06/2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून कोणतेही समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 5, Hmm No : 81)

***5 सदोष पद्धतीने दर मंजूर करणे व सेवाकरापासून सूट प्राप्त असतांना त्याचे कंत्राटदारास प्रदान केल्यामुळे रु. 120048/- चे अतिप्रदान होण्याबाबत.***

घनकचरा

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :188 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1093100.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 973052.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 120048.00/-

| |
|---|
| ***केंद्र शासनाच्या दि.20/06/2012 च्या अधिसूचनेनुसार सेवा करापासून सूट प्राप्त असताना सेवाकराच्या रकमेसह निविदा मंजूर केल्यामुळे रु.120048/- या रकमेचे कंत्राटदारास अतिप्रदान झाले आहे.*** |

अ. 1) मनपाने मोठे नाले सफाई करणे, कचरा सपाटीकरण करून घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी रस्ते मोकळे करणे, गणेश मूर्ती विसर्जनासाठी इरई नदी जवळ खड्डे करणे इ. सार्वजनिक आरोग्य व घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित कामासाठी सन 2014-2015 या वर्षासाठी मे.के.एम.परमार चंद्रपूर यांची चौथी वेळ निविदा सुचनेनंतर प्राप्त झालेली एकमेव निविदा वाटाघाटीनंतर 9.50% अधिक दराने मंजूर करण्यात आली. वर्तमानपत्रातील चारही वेळा प्रसिध्द केलेल्या जाहिरात सूचनेमध्ये सदर कामाचा प्राकलीत दर (रु.2512 प्रती तास) हा नमूद करण्यात आल्यामुळे पारदर्शकतेच्या अभावामुळे इच्छुक स्पर्धकांनी निविदा भरल्या नसाव्या. एकमेव कंत्राटदारास वाटाघाटी नंतर त्यांच्या इच्छेप्रमाणे प्राकलित दरापेक्षा 9.50% अधिक दराने स्थायी समितीचे ठराव क्र.26 दि. 07/06/2014 अन्वये कंत्राट द्यावे लागले किंवा मोघम जाहिरात सुचनेमुळे कंत्राटदारास ज्यादा दरासाठी अनावश्यक मुभा द्यावी लागली असे म्हणता येईल.



Scanned by CamScanner

2) कंत्राटदारास मान्य केलेला दर पुढीलप्रमाणे आहे-

1. रू.2447 + रू.305 (12.36% सेवाकर) = रू.2750/- प्रति तास (सेवाकरासह) – सलग 10 दिवसांपेक्षा अधिक काम असल्यास सदर दर लागू

2. रू.2900 + रू.358 (12.36% सेवाकर) = रू.3258/- प्रति तास (सेवाकरासह) - सलग 10 दिवसांपेक्षा कमी काम असल्यास सदर दर लागू

सदरचे कंत्राट संपूर्ण आर्थिक वर्षासाठी व प्रतितासाप्रमाणे मंजूर असताना सलग 10 दिवसांपेक्षा कमी/अधिक ही कंत्राटदाराची अट मान्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.

3) प्रचलित बाजारभावाप्रमाणे मंजूर दरापेक्षा कमी दराने पोकलेन मशिन उपलब्ध झाल्यास ती लावण्यात येईल असे करारनाम्यात उल्लेखित आहे. परंतु प्रचलित बाजारभावाचे निरिक्षण करण्यात आल्याचे दिसत नाही. त्यामुळे मनपा प्रशासनच मनपा निधीतील अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी करारनाम्यातील अटी/शर्तींचे पालन करण्यास अनुकूल नाही असे लक्षात येते.

ब. 1) भारत सरकारचे वित्त मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचना क्र.25/2012 सर्विस टॅक्स, नवी दिल्ली दि.20.06.2012 मधील परिच्छेद क्र.25 नुसार व्यापक जनहितासाठी पुढील सेवेस सेवाकरापासून सूट प्रदान करण्यात आली आहे.

"Service provided to government, a local authority, or a government authority by way of- Carrying out any activity in relation to any function ordinarily entrusted to a municipality in relation to water supply, public health, sanitation conservation, solid water management or slum improvement and up gradation."

कंत्राटाचे प्रयोजन (सेवा) सार्वजनिक आरोग्य व घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित असून केंद्र शासनाच्या वरील अधिसूचनेनुसार सेवाकरापासून सुटीस पात्र आहे. असे असताना मनपाने 12.36% सेवाकरासह कामाचे दर मंजूर केल्यामुळे कंत्राटदारास पुढीलप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

| अ.क्र. | प्रमाणकाचा तपशील (खाते - I.BT) | | | सेवाकराच्या प्रदानाचा तपशील | अतिप्रदान |
|---|---|---|---|---|---|
| | क्र. | दिनांक | रक्कम | | |
| 1 | 11 | 27/11/2014 | रु.52135 | रु.358 * 16 तास | रु.5728 |
| 2 | 12 | 27/11/2014 | रु.128057 | रु.358 * 39.30तास | रु.14069 |
| 3 | 13 | 27/11/2014 | रु.78202 | रु.358 * 24 तास | रु.8592 |
| 4 | 14 | 27/11/2014 | रु.61910 | रु.358 * 19 तास | रु.6802 |



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | 15 | 27/11/2014 | रु.668526 | रु.302 * 243.05 तास | रु.73401 |
| 6 | 16 | 27/11/2014 | रु.104270 | रु.358 * 32 तास | रु.11456 |
| एकूण | | | रु.1093100 | एकूण | रु.120048 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली एकूण रक्कम रु.120048 सेवाकराचे नावाखाली कंत्राटदारास सूट प्राप्त असल्यामुळे केंद्र शासनाकडे जमा करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्यामुळे ती वसूलपात्र आहे. संबंधिताकडून वसुली करून मनपा निधीत जमा करावी.

2) यापमाणे मनपाने इतर प्रकरणातील अनावश्यक सेवाकराचे प्रदान आढळत असल्यास त्याची तपासणी करून वसुलीची कार्यवाही करून तसे अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 7, Hmm No : 110)

## *6 रस्ता बांधकाम सल्लागाराच्या मानधनावरील अनावश्यक व निरर्थक खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2330005.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2330005.00/-

*मनपाने रस्ता बांधकामातील निरीक्षण, देयके तयार करणे, काम पूर्ण झाल्याचा अहवाल देणे इत्यादी कामांसाठी खाजगी सल्लागार संस्था नियुक्त केल्या. परंतु कंत्राटदाराने अंदाजपत्रकाप्रमाणे काम न करता कोणाच्याही सक्षम मंजुरीशिवाय मोठ्या प्रमाणावर वाढीव व अतिरिक्त कामे केली असतांना बांधकाम सल्लागाराने अंदाजपत्रकाप्रमाणे कामे केल्याचे चुकीचे प्रमाणित केले. याशिवाय सल्लागाराचे साईट सुपरव्हिजन केल्याचे उपस्थिती पत्र इत्यादी कोणतेही लेखी पुरावे उपलब्ध नाही, असे असतांना संबंधिताना 2014-15 या वर्षात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार रुपये 23,30,005/- चे अनावश्यक व निरर्थक प्रदान करण्यात आले आहे.*

मनपा अंतर्गत विविध शासकीय अनुदानातून रस्ते बांधकामासाठी मे. कावरे अँड जवादे प्रोजेक्ट प्रा.लि., नागपूर व मे. मुकेश इन्फ्रास्ट्रक्चर, नागपूर या दोन बांधकाम सल्लागार संस्थांची सल्लागार पॅनलवर स्थायी



Scanned by CamScanner

समितीच्या दि. 21/04/2014 च्या ठरावानुसार नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना बांधकामाच्या देयकातून अनुदानातून बांधकाम मूल्याच्या 1% प्रमाणे सन 2014-15 मध्ये रु. 23,30,005/- चे प्रदान करण्यात आले.

सदर सल्लागारांना पुढील कामे सोपविण्यात आली.

1) साईट सुपर व्हिजन

2) बिल/देयक बनविणे

3) काम पूर्ण झाल्याचा अहवाल, मोजमापे तपशील इत्यादी हार्ड डिस्क व सॉफ्ट कॉपीमध्ये देणे.

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत -

1) उपरोक्त मानधनावरील खर्च राज्य शासनाच्या निधीतून करण्यात आला आहे. वास्तविक शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेल्या मूळ प्रस्तावात सदर बाबीचा उल्लेख नाही. अर्थात सदर बाब प्रशासकीयरित्या शासनाने मंजूर केलेली नसल्याने रु.23,30,005/- रक्कम शासनखात्यात चलनाद्वारे जमा करण्यात यावी.

2) नस्त्यांच्या लेखापरिक्षणात सल्लागारांनी नियमित साईटचे निरीक्षण केल्याचे लेखी स्वरुपात कोठेही आढळले नाही. कंत्राटदाराने अंदाजपत्रकातील काही बाबीवर विहित परीमाणापेक्षा प्रचंड जास्त कामे करुन काही बाबींचे कार्यान्वयन शून्य टक्के केले असतांनासुद्धा सल्लागाराने पुढील चुकीचे प्रमाणपत्र देवून प्रदानाची शिफारस केली.("----------------work has progressed as per specifications specified in Estimate and drawing ")

उदा. अतिवृष्टींमुळे नुकसानीचे पायाभूत सुविधा विकास योजनेतील रु. 11.50 कोटी मूल्याच्या एकूण 12 कामांचे सुपर व्हिजन इत्यादीचे काम मे. कावरे अँड जनादे प्रोजेक्ट प्रा.लि. यांना देण्यात आले. त्याचे खर्च लेखापरीक्षण करतांना वर उल्लेखित त्रुट्या आढळून आल्या.

3) वरील संबंधित कामांच्या मोजमाप पुस्तिकांमध्ये मोजमाप कोणी व केव्हा नोंदविले याचा स्पष्ट दिनांक, नाव व पदनामासह उल्लेख नाही. मोजमाप पुस्तीकेमधील तसेच कामाच्या प्रगतीप्रमाणे वेळोवेळी नोंद न घेता एकाच वेळी एकत्रितपणे नोंदविण्यात आलेल्या मोजमापाच्या पत्रकावरील ( Measurement sheet) सल्लागाराकडील अदिनांकित स्वाक्षरी, कंत्राटदाराने केलेली अतिरिक्त कामे सल्लागाराने मनपाच्या निदर्शनास न आणणे, कोट्यावधीच्या कामावरील निरीक्षणासाठी सल्लागाराकडील तांत्रिकदृष्ट्या सक्षम अभियंता साईटवर उपलब्ध असल्याचे कोणतेही पुरावे व नोंदी नसणे किंवा तसे प्रमाणितही नसणे यावरुन सल्लागारास मोघम व बेजबाबदारपणे केलेल्या कामासाठी सन 2014-15 या एकाच वर्षात रु.23.30 लाख एवढे प्रचंड प्रदान करण्यात आले. सदरचा अनावश्यक खर्च तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

4) राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय, खाक्षेरा-1095/प्र.क्र.216/रस्ते-8, दि.11/12/1997 चे परिशिष्ट व मध्ये मासिक मानधन तत्वावर (man monthly rates) विशिष्ट परिस्थितीत



Scanned by CamScanner

सल्लागार सेवेसाठी तज्ञ व्यक्तींची निवड करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

1. Specialist (Advisor & Expert) (Grade-Technical Director) रु.40,000/-

2. Senior Consultant (Grade-Technical Manager) रु.25000/-

3. Junior Consultant रु. 10,000/-

4. Supervisor, Draftman, Surveyor etc. रु. 5,000/-

मनपाने काटकसरीच्या दृष्टीकोनातून मोघमपणे काम करणाऱ्या बांधकाम सल्लागारांना वरीलप्रमाणे अवास्तव खर्च न करता कंत्राटी स्वरुपात मासीक ठराविक रकमेच्या मानधनावर अनुभवी अभियंताना नियुक्त केल्यास मनपाच्या लाखो रुपयाच्या महसुलाची बचत करता आली असती, असे लेखापरीक्षणाचे मत आहे. रुपये 23.30 लाख एवढी रक्कम खर्चून जी कामे करण्यात आल्याचे दर्शविण्यात आले ती कामे वरील रु.5,000/- ते 40,000/- प्रतिमहिना या दराने तज्ञ व्यक्तींची निवड करून सोपविण्यात आली असती तर मोठ्या प्रमाणावर बचत होऊ शकली असती.

यासंदर्भात जारी करण्यात आलेल्या अर्धसमास पत्र क्र. 88 दि. 02/07/2016 वरील अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DATABWM6901 (Ref No : 6, Hmm No : 88)

***7 प्रशासकीय व तांत्रिकदृष्टया मंजूर अंदाजपत्रकीय मुल्याच्या तुलनेत 48% मुल्याएवढी रु. 25.73 लक्ष रक्कम अनावश्यक वाढीव काम नोंदवून खर्च करुन शासन निधीचा गैरवापर करणेबाबत.***

**पायाभूत सुविधा विकास योजना (2014-15)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :358 शासन/मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5819492.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3245958.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2573534.00/-

| |
|---|
| *अस्तित्वात असलेल्या रस्त्याचे रुंदीकरणासह खडीकरण व संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरणाच्या मुळ प्रस्तावित कामाच्या तुलनेत खडीकरणाचे कामात 255% व डांबरीकरणाचे कामात 20 ते 25% वाढ नोंदवून रु.25.73 लाखाचे अनावश्यक प्रदानासह कंत्राटदारास अनियमितपणे लाभ पोहोचवून शासन निधीचा गैरवापर करण्यात* |



Scanned by CamScanner

आला आहे. सदर प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियम क्र.227 व 228 चे उल्लंघन झाले आहे.

कामाचे नांव :- पुल ते बेले यांचे घर ते राधाकृष्ण टॉकीजपर्यन्त डांबर रस्ता विकसीत करणे.

प्रमाणक क्र.19, दिनांक 6.8.2014, रुपये 23,42,060/- (प्रथम धावते देयक)
प्रमाणक क्र.256, दिनांक 31.3.2015, रुपये 34,77432/- (दुसरे व अंतिम देयक)

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून आदेश क्र. 561, दि.19.11.2013 अन्वये चंद्रपूर महानगरपालिकेत मुलभूत सोईसुविधांच्या विकास कार्यक्रमांतर्गत रस्ता विकासाच्या कामासाठी प्रशासकीय मंजूरीसह 50% शासन निधीचे वितरण करण्यात आले. त्यापैकी रु.53,57,850/- अंदाजपत्रकीय मुल्याचे कामास क्र.243, दि.8.8.2013 अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामाच्या निविदेस स्थायी समितीने दिनांक 22.1.2014 रोजी मान्यता दिली असून दि.17.2.14 च्या आदेशान्वये 1% कमी दराने काम करण्यास मे.गजानन कन्स्ट्रक्शन, चंद्रपूर यांना कार्यादेश देण्यात आला. सदर कामासाठी अंदाजपत्रकीय मुल्यापेक्षा 8.61% ज्यादा रु.58,19,492/- चा खर्च करण्यात आला असून मोजमाप 57 व 91 क्रमांकाच्या मोजमाप पुस्तिकेत नोंदविले आहे. यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-

1. सदर कामाचे अंदाजपत्रकात एकूण 18 बाबींचा समावेश असून मोजमाप पुस्तिकेप्रमाणे त्यापैकी रस्ता खोदकाम, पेव्हर ब्लॉक्स, नाली खोदकाम, पाईप बसविणे, नामफलक याप्रकारच्या (बाब क्र.1,11,12,15,16,17 व 18) रु. 8,36,375/- मुल्याच्या बाबींचे कार्यान्वयन न करता व क्र.5,6,7,8,9 इ. बाबींवर कमी कार्यान्वयन करुन बाब क्र.2,3,4 व 5 वरील खडीकरण व डांबरीकरणाच्या कामांत अनुक्रमे 255% व 20 ते 25% एवढी अनावश्यक वाढ नोंदवून रु.25,73,534/- इतका निधी अनावश्यक व अनियमितपणे खर्च करुन कंत्राटदारास अतिरिक्त लाभाचे प्रदान केले आहे.

(रक्कम रुपयांत)

| बाब क्र. | बाबींचा तपशिल | अंदाजपत्रकीय परीमाण (क्यु.मी.) | कार्यान्वित परीमाण (क्यु.मी.) | वाढीव कामाची टक्केवारी | वाढीव कामाचे मुल्य |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Providing 150 mm thick 80 mm metal soling | 780 | 2766.75 | 255% | 5,01,257/- |
| 3 | Providing 150 mm thick 40 mm metal soling | 780 | 2672.25 | 242% | 5,04,663/- |
| 4 | Providing & laying Hot mixed hot laid B.M.50/75 mm | 289.58 | 361.49 | 25% | 5,93,748/- |
| 5 | Providing & laying 25 mm Hot mixed hot Semi- densed | 96.53 | 115.90 | 20% | 9,73,868/- |



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | B.C. | | | | |
| | | वाढीव कामाचे एकूण मुल्य रु. | | | 25,73,534/- |

या प्रकरणातील मूळ रस्त्यावर 390 मी.लांब व 7 मी.रुंद एवढे खडीकरण उपलब्ध असून त्यांची रुंदी 2 मीटरने खोदकाम व खडीकरणाद्वारे वाढवून या प्रकारे एकूण 390 मी. लांब X 9 मी. रुंद उपलब्ध झालेल्या खडीकरणावर डांबरीकरणाचे काम प्रस्तावित होते असे मूळ अंदाजपत्रक व मोजमाप पत्रकावरुन लक्षात येते व त्यानंतर दोन्ही बाजूंना पेव्हर ब्लॉक्स बसविण्याचेही प्रस्तावित असल्याचे दिसते.

परंतु प्रत्यक्षात मूळ अराखड्याविरुध्द बाब क्र.2 व 3 मिळून सरासरी अंदाजे 5 मीटर रुंद व 555 मीटर लांब एवढे खडीकरणाचे मोजमाप नोंदविण्यात आले असे दिसते. तसेच प्रस्तावित 390 मीटर ऐवजी 843 मीटर लांब व 9 मीटर ऐवजी सरासरी अंदाजे 5 मीटर क्षेत्र डांबरीकरण मोजमाप नोंदविण्यात आले आहे.

सदरचे रुपये 25.73 लाखाचे अनावश्यक असलेले वाढीव व अतिरिक्त काम महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियम 227 व 228 चे उल्लंघनासह करण्यात आले असून सदर बाब मनपाचे बांधकामविषयक सल्लागार मुकेश इन्फ्रास्ट्रक्चर किंवा अन्य कोणत्याही स्तरावरुन प्रशासनाचे निदर्शनास न आणता काम परिमाणासह योग्य प्रकारे झाल्याचे चुकीचे प्रमाणित करण्यात आले. पर्यायाने कंत्राटदारास अनियमीतपणे आर्थिक लाभ पोहोचवून शासन व मनपा निधीचे नुकसान करण्यात आले आहे. ते वसुलपात्र असून शासन जमा होणे आवश्यक आहे.

मनपाच्या विविध प्रकारच्या मोजमापांतर्गत कामांच्या नस्त्यांचे लेखापरीक्षण करतांना अनियमित वाढीव कामांसंदर्भातील वरील बाब समान आढळून आली आहे. परिणामी शासनाकडून प्राप्त अनुदान व मनपा निधीचा मोठ्या प्रमाणात गैरविनियोग करण्यात आल्याची शक्यता आहे.

2. डांबरीकरणाचे काम गुणवत्तापूर्वक व मजबुत होण्यासाठी हॉटमिक्स डांबराचे विहीत केलेले तापमान बांधकाम करताना असणे जरुरी आहे. परंतु हॉटमिक्स प्लांट ते कामाचे ठिकाणापर्यंत डांबर मिक्स वाहून नेताना तापमान कमी होवून ते वापरल्यास नंतर परिणामत: रस्ते उखडणे, पावसाळ्यात खराब होणे हे प्रकार घडतात. पर्यायाने त्याच ठिकाणी पुन्हा मोठा निधी खर्च करुन रस्त्यांची दुरुस्ती करावी लागते. असे असताना प्रत्यक्ष काम करताना वापरण्यात येणारे मिक्सचे तापमान तांत्रिकदृष्ट्या तपासण्यात येत असल्याचे दिसून येत नाही. उपरोक्त प्रकरणीसुध्दा ही त्रुटी लक्षात येते.

DATABWM6901 (Ref No : 10, Hmm No : 114)

## *8 दर पृथ:करण करतांना 150 mm जाडीच्या खडीकरणासाठी दर निश्चित करतांना 0.20 मी. (200 mm) गृहीत धरल्यामुळे चुकीचे दर निश्चित झाल्यामुळे अतिप्रदान.*

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

*लेखा शीर्ष : 314 शासन निधी*



Scanned by CamScanner

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1028809.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 847461.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 181348.00/-

खडीकरणाच्या कामाचे दर पृथःकरणात 200 mm (0.20 मीटर) गृहीत धरून खाडी पुरवठ्याचे प्रती क्युबिक मीटर दर निश्चित करून 150 mm जाडीसाठी प्रती स्क्वेअर मीटर साठी मुल्यांकन करून कंत्राटदारास प्रदान केल्यामुळे अतिप्रदान झाले आहे.

प्रमाणक क्रमांक:-11 दिनांक 02/03/2015 रुपये 10,28,809/-

प्रथम व अंतिम देयक (रस्ता)

वडगाव प्रभाग येथे श्री. खेमटकर ते करण किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता खडीकरणाच्या प्राक्कलनातील बाब क्र. 2 व 3 मधील अनुक्रमे Providing 150 mm thick 80 mm Metal व Providing 150 mm thick 40 mm Metal या कामाचे पृथःकरण 1.00 मी. लांबी x 3.00 मी. रुंदी x 0.20मी. जाडी विचारात घेऊन खाडी पुरविण्याचे दर निश्चित करण्यात आले आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | दर पृथःकरणात लागू केलेले दर | दर पृथकरणात अंदाजपत्रकीय गरजेप्रमाणे अनुज्ञेय दर |
|---|---|---|---|
| 1 | बाब क्र. 2 व 3<br>80 mm व 40 mm खडी पुरवठा (अनुक्रमे) | दर पृथःकरणात गृहीत धरलेल्या बांधकामाच्या जाडीसह प्रतियुनिट परिमाण<br>1.00 x 3.00 x 0.20<br>(लांबी) (रुंदी) (जाडी)<br>= 0.60 m3 | बांधकामाच्या अंदाजपत्रकीय जाडीसह दर पृथःकरणातील अपेक्षित प्रतियुनिट परिमाण<br>1.00 x 3.00 x 0.15<br>(लांबी) (रुंदी) (जाडी)<br>= 0.45 m3 |
| 2 | खडी पुरवण्याचा प्रति क्यु. मीटर दर | रु. 979.30 | रु. 979.30 |
| 3 | क्र. 2 वरील दरानुसार बांधकामाच्या प्रतियुनिट परिमाणात लागू केलेला व अनुज्ञेय दर | 0.60 m3 X रु. 979.30<br>= रु. 587.58 | 0.45 m3 X रु. 979.30<br>= रु. 440.70 |

तफावत 587.58
- 440.70
------------
रुपये 146.88 प्रती 3 स्क्वेअर मीटर रस्ता खडीकरण

म्हणजेच 48.96 प्रती स्क्वेअर मीटर

कामाच्या बाब क्र. 2 व 3 मधील खडी पुरवठ्यासाठी रु 48.96 प्रती स्क्वेअर मीटर प्रमाणे पुढीलप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

बाब क्र. 2 – रु. 48.96 x 1852 स्क्वेअर मीटर रस्ता बांधकाम = 90674/-

बाब क्र. 2 – रु. 48.96 x 1852 स्क्वेअर मीटर रस्ता बांधकाम = 90674/-



Scanned by CamScanner

-------------

एकूण अतिप्रदान रुपये 1,81,348/-

वरीलप्रमाणे रु. 181348/- चे अतिप्रदान वसूलपात्र ठरते.

DATABWM6901 (Ref No : 12, Hmm No : 28)

**9 सक्षम प्राधिकरणाची पूर्वमंजुरी न घेता वाढीव कामाचे मुल्यांकन नोंदविण्याची अनियमितता.**

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

*लेखा शीर्ष : 00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 7714120.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 7714120.00/-

| |
|---|
| *सक्षम प्राधिकरणाची पूर्वमंजुरी नसतांना वाढीव कामाचे मुल्यांकन नोंदवून रु. 77,14,120/- चे नियमबाह्यपणे शोधन केले.* |



Scanned by CamScanner

(मूळ परिच्छेद ID-DATBNKM6401)

विविध निधीमधून केलेली बांधकामे प्राकलनात नमूद

सन 2014-2015 या वित्तीय वर्षात महानगरपालिकेने विविध निधीमधून केलेली बांधकामे प्राकलनात नमूद असलेल्या परिणामानुसार करण्यात आलेली नाही. याउलट मोजमाप पुस्तकातील सदर बाबींची पडताळणी केली असता प्राकलनातील परीमाणापेक्षा अधिक परीमाणाची नोंद पुस्तकांत घेऊन कामाचे मुल्यांकन करण्यात आले.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 चे नियम 264 नुसार बांधकामासाठी सक्षम प्राधिकरणाकडून अंदाजपत्रकात मंजुरी दिलेली असून "मंजुरी मिळालेल्या परिमाणाच्या बांधकामाच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या कक्षेत येणार नाही असा होणारा जादा खर्च ज्यामध्ये संभव असेल अशी कुठलीही वाढ किंवा बांधकामामधील फेरफार करण्यास वरिष्ठ प्राधीकाऱ्याच्या मंजुरी शिवाय परवानगी देण्यात येवू नये" असे स्पष्ट असताना पुढील कामांच्या बाबीबाबत सक्षम प्राधिकरणाकडून खर्चाच्या अंदाजांना पूर्वमंजुरी न घेता वाढीव काम केल्याचे दर्शवून मोजमाप पुस्तकात जादाचे मुल्यांकन नोंदविले आहे. त्यामुळे शासन निधी मधून जादाचा खर्च झाल्याचे दिसून आले.

सबब जादा खर्चाची एकूण रक्कम रु. 7714120/- जबाबदारी निश्चित करून वसूल होणे आवश्यक आहे.

(रक्कम रुपयांत)

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रदान | | | प्राकलनातील बाबी | | | | मोजमाप पुस्तकानुसार मुल्यांकन | | | नियम बाह्य रित्या प्रदानाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्र. क्र | दि | रक्कम | बाब क्र | परिमाण | दर | रक्कम | परिमाण | दर | रक्कम | |
| 1 | हिंदुस्थान लालपेठ कॉलरी प्रभागात श्री.प्रभाकर तोरम ते श्री. पत्तेवार यांचे घरापर्यंत कॉंक्रीट | 58 | 2/3/15 | 1549397 | 5 | 80 | 3712.30 | 296980 | 154.79 | 3712.30 | 574626.91 | 277646 |
| | | | | | 6 | 80 | 4743.35 | 379468 | 153.23 | 4743.23 | 726823.52 | 347355 |
| | | | | | 7 | 16.69 | 5722.90 | 95515 | 28.69 | 5722.90 | 164190 | 68675 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रोड बांधकाम. | | | | | | | | | | | |
| 2 | बाजार प्रभागात श्री.घराटे ते महेश टिपले यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम. | 59 | 2/3/15 | 579427 | 3 | 60 | 3430.10 | 205806 | 62.92 | 3430.10 | 215821.89 | 10015 |
| | | | | | 4 | 60.68 | 3951.90 | 239782 | 95 | 3951.90 | 375630 | 135848 |
| 3 | अष्टभुजा प्रभागात प्रकाशनगर भागात कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम. | 63 | 5/3/15 | 487498 | 1 | 63.60 | 3430.10 | 218154 | 72.85 | 3430.10 | 249882 | 31728 |
| | | | | | 2 | 63.60 | 3951.90 | 251341 | 73.46 | 3951.90 | 290306 | 38965 |
| 4 | मालानगर प्रभागात श्री.सुधाकर नमिता ते कतुर गोमल ते रोड व रोअरपल्ली पोचम ते चीलमील आतेश कॉंक्रीट रोड बांधकाम. | 73 | 25/3/15 | 947025 | 3 | 95.15 | 3430.10 | 324374 | 133.90 | 3430.10 | 459290 | 134916 |
| | | | | | 4 | 96.50 | 3951.90 | 381358 | 143.83 | 3951.90 | 568401 | 187043 |
| 5 | बाजार प्रभागात श्री.सुचक | 100 | 31/3/15 | 457199 | 5 | 99 | 3712.30 | 367518 | 143.76 | 3712.30 | 533680 | 166162 |
| | | | | | 6 | 99 | 4743. | 4695 | 171. | 4743 | 87419 | 40460 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ते जुन्या महाल गांधी प्रा. शाळेपर्यंत कॉंक्रीट रस्त्या बांधकाम. | | | | | | 35 | 92 | 68 | .35 | 6 | 4 |
| 6 | हिंदुस्थान लालपेठ कॉलरी प्रभागात इकराम तेकभारे इकराम ते बालाजी मंदिर शिवतकर कोसा ते कोसा ते दिलीप वासेकर, हनुमान मंदिर ते संगमवार यांचे घरापर्यंत कॉंक्रीट नालीचे काम. | 50 | 2/3/15 | 786421 | 4 | 81.14 | 5742.45 | 465942 | 94.27 | 5742.45 | 541370 | 75308 |
| | | | | | 5 | 3.60 | 5722.90 | 20602 | 4.63 | 5722.90 | 26497 | 5895 |
| 7 | गौरी तलाव प्रभाग क्र.29 येथे श्री.रमेश आत्राम ते श्री. तळे यांचे | 55 | 2/3/15 | 837411 | 2 | 84 | 981.45 | 82442 | 91.56 | 981.45 | 89861 | 7419 |
| | | | | | 3 | 56 | 5712.30 | 207889 | 61.06 | 5712.30 | 226673 | 18784 |
| | | | | | 4 | 73 | 4743.35 | 298831 | 75.05 | 4743.35 | 355988 | 57157 |
| | | | | | 6 | 140 | 608.70 | 85218 | 167.79 | 608.70 | 102133 | 16915 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | घरापर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम. | | | | | | | | | | | |
| 8 | पठाणपुरा प्रभागात श्री.नरेंद्र ढोलते ते गणपत पडवेकर श्री.जगदीश नळे ते भगवान शातकर श्री.ब्राम्हणे ते किशोर टोवेकर व श्री. मारोती उपटकर ते देशकर पर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम | 58 | 2/3/15 | 1827595 | 1 | 143.50 | 3712.30 | 532115 | 157.41 | 3712.30 | 584353 | 522386 |
| | | | | | 2 | 158.85 | 4743.35 | 753481 | 229.31 | 4743.35 | 1087697 | 334216 |
| 9 | इंडस्ट्रीयल इस्टेट प्रभागात श्री. चंदेवार ते जनरल संडास पर्यंत रस्ता डांबरीकरणाचे काम. | 60 | 2/3/15 | 560537 | 2 | 86.25 | 8256.90 | 712158 | 90.64 | 8256.90 | 758405 | 36247 |
| | | | | | 3 | 28.75 | 11058.35 | 317928 | 58.46 | 11058.35 | 646249 | 328321 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | कामगार झोपडपट्टी प्रभागात श्री.सोरते ते श्री.पुलकर यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम. | 61 | 2/3/15 | 598400 | 1 | 45 | 3712.30 | 167054 | 53.78 | 3712.30 | 199647 | 32593 |
| | | | | | 2 | 47.50 | 4343.35 | 320176 | 81.46 | 4743.35 | 386393 | 66217 |
| 11 | जुने सि.एल. स्टेशन ते मातानगर चौक ते हनुमान मंदीर पर्यंत रस्ता डांबरीकरण. | 1 | 20/6/14 | 4054342 | 1 | 280.80 | 77.65 | 21788 | 285.37 | 77.65 | 22158 | 370 |
| | | | | | 4 | 274.50 | 8306.75 | 2280202 | 289.91 | 8306.75 | 2366676 | 86074 |
| | | | | | 5 | 91.50 | 10963.25 | 100313 | 112.86 | 10963.25 | 1237093 | 113680 |
| 12 | डीस्पेन्सरी चौक ते बी.एम.टी. चौक व ईराणी महाला ते उडीया वस्ती पर्यंत डांबरीकरणाचे काम. | 2 | 25/7/14 | 3050765 | 1 | 345 | 77.65 | 20789 | 539.81 | 77.65 | 49916 | 29127 |
| | | | | | 2 | 1500 | 239.20 | 358800 | 1799.13 | 239.20 | 430251 | 71451 |
| | | | | | 3 | 1500 | 253.20 | 380025 | 1696.55 | 253.35 | 429820 | 49795 |
| 13 | महेशनगर वार्ड येथे ता.डोबा | 7 | 27/1/15 | 00 | 1 | 1251 | 85.70 | 107211 | 1514.8 | 85.70 | 129823 | 22612 |
| | | | | | 5 | 50 | 4366 | 2183 | 93 | 4660 | 40609 | 18773 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रोड ते ख्रिश्चन हॉस्पिटल पर्यंत भूमीगत नाली व फुटपाथचे काम. | | | | | | | 30 | | | 3 | 3 |
| 14 | सरकार नगर वार्डात हिरेन अपार्टमेंट ते दीनदयाळ नगर पर्यंत रस्ता डांबरीकरणाचे काम. | 9 | 28/1/15 | 00 | 3 | 2448 | 158.25 | 387396 | 2539.8 | 158.25 | 401923 | 145273 |
| | | | | | 4 | 2448 | 169.80 | 415670 | 4597.08 | 169.80 | 780584 | 364914 |
| 15 | रहमत नगर प्रभागात बिनबा गेट ते शांतीधाम पर्यंत कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम. | 42 | 27/3/15 | 1730147 | 5 | 198 | 3172.30 | 735035 | 262.77 | 3712.30 | 975481 | 240446 |
| | | | | | 6 | 396 | 4743.35 | 1878357 | 542.23 | 4743.35 | 2572021 | 693854 |
| | | | | | 7 | 82.65 | 5722.90 | 472998 | 109.36 | 5722.90 | 625856 | 152852 |
| 16 | मा.तुळजा भवानी प्रभागात मस्जिद जवळील | 47 | 31/3/15 | 1762581 | 4 | 23.60 | 5742.45 | 135534 | 50.11 | 5742.45 | 173823 | 38289 |
| | | | | | 5 | 129.58 | 3712.30 | 481040 | 175.17 | 3712.30 | 453643 | 27397 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कॉंक्रीट रोडचे बांधकाम. | | | | 6 | 129.58 | 4743.35 | 414443 | 174.07 | 4743.35 | 582388 | 167945 |
| 17 | पठाणपुरा प्रभागात रानादां द्या सवारी जवळील कॉंक्रीट रस्ता विकसीत करण्याचे काम. | 48 | 31/3/15 | 1653353 | 3 | 32.48 | 3342.90 | 108577 | 34.80 | 3342.90 | 116332 | 7755 |
| | | | | | 4 | 57.88 | 5742.45 | 332373 | 79.49 | 5742.45 | 456447 | 124074 |
| | | | | | 8 | 451.40 | 141.55 | 63896 | 660.42 | 141.55 | 935240 | 29628 |
| 18 | पठाणपुरा प्रभागात मिलिंदनगर येथील कॉंक्रीट रोडचे बांधकाम | 49 | 31/3/15 | 2447817 | 2 | 178.31 | 981.45 | 175005 | 180.76 | 981.45 | 177406 | 2401 |
| | | | | | 3 | 12.38 | 3342.85 | 41384 | 24.08 | 3342.85 | 80495 | 39111 |
| | | | | | 4 | 23.60 | 5742.45 | 135522 | 66.82 | 5742.45 | 83710 | 51812 |
| | | | | | 5 | 129.58 | 3712.30 | 4810.40 | 206.70 | 3712.30 | 74733 | 69923 |
| | | | | | 6 | 129.58 | 4743 | 614643 | 216.36 | 4743 | 1026271 | 411628 |
| | | | | | 7 | 27.99 | 5722 | 160184 | 39.42 | 5722 | 225596 | 65412 |
| 19 | बिनबा प्रभाग क्र.23 चंद्रपूर येथे श्री.गोरे ते सातपुते यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट नाली | 15 | 31/3/15 | 150103 | 4 | 14.29 | 5742.45 | 82059.61 | 17.60 | 5742.45 | 101067 | 19008 |
| | | | | | 5 | 0.90 | 5722 | 5149 | 1.10 | 5722 | 6295 | 1146 |

Scanned by CamScanner

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बांधणे. | | | | | | | | | | | |
| 20 | डिनबा प्रभाग क्र.23 चंद्रपूर येथे श्रीमती. कमलाबाई बनकर ते शोभा रोडमाके यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट नाली बांधणे. | 17 | 31/3/15 | 149391 | 5 | 0.90 | 57.22 | 5149 | 2.10 | 5722 | 12018 | 6869 |
| 21 | वडगाव प्रभागात वडगाव रोड हवेली गार्डन चौक ते स्नेह नगर रोड ते दितुजी भवन पर्यंत कॉक्रीट रोडचे बांधकाम | 159 | 2/3/15 | 700387 | 2 | 81.68 | 981.45 | 80165 | 185.78 | 981.45 | 182333 | 102168 |
| | | | | | 5 | 190.80 | 3712.25 | 708297 | 225.82 | 3712.25 | 838300 | 130003 |
| | | | | | 6 | 190.80 | 4743.35 | 905031 | 226.44 | 4743.35 | 1074084 | 169053 |
| | | | | | 8 | 122.17 | 141.55 | 17293 | 176.44 | 141.55 | 24975 | 7682 |
| | | | | | 11 | 477 | 608.75 | 290350 | 890.48 | 608.75 | 542035 | 251685 |
| 22 | इंदिरा नगर प्रभागात भारत चौक जवळ श्री. | 160 | 2/3/15 | 2071555 | | 131.63 | 981.45 | 129188 | 182.74 | 981.45 | 179350 | 50162 |
| | | | | | | 117 | 3712.25 | 434333 | 127.86 | 3712.25 | 474648 | 40315 |
| | | | | | | 6 | 543.65 | 3262 | 15 | 543.65 | 8154 | 4892 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिवकुमार किराणा ते श्री. सोनुने यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रोड विकसित करण्याचे काम | | | | | | | | | | | |
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रभागात श्री. मानकर ते श्री. वनकर यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रोड विकसित करण्याचे काम. | 155 | 2/3/15 | 739800 | 5 | 57 | 3712.25 | 211598 | 59.94 | 3712.25 | 222572 | 10974 |

DATABWM6901 (Ref No : 43, Hmm No : 30)

***10 अनावश्यक बाबींचा मूळ प्राकलनात समावेश करून त्यावरील बचतीमधून अन्य बाबींच्या परिमाणात अनियमित वाढ दर्शविणे तसेच कॉंक्रीटीकरणाच्या दोन स्तरांपैकी एका स्तराचे कार्यान्वयन न केल्याच्या शक्यतेबाबत.***

पायाभूत सुविधांचा विकास (2014-15)

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 03

*लेखा शीर्ष :358 मनपा निधी*



Scanned by CamScanner

अनियमितता कलम : 93

गुंतलेली रक्कम रु. 2203243.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1390640.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 162000.00/-    तात्पुरती अमान्य रक्कम रु. 650603.00/-

**अनावश्यक बाबींचा प्राकलनात समावेश करून त्यावरील बचतीमधून अन्य बाबींच्या परिमाणात अनियमित वाढ दर्शविणे तसेच कॉंक्रीटीकरणाच्या दोन स्तरांपैकी एका स्तराचे कार्यान्वयन न केल्याबाबत.**

प्रमाणक क्र. - 197    दिनांक – 26.03.2015    रक्कम – 21,78,078/- (प्रथम व अंतिम देयक)

प्रमाणक क्र. - 203    दिनांक – 26.03.2015    रक्कम – 24,082/- (प्रथम व अंतिम देयक)

कामाचे नांव – अंचलेश्वर प्रभागात कस्तुरबा चौक परिसरात कॉंक्रीट रस्ता विकसित करणे.

1) सदर कामाच्या B-1 नमुन्यातील करारनाम्याच्या सर्वसाधारण अटीतील क्र. 37 नुसार वापरलेल्या साहित्याच्या बदलत्या ग्रेडिंगप्रमाणे वेळोवेळच्या प्रत्येक कॉंक्रीटीकरणाचे विशिष्ट आकाराचे नमुने शासनमान्य किंवा शासकीय प्रयोगशाळेकडे पाठविणे बंधनकारक आहे. उक्त कामावरील रस्ता कॉंक्रीटीकरणाच्या महत्वाच्या दोन बाबींचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| प्राकलनातील बाब अ. क्र. | बाब | प्राकलीत परिमाण ($m^3$) | कार्यान्वित परिमाण ($m^3$) | दर रुपये | जादा कामाचे मूल्य (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 5 | Providing and Laying in site M-10 / 1:3:6 CC below RCC raft and in foution | 115.92 | 184.47 | 3712.25 | 254474 (59%) |
| 6 | Providing and Laying in site M-20 CC | 115.92 | 182.24 | 3712.25 | 314579 (57%) |

वरील दोन्ही प्रकारातील नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी होणे आवश्यक असतांना मनपाने चंद्रपूर अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर, यांचेकडे दि. 28.07.2014, 30.07.2017 व 01.08.2014 रोजी कास्टिंग केलेल्या उपरोक्त क्र. 6 वरील M-20 या कॉंक्रीटीकरणाचे नमुने तपासणीस पाठविले. क्र. 5 वरील M-10 चे नमुने पाठविण्यात आले नाहीत. जिल्हाधिकारी चंद्रपूर, यांच्या दि. 19.11.2013 च्या प्रशासकीय आदेशात कामाची छायाचित्रे अभिलेख्यासह जतन करण्याची सूचना आहे. त्यानुसार उपलब्ध छायाचित्रांचे अवलोकन केले असता लोखंडी सळयांच्या सापळ्यावर (Bar reinforcement) M-20 व M-10 पैकी एका स्तराचे काम केल्याचे दिसते. याची प्रयोगशाळेत पाठविलेल्या नमुन्याशी सांगड घातल्यास M-10 सिमेंट कॉंक्रीट (प्राकलनातील अट क्र. 5) चे मोजमाप पुस्तकात दर्शविलेले 184.47 क्यु. मीटर (दर रु. 3712.25) चे रु. 6,84,799/- मूल्याच्या कामाचे कार्यान्वयन न झाल्याचे लक्षात येते. तथापि सदर कामाचा Defect Liability कालावधी दोन वर्षांचा असल्यामुळे रस्ता कॉंक्रीटीकरणात M-10 या स्तराचे कार्यान्वयन झाल्याबाबत स्थळ तपासणीसह कॉंक्रीट क्युब चे नमुने नव्याने काढून शासकीय प्रयोगशाळेकडून प्रमाणित करून घ्यावे व तसे अनुपालन सादर करावे.

2) सदर कामाच्या मोजमाप पुस्तिकेत वेळोवेळी मोजमाप करून नोंदी न घेता एकाच वेळी दिनांकरहित नोंदी घेतल्या आहेत. त्यामुळे कामाची प्रगती स्पष्ट होत नाही. दि. 20.04.2014 च्या कार्यादेशानुसार 5 महिन्यांच्या विहित मुदतीत



Scanned by CamScanner

किती काम झाले हे स्पष्ट होत नाही. असे असले तरी मनपाने 8 महिने (27/09/2014) मुदतवाढ दिली. मूळ मुदत पाच महिने असतांना त्याहून अडीचपट कालावधी ची मुदतवाढ असंयुक्तीक वाटते. असे असतांना वाढीव मुदतीतही काम पूर्ण न करता व पुढील मुदतवाढ न घेता त्यापुढेही सुमारे पाच महिन्यांनंतर काम पूर्ण झाल्याचे कंत्राटी बांधकाम सल्लागाराने दिलेल्या 26.02.2015 च्या व शहर अभियंता यांच्या दि. 03.03.2015 च्या प्रमाणपत्रावरुन लक्षात येते.

यांप्रकरणी विहित मुदतीनंतर च्या कालावधीतील विलंबापोटी करारनाम्याप्रमाणे दंड वसूलपात्र होतो.

दिनांक 28.09.2014 ते 27.09.2014 – (1 महिना रु.500/- प्रतिदिवस = 15,000/-

त्यापुढे बांधकाम सल्लागाराच्या प्रमाणपत्राच्या

दि. 26.02.2015 पर्यंत – (148 दिवस) रु.1000/- प्रतिदिवस = 14,800/-

---

वसुलपात्र रक्कम = 1,63,000/-

3) सदर रस्ता बांधकामात रस्ता कॉंक्रिटकरणाची प्रस्तावित रुंदी 3.60मी. नाली रुंदी 0.75 मी. व पेव्हर ब्लॉक्स 0.70 मी. याप्रमाणे 5.05 मी. रुंदीचे एकूण काम प्रस्तावित होते. परंतु पेव्हर ब्लॉक्स (प्राकलनातील अट क्र. 11) चे 483 क्यु. मी. पैकी 22.20 क्यु. मी. चे काम करून त्यातील रु. 2.80 लक्ष एवढी बचत व प्राकलनातील अट क्र. 9,10,12,13 यांचे कार्यान्वयन न करता त्यावरील एकूण बचत कामाची रुंदी 3.60 मी. ऐवजी 4.20 ते 8.80 मी. एवढी वाढवून अ.क्र. 4,5,6, व 7 वरील बाबींसाठी अनियमितपणे वापरण्यात आली. त्यामुळे या चार बाबींच्या मूल्यात अनुक्रमे 43%, 59%, 57% व 69% एवढी प्रचंड वाढ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील नियम 150 नुसार सक्षम मान्यतेशिवाय करण्यात आली.

या संदर्भातील जारी केलेल्या अर्धसमासावर अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DATABWM6901 (Ref No : 4, Hmm No : 114)

## *11 मूल्यवर्धित कराची रक्कम कमी वसुली करण्याची अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 113735.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 113735.00/-

***पॅन कार्ड नसलेल्या कंत्राटदाराच्या देयकातून 5% मूल्यवर्धित कराची रक्कम वसूल केली नाही. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले आहे.***

(मूळ परिच्छेद ID-DATBNKM6401)

पॅन कार्ड नसलेल्या कंत्राटदारांच्या बांधकाम देयकातून महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 ची सुधारणा दि.04 एप्रील 2012 नुसार कंत्राटदारास प्रदान करावयाच्या रकमेच्या 5% मूल्यवर्धित कर वसुल करून शासनाकडे भरणा करावयाचा आहे. परंतु सन 2014-2015 मध्ये 5% पेक्षा कमी रक्कम वसुल केली असल्याने उर्वरित रक्कम कंत्राटदाराकडू



Scanned by CamScanner

वसूल होणे आवश्यक आहे. सन 2013-2014 मध्ये निवडक महिन्यातील प्रमाणकामध्ये खालील विवरणामध्ये दर्शविलेली रक्कम रुपये 113735/- सह उर्वरित कालावधीमधील प्रदान केलेल्या इतर देयकांबाबत सुद्धा 5% प्रमाणे वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

(रकमा रुपयांत)

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रदान | | | 5% प्रमाणे करावयाचा मुल्यवर्धीत कराची रक्कम | वसूल केलेली रक्कम | कमी वसुलीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्र.क्र | दिनांक | रक्कम | | | |
| 1 | डिनबा प्रभागात श्री.इंगळे ते चौधरी घर कॉंक्रीट रस्ता | 219 | 30/3/2015 | 2843378 | 142169 | 28434 | 113735 |

DATABWM6901 (Ref No : 44, Hrum No : 55)

## 12 मोजमाप नोंदवहयांमधील त्रुट्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 08

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 93I*

***मोजमाप नोंदवहयांमधील नोंदी अतिशय मोघमपणे घेण्यात येत असून त्यात पारदर्शकपणा दिसून येत नाही. परिणामी कोट्यावधीच्या बांधकामांच्या नोंदींच्या व प्रत्यक्ष कामाबाबत संदिग्धता निर्माण होण्यास वाव आहे.***

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकामधील परिशिष्ट 24 मध्ये मोजमाप नोंदवहया ठेवण्यासंबंधी नियम मांडण्यात आले आहेत. मनपा चंद्रपूर कडून शासन अनुदान व मनपा निधीतून कोट्यावधी रकमांचे रस्ता व इतर बांधकाम करण्यात येत असून प्रत्येक कामाच्या नोंदी काटेकोरपणे होणे अत्यावश्यक आहे.

मोजमाप नोंदवहया न्यायालयात पुरावा म्हणून दाखल कराव्या लागण्याची शक्यता असल्यामुळे त्या अतिशय महत्वाचे लेखाविषयक अभिलेख म्हणून समजण्यात याव्यात आणि अत्यंत काळजीपूर्वक, व्यवस्थितपणे व अचूकपणे ठेवण्याचे निर्देश नियम 5 अन्वये देण्यात आले आहेत.

असे असतांना त्यासंबंधी पुढील त्रुट्या निदर्शनास आल्या आहेत -

1. मोजमाप संबंधीचे देयक तयार केल्यानंतर मोजमापे नमूद असलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईतील एका कर्णरेषेद्वारे खोडलेले नाहीत (नियम 13).

2. देयक पारित झाल्यानंतर व त्याचे प्रदान झाल्यानंतर सदर मोजमापे लाल शाईतील दुसऱ्या कर्णरेषेद्वारे खोडलेल्या



Scanned by CamScanner

नाहीत (नियम 15).

3. मोजमापाशी संबंधित प्रदान झाल्यानंतर त्यावर प्रमाणक क्रमांक व दिनांक नोंदविले नाहीत. (नियम 15).

4. झालेल्या बांधकामाचे त्याचवेळी मोजमाप घेतले जात नाही. अर्थात बांधकामाचे मोजमाप शेवटी एकत्रितपणे धावते देयकनिहाय न घेता वेळोवेळी घेणे आवश्यक आहे. रस्ता बांधकामातील जी कामे झाकली जाण्याची व अंतिम स्वरूप देतेवेळी तपशीलवार मोजमापांसाठी उपलब्ध होत नसल्याची शक्यता (उदा. रस्त्याचे विविध स्तर) आहे, ती कामे झाकली जाण्यापूर्वीच नोंदविणे आवश्यक आहे. (नियम 11) मोजमापाची तारीख स्वाक्षरीसह नोंदविण्यात येत नाही. पाणीपुरवठा संदर्भातील पाईपलाईन टाकण्याचे व इतर संबंधित कामाची मोजमापे पाणीपुरवठा विभागातील अभियंत्याकडून नोंदविली किंवा तपासली जात नाहीत.

5. मोजमाप नोंदवहीमध्ये कार्यारंभ आदेश क्रमांक, काम पूर्ण केल्याची तारीख, करारनाम्याचा संदर्भ इत्यादी आवश्यक बाबी नोंदविण्यात येत नाही. ( नियम 8 (1) )

6. मोजमाप नोंदवह्यांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. (नियम 6) परिणामी काही नोंदवह्यांना सारखे क्रमांक देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिशिष्ट 10 (3) नुसार सर्वसाधारण मोजमाप नोंदवह्यांना क्रमांक देण्यात येऊन त्याची नोंद विभागीय नोंदवहीमध्ये करावयाची आहे. परंतु त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे मोजमाप पुस्तक क्रमांक 64,62 व 29 ह्या मोजमाप पुस्तकांचे क्रमांक इतर मोजमाप पुस्तकांस देण्यात आले आहेत. म्हणजे क्र. 64, 62 व 29 ह्या क्रमांकाचे प्रत्येकी 2 मोजमाप पुस्तके तयार केली आहेत. (DATBNKM6401)

7. मोजमापांच्या पृष्ठावर काही स्वाक्षऱ्या आढळतात परंतु त्या कोणत्या प्राधिकाऱ्यांच्या आहेत ते नमूद करण्यात येत नाही. कंत्राटदारांची स्वाक्षरी आवश्यक (नियम 12) असतांना ती घेतली किंवा कसे हे समजून येत नाही.

8. मोजमापांच्या नोंदींच्या विशिष्ट टक्केवारीत तपासणीची तरतूद नियम 11 मध्ये करण्यात आलेली असतांना तसे करण्यात येत नाही.

उपरोक्त त्रुट्या विचारात घेतल्यास कोट्यावधींच्या कामात प्रशासनाचे स्तरावर गंभीरता, पारदर्शकपणा व नियमसंगत आवश्यक काटेकोरपणा पाळला जात नाही हे नमूद करता येते.

DATABWM6901 (Ref No : 5, Hmm No : 115)

### *13 कामाच्या निविदा ई-टेंडरिंगद्वारे न मागविल्यामुळे निविदा पध्दतीत पारदर्शकता व निकोप स्पर्धेचा अभाव असणेबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

*लेखा शीर्ष : 00 शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 93*

गुंतलेली रक्कम रु. 274007345.00 /-



Scanned by CamScanner

*राज्य शासनाने दिनांक 19 जानेवारी, 2013 च्या शासन निर्णयान्वये लागु केलेल्या ई-टेंडरिंग पद्धतीचा महानगरपालिकेने अवलंब न केल्याने निविदा पध्दतीत सुटसुटीतपणा पारदर्शकता व निकोप स्पर्धा या महत्वाच्या उपयोगितांचा अभाव राहिल्याची शक्यता आहे.*

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.मातंस/2010/प्र.क्र.34/39, दिनांक 6 ऑगस्ट, 2010 अन्वये महाराष्ट्र राज्यात निविदा प्रक्रियेचे महत्व लक्षात घेवून केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नंस कार्यक्रमांतर्गत ई-टेंडरिंग हा मिशन मोड प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला होता.

विकासात्मक कामे, सेवा, वस्तुंची खरेदी यावर प्रचंड खर्च होत असल्यामुळे निविदा प्रक्रियेत पारदर्शकता, सुटसुटीतपणा व निकोप स्पर्धेस वाव मिळावा म्हणून शा.प्र.वि.शा.नि.क्र.मातंस/गरती 2012/प्र.क्र.273/39, दिनांक 19 जानेवारी, 2013 अन्वये शासनाच्या इतर विभागासह महानगरपालिकांनाही ई-टेंडरिंगच्या सेवा शासनाने उपलब्ध करुन दिल्या होत्या.

सदर दिनांक 19 जानेवारी, 2013 च्या शासन निर्णयान्वये रु.10.00 लाख किंवा त्यापेक्षा अधिक मुल्याच्या निविदांसाठी दिनांक 1 फेब्रुवारी, 2013 पासून ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्याचे निर्देश जारी करण्यात आले होते.

महानगरपालिका, चंद्रपूर येथे सन 2013-14 मध्ये विविध शासकीय योजनांखाली प्राप्त अनुदानातून मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला. सदर कामावर रु.27,40,07,345/- (अंदाजपत्रकीय आकडेवारीनुसार) एवढा खर्च करण्यात आला. यापैकी मंजूर असलेले प्रत्येक काम रु.10.00 लाख पेक्षा अधिक मुल्याचे असल्यामुळे शासकीय निर्देशाप्रमाणे ई-निविदा प्रसिध्द करण्यापेक्षा वर्तमानपत्राद्वारे निविदा सूचना प्रसिध्द करुन कंत्राटदाराकडून प्रत्यक्ष लिफाफा पध्दतीने निविदा प्राप्त करण्यात आल्यामुळे वरील निर्देशांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

त्यामुळे प्रचलित निविदा पध्दतीत पारदर्शकता, सुटसुटीतपणा व निकोप स्पर्धा परिपूर्ण होतील असे नमुद करता येणार नाही. या संदर्भात अर्धसमास पत्र क्र.27, दिनांक 11 एप्रिल, 2016 अन्वये महानगरपालिका प्रशासनाचे अभिप्राय व खुलासा मागविण्यात आला होता. परंतु तो प्राप्त न झाल्यामुळे महानगरपालिकेतील प्रचलित निविदा पध्दतीवर आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 8, Hmm No : 27)

***14 व्यापक प्रसिध्दी न देता व खुल्या स्पर्धेत मर्यादा आणून पाईपलाईन टाकण्याची एकूण 7 कामे एकाच कंत्राटदारास दिल्याबाबत.***

चंद्रपूर शहर पंचशताब्दी योजना (2014-15)

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 04

*लेखा शीर्ष 351 शासन निधी*

*अनियमितता कलम : 93I*

गुंतलेली रक्कम रु. 67100000.00 /-



Scanned by CamScanner

वसूलपात्र रक्कम रु. 60000.00/-     तात्पुरती अनान्य रक्कम रु. 6100000.00/-

| |
|---|
| महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, मं.मुंबई शासन निर्णय दिनांक 2.11.2006 नुसार निविदा सूचनेच्या विहित कालावधी (प्रथम 25 दिवस व द्वितीय 15 दिवस) साठी निविदा सूचना प्रसिद्ध न करता मनपास लागू नसलेल्या ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक 30.1.2014 च्या शासन निर्णयानुसार प्रथम, द्वितीय व तृतीय सुचना कालावधी अल्प ( 7, 5 व 5 दिवस अनुक्रमे) ठेवल्याने एकुण रु.6.71 कोटीच्या निविदांना अल्प मुदतीचा प्रतिसाद मिळून परिणामी एकच पात्र निविदाकारास काम देण्यात आले. त्यामुळे सहा महिन्यांच्या विहित मुदतीच्या दुप्पट कालावधी ओलांडूनही योजना कार्यान्वित झालेली नाही. |

विकास कामाअंतर्गत
महानगरपालिका, चंद्रपूर शहर पंचशताब्दी योजनेअंतर्गत प्राथमिक सोयीसुविधांच्या जिल्हाधिकारी यांनी पिण्याची पाईप लाईन टाकणे या स्वरुपाच्या रु.6,10,31,290/- मुल्याच्या एकुण 7 कामांना दिनांक 30.1.2014 च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता व नगर अभियंता यांनी दिनांक 27.8.2013 च्या आदेशान्वये तांत्रिक मान्यता दिली. त्या अनुषंगाने ई-टेंडर व वर्तमानपत्राद्वारे निविदा सूचना जाहिर करुन सदं कामे वाटाघाटीअंती 10 % अधिक दराने मे.मल्टी अर्बन इन्फ्रा सर्व्हीस, प्रा.लि. यांना देण्याचे स्थायी समितीच्या ठराव क्र.365, दिनांक 4.3.2014 अन्वये मान्य करण्यात आले. त्यांना त्यानुसार दिनांक 28.4.2014 रोजी विविध कार्यादेशान्वये प्रत्येकी सहा महिन्याच्या मुदतीसाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले. परंतु सन 2014-15 अखेरपर्यंत अर्थात मुळ मुदतीच्या दुप्पट कालावधीनंतरही अद्याप कामे पूर्ण झालेली नाहीत.

खालील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :-

1. ई-गव्हर्नंस अंतर्गत ई-निविदा प्रणालीच्या माध्यमातून निविदा सूचनांना विहित कालावधीत व्यापक प्रसिध्दी प्राप्त होवून (शा.नि.दि.23.9.2013 ग्रा.वि.वि.) प्राप्त होवून अधिक स्पर्धा व पारदर्शकतेसह निधीतून वित्तीय औचित्यास धरुन खर्च व्हावा व विकास कामे योग्यरित्या पूर्ण व्हावी, हा शासनाचा उद्देश आहे. या संदर्भात निविदा सूचनांच्या कालावधीसाठी शासनाच्या विविध विभागांनी निर्देश जारी केलेले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन निर्णय दिनांक 2.11.2006 अन्वये रु. 50,00,000/- वरील निविदा सूचनांसाठी प्रथम व द्वितीय वेळी 25 व 15 दिवस जाहीर केले आहेत, तर जिल्हा परिषदांसाठी ग्रामविकास विभागाने हा कालावधी 7, 5 व 3 दिवस असा अल्प मुदतीचा निश्चित केला असे असतांना मनपाने त्यांना लागु नसलेल्या ग्रामविकास विभागाच्या दिनांक 30.1.2014 च्या शासन निर्णयाचा आधार घेवून पहिली, दूसरी व तिसरी निविदा सूचना अनुक्रमे 7, 5 व 5 दिवसांच्या अल्प मुदतीसह प्रसिध्द केल्याने निविदांची व्यापक प्रसिध्दी झाली नाही. (सदर ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार मनपाच्या सर्वच कामासाठी अल्पमुदतीच्या जाहिराती प्रसिध्द केल्या आहेत.) परिणामी सर्व सात कामांना तिसऱ्या वेळेस केवळ दोन कंत्राटदारांनी प्रतिसाद दिला. त्यापैकी एक कंत्राटदार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये नोंदणीकृत नसल्याने अपात्र घोषित करण्यात आले. व त्याची निविदा उघडण्यात आली नाही. परिणामे मे.मल्टी अर्बन इन्फ्रा सर्व्हीसेस प्रा.लि. या एकमेव कंत्राटदारास सर्व सातही कामे वाटाघाटीअंती 10% अधिक दराने देण्यात आली.

म्हणजेच उचित प्रसिध्दी नसल्याने केवळ एक पात्र निविदाकार स्पर्धेत शिल्लक राहून काम मिळाल्याने एकुण रु. 6.00 कोटी मुल्याचे काम त्याच्या आवाक्याबाहेरील असल्याने कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क न घेता वेळोवेळी मुदतवाढी देवूनही पूर्ण करु शकलेला नाही. त्यामुळे शहराच्या नव्याने विकसित भागात पाणी वितरण व्यवस्था करण्याची योजना विहित मुदतीत परिपूर्णपणे अंमलात आलेली नाही.

(एकाच रुपयांत)



Scanned by CamScanner

| अ.क्र. | कामाचे नांव | मूळ अंदाजपत्रकीय मूल्य / कंत्राटदाराच्या 10% अधिक दराने कामाचे मूल्य (रु.) | मुदतवाढी (कारण पाईप उपलब्ध होण्यास विलंब) | | | दि.31.3.2015 अखेर झालेल्या प्रदानानुसार काम (रु.) | प्रमाणक क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम | द्वितीय | तृतीय | | |
| 1 | बंगाली कॅम्प ते रयतवारी कॉलरी | 9106880 / 10017568 | 30.4.15 पर्यन्त | 31.8.15 | - | 35,15,160 / 35.08% | 10, दि.26.3.15, रु.35,15,160/- (प्रथम धावते देयक) |
| 2 | बायपास ते महाकाली कॉलरी कॅन्टीन चौक | 9509580 / 10460358 | अनुपलब्ध | अनुपलब्ध | अनुपलब्ध | 47,65,096/- / 45.55% | 3,दि.17.10.2014,रु.47,65,096/- (प्रथम धावते देयक) |
| 3 | तुकुम पाण्याची टाकी ते छत्रपतीनगर | 10111850 / 11123035 | 30.4.15 पर्यन्त | 31.7.15 | 28.2.16 | 43,53,771/- / 39.14% | 8,दि.26.3.2015, रु.16,20,641/- (दुसरे व अंतीम ) |
| 4 | बंगाली कॅम्प ते संजयनगर | 9563875 / 10520263 | अनुपलब्ध | अनुपलब्ध | अनुपलब्ध | 0% | 3,दि.23.6.2015, रु.52,46,923/- (प्रथम धावते देयक) |
| 5 | जटपुरा गेट ते पी.एच.नगर | 9830795 / 10813787 | 30.4.15 पर्यन्त | 31.7.15 | - | 67,71,775/- / 62.62% | 9,दि.26.3.2015, रु.45,50,584/- 2nd RA |
| 6 | बाबुपेठ ते बंगाली कॅम्प | 7409870 / 8150857 | 30.4.15 पर्यन्त | 31.7.15 पर्यन्त | - | 49,61,182/- / 60.86% | 11,दि.26.3.2015,रु.21,54,751/- (दुसरे धावते देयक) |
| 7 | महाकाली ते गौतम नगर व ओमनगर | 54,98,440 / 60,48,284 | 31.3.15 पर्यन्त | 28.2.16 पर्यन्त | - | 25,18,143/- / 45.79% | 5,दि.17.10.2014,रु.25,18,143/- |

2. निविदा सूचनेत नमूद केल्यानुसार केवळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदाराकडूनच निविदा मागविण्यात आल्यात. त्यामागील कारण स्पष्ट करण्यात आले नाही. (अर्धशासकीय पत्र) वास्तविक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत कंत्राटदार महाराष्ट्र राज्यातील सर्व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामासाठीच नोंदणीकृत असतो. शिवाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार सदरचे काम सिव्हील प्रकारात मोडत असल्यामुळे उपरोक्त निविदा सर्व कंत्राटदारांना खुली असणे आवश्यक होते. परिणामत: अंदाजे सहा कोटी



Scanned by CamScanner

मुल्याच्या उपरोक्त कामाच्या वाटपात निकोप स्पर्धा झाली नाही असे दिसते.

याच प्रकारच्या रु.7.89 कोटी मुल्याच्या 13 कामांच्या प्राकलित मुल्यापेक्षा 5% कमी दराच्या मे.उत्कर्ष कन्स्ट्रक्शन, चंद्रपूर यांच्या निविदा 2012-13 मध्ये स्थायी समितीचा ठराव क्र.16, दिनांक 30.7.2012 अन्वये मंजूर केल्या होत्या. हा 5% कमी दराचा अनुभव असतांना उपरोक्त 7 कामाच्या निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची नोंदणी बंधनकारक करून स्पर्धा मर्यादित केल्याने केवळ दोन निविदा प्राप्त होऊन त्यापैकी एक अपात्र केल्यामुळे अंतिमत: 10% अधिक दराच्या निविदा स्विकारण्यात आल्या. त्यानुसार एकूण प्राकलन मुल्य रु.6.10 कोटी च्या 10% अधिक अंदाजे रु.61 लक्ष (अंतिम प्रदान सन 2014-15 नंतर झाले असून एकूण कामाच्या मुल्याप्रमाणे रकमेत बदल संभाव्य) चे मनपाचे नुकसान झाल्याची शक्यता आहे. तूर्त र.61.00 लक्ष हा खर्च तात्पुरता अमान्य करण्यांत येतो.

3. उपरोक्त सात कामे मिळून तयार केलेली योजना सुरु करण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या पाईपलाईन खराब झाल्याची किंवा खराब असलेले पाईप बाहेर काढून त्याची भंगार साहित्य म्हणून विल्हेवाट लावण्यात आली किंवा कसे? याबाबत नस्तीमध्ये उल्लेख नाही. (अर्धसमास पत्र)

4. सदर सातही प्रकरणात रु.100/- मुल्याच्या मुद्रांकावर करारनामे करण्यात आले. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे दि.23.4.2006 चे शासन अधिसूचनेतील तरतुदीचे पालन न केल्यामुळे पुढीलप्रमाणे शासकीय महसुलाची हानी झालेली आहे –

| अ.क्र. | कंत्राटी मुल्य (वरील तक्त्यानुसार कामाप्रमाणे) (रुपये) | आवश्यक मुद्रांकाचे मुल्य (रुपये) | वापरलेल्या मुद्रांकाचे मुल्य (रुपये) | शासकीय मुद्रांक शुल्काची हानी (रुपये) |
|---|---|---|---|---|
| 1 | 10017568 | 9200 | 100 | 9100 |
| 2 | 10460358 | 9600 | 100 | 9500 |
| 3 | 11123035 | 10300 | 100 | 10200 |
| 4 | 10520263 | 9700 | 100 | 9600 |
| 5 | 10813787 | 10000 | 100 | 9900 |
| 6 | 8150857 | 7300 | 100 | 7200 |
| 7 | 6048284 | 5200 | 100 | 5100 |
| | एकूण | 61300 | 700 | 60600 |

उपरोक्त रु.60,600/- वसुल करून राज्य शासनाकडे जमा करून अनुपालन सादर करावे. या संदर्भात जारी केलेल्या अर्धसमास पत्र क्र.76, दिनांक 13/06/2016 चे अनुषंगाने अभिप्राय अप्राप्त नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 9, Hmm No : 70)



Scanned by CamScanner

## 15 नविन खांबांच्या एल टी लाईन पथदिव्यांसह विद्युतीकरणाच्या कामात प्राकलन मूल्याच्या त्रुटीपूर्ण निर्धारणामुळे झालेल्या अतिरिक्त प्रदानाबाबत

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :163 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 93*

गुंतलेली रक्कम रु. 6219874.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5702617.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 517257.00/-

***पथदिव्यांच्या विद्युतीकरणाच्या कामाच्या MSEDCL यांचेकडून प्राप्त प्राकलनानुसार त्यांचे कडून कामे करवून न घेता समाविष्ट असलेल्या प्रशासकीय बाबींच्या मुल्यासह एकूण प्राकलन मूल्याच्या निविदा जाहीर प्रसिद्ध करून खाजगी कंत्राटदारांना कामे देण्यात आली व पर्यायाने MSEDCL यांचेकडील प्रशासकीय बाबीवरील मूल्याचे कंत्राटदारांना अतिरिक्त प्रदान करण्यात आले.***

चंद्रपूर शहरातील विविध प्रभागात नविन खांबांच्या एल टी लाईन पथदिव्यांसह विद्युतीकरणाच्या एकूण रु.62,19,874/- मूल्याच्या 24 कामांना MSEDCL यांचेकडून प्राकलनासह तांत्रिक मंजुरी व स्थायी समितीकडून बाब क्र.325 दि.28/02/2014 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आले. या कामांच्या जाहीर निविदा प्रसिध्द करून कंत्राटदारांना वाटाघाटी करून 3% वाढीव दराने कामाचे वाटप करण्यात आले. 2014-2015 या वर्षात विविध प्रमाणकान्वये रक्कमांचे शोधन करण्यात आले.

**यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.**

MSEDCL यांनी उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक देतांना तांत्रिक मान्यतेसह कामे करवून घेण्या संदर्भात दोन पर्याय संबंधित पत्रात नमूद केले होते.

**<u>पर्याय: I.</u>** DDF Scheme अंतर्गत MSEDCL यांचेकडील कंत्राटदारामार्फत त्यांचे तांत्रिक निरीक्षणाखाली (Supervision) दिलेल्या अंदाजपत्रकीय मुल्यानुसार काम करवून कामाचे प्रदान MSEDCL यांना करावे.

सदर अंदाजपत्रकीय मूल्यात पुढील प्रशासकीय बाबींचा समावेश करण्यात आला होता.

अ. कामाचा विमा

ब. साहित्यावरील आकस्मिक खर्च

क. Contractors Supervision Charges on material

ड. Contractors Profile

इ. H.O. Supervision Charges on erection of material



Scanned by CamScanner

ई. Interest during Construction period on total project cost.

<u>पर्याय: ii.</u> मनपाने MSEDCL यांच्या देखरेखीखाली (1.3% सुपरव्हिजन चार्जेस) खाजगी कंत्राटदाराच्या मार्फत काम करणे.

मनपाने वरीलपैकी पर्याय क्र.ii निवडून पर्याय क्र.i मधील एकूण मुल्यानुसार प्रसिध्द करून कंत्राटदारांना प्रदान केले. या प्रदानामध्ये पर्याय क्र.i मधील क्र.अ ते ई या MSEDCL यांच्या अंतर्गत प्रशासकीय बाबीवरील मूल्याचो सुद्धा समावेश करण्यात आला. वास्तविक निविदा प्रसिध्द करतांना प्राकलित मुल्यातून उपरोक्त बाबी वगळणे आवश्यक होते. परंतु त्याकडे दुर्लक्ष झाल्याने पुढीलप्रमाणे रकमांचे अनावश्यक प्रदान होऊन मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्र दिनांक | अतिरिक्त प्रदानाच्या बाबी पर्याय क्र.i | | | | | | कंत्राटदाराचा वाढीव दर 3% (+) | एकूण अतिप्रदान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | इ | ई | | |
| 1 | 2057<br>30/03/15 | 4803 | 14410 | 24017 | 24017 | - | - | निरंक | 67267 |
| 2 | 2078<br>31/03/15 | 1826 | 5478 | 9130 | 9130 | - | - | 767 | 26331 |
| 3 | 1129<br>06/12/14 | 5287 | 7931 | 26437 | 26437 | - | - | 1983 | 68075 |
| 4 | 1121<br>05/12/14 | निरंक | 2935 | 4226 | 5327 | 1267 | 2933 | 489 | 16777 |
| 5 | 1118<br>03/12/14 | निरंक | 4494 | 7491 | 9465 | 2247 | 5212 | 867 | 29776 |
| 6 | 425<br>11/07/14 | निरंक | 3666 | 6110 | 7702 | 1833 | 4242 | 707 | 24260 |
| 7 | 426<br>11/07/14 | निरंक | 6680 | 11133 | 14067 | 3340 | 7748 | 1289 | 44257 |
| 8 | 13<br>21/10/14 | निरंक | 6869 | 11449 | 14466 | 3435 | 7967 | 1326 | 45512 |
| 9 | 1130<br>06/12/14 | निरंक | 4837 | 8061 | 10185 | 2418 | 5609 | 933 | 32043 |
| 10 | 14 | 6712 | 20137 | 33562 | 33578 | निरंक | निरंक | 2820 | 96809 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 05/01/15 | | | | | | | | |
| 11 | 2055<br>30/03/15 | 3040 | 9120 | 15199 | 12159 | निरंक | निरंक | 2372 | 41890 |
| एकूण अतिप्रदान (6%) | | | | | | | | | 517257 |

उपलब्ध अभिलेख्यावरून एकूण 24 कामांपैकी 11 कामातील अतिप्रदान रु.517257/- इतके आहे. नस्त्या व मोजमाप पुस्तिकांमध्ये प्रमाणकांचा संदर्भ उपलब्ध नसल्यामुळे अतिप्रदानाचा तपशील या आक्षेपात समाविष्ट केलेला नाही. मनपाने सर्व कामांवरील याप्रमाणे झालेल्या अतिप्रदानाची परिगणना करून एकूण अतिप्रदान वसूल करावे व तसे अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 11, Hmm No : 12)

## *16 महाकाली कॉलरी प्रभागात पथदिव्यांच्या विद्युतीकरणाच्या खाजगी कंत्राटदारामार्फत केलेल्या कामाच्या अंदाजपत्रकीय मूल्याचे त्रुटीपूर्ण निर्धारण केल्यामुळे आर्थिक नुकसान व इतर अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष:163 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 730644.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 630401.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 100243.00/-

***MSEDCL यांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय मुल्यानुसार त्यांचेकडून काम करवून न घेता अंदाजपत्रकातील कंत्राटदाराचा नफा, विमा, आकस्मिक खर्च, इत्यादी तत्सम बाबींवरील रु. 74022.77 रक्कम अंदाजपत्रकीय रकमेतून न वगळता तेच काम खाजगी कंत्राटदारामार्फत वाढीव दराने केल्यामुळे कंत्राटदारास अनावश्यक आर्थिक लाभाचे प्रदान झाले आहे.***

महाकाली कॉलरी प्रभागात 9 नवीन खांबांसह 34 खांबांवर स्ट्रीट लाईट एरीअल बंच केबल चे एल. टी. लाईन चे पथदिव्यांसह विद्युतीकरण या कामास (रु. 6,97,558/-) आयुक्त मनपा यांनी दि. 02/12/2013 च्या अन्वये मान्यता व का.अ., एम.एस.ई.डी.सी.एल., चंद्रपूर यांनी 28/10/2013 च्या आदेशान्वये रु. 6,89,995/- चे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता दिली. दिनांक 03/12/2013 च्या पत्रान्वये मे. आधुनिक इलेक्ट्रिक सर्व्हिस, चंद्रपूर यांना स्विकृत दरानुसार 3% वाढीव दराने काम करण्याचा कार्यादेश देण्यात आला असून प्रमाणक क्र. 1124 दि. 06/12/2014 रु. 7,30,644/- अन्वये कामाचे प्रथम व अंतीम प्रदान करण्यात आले.



Scanned by CamScanner

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत -

1) एम.एस.ई.डी.सी.एल. यांनी अंदाजपत्रक देताना तांत्रिक मान्यतेच्या आदेशात दोन विकल्प दिले होते--

i) एम.एस.ई.डी.सी.एल. यांचेकडील DDF Scheme (100%) अंतर्गत त्यांनी त्यांचेकडील कंत्राटदारामार्फत रु. 689995/- या किंमतीमध्ये काम पूर्ण करावे.

या किंमतीमध्ये साहित्याच्या मुल्याव्यतिरिक्त पुढील ठळक बाबींचा समावेश होता -

अ) कामाचा विमा रु. 5287.32

ब) आकस्मिक खर्च (साहित्यावर) रु. 15861.96

क) Contractors supervision charges on material रु. 26436.61

ड) कंत्राटदाराचा नफा रु. 26436.18

---

रु. 74022.07

ii) महानगरपालिकेने एम.एस.ई.डी.सी.एल. यांच्या देखरेखीखाली काम करावे.

यामध्ये पुढील बाबींचा समावेश होता –

अ) साहित्याचे मूल्य रु. 528732.12

ब) साहित्याची मांडणी (Erection) रु. 52873.12

---

रु. 581605.33

क) एम.एस.ई.डी.सी.एल. यांचे सुपरव्हीजन चार्जेस (1.30%) रु. 7560.87

---

उपरोक्त विकल्पापेक्षा दुसऱ्या विकल्पाचा वापर करतांना वास्तविक रु. 581605.33 अंदाजपत्रकीय मूल्य निविदेद्वारे जाहीर करून त्यावर निविदाधारकांचे दर प्राप्त करणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात एम.एस.ई.डी.सी.एल. यांना प्रदानायोग्य प्रथम विकल्पातील क्र. अ ते ड मधील रु. 74022.07 व इतर तत्सम बाबींच्या मूल्याच्या समावेशासह रु. 6,89,995/- इतके अंदाजपत्रकीय मूल्य अनियमितपणे खाजगी कंत्राटदारासाठी वर्तमानपत्राद्वारे प्रसिध्द करण्यात आले. अ ते ड मध्ये मुळातच कंत्राटदाराचा नफा, त्याचे सुपरव्हीजन चार्जेस (एकूण रु. 52872.79) अंतर्भूत असतांना व विमा व साहित्यावरील आकस्मिक खर्च (एकूण रु. 21149.28) ही बाब एम.एस.ई.डी.सी.एल. यांचेशी संबंधीत असतांना या चारही बाबी मनपाने जाहीर निविदेतील कामाच्या अंदाजपत्रकीय मूल्याचा भाग होणे वित्तीय औचीत्याशी सुसंगत नाही.

परिणामी रु. 74022.07 त्यावर कंत्राटदाराचा 3% अधिक दर रु. 2220.66 याप्रमाणे रु. 76242.72 चे कंत्राटदारास अनावश्यक प्रदान झाले असून जबाबदारी निश्चित करून वसुली करावी.

2) वरीलप्रमाणे कंत्राटदारास विमा रक्कम रु. 5287.32 व त्यावरील 3% याप्रमाणे एकूण रु. 5595.95 चे अनियमितपणे प्रदान झाले असले तरी प्रत्यक्षात कामाचा विमा काढण्यात आल्याचे दिसत नाही.

वास्तविक विमा काढणे ही कंत्राटदाराची जबाबदारी असून त्याचा भार त्यानेच सहन करावयाचा आहे. शिवाय राज्य शासनाच्या विमा संचालनालयाच्या दि. 03/11/2003 च्या पत्रानुसार व महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विमा31098/प्र.क्र.2889/शासकहमी, दि. 19/08/1998 नुसार शासकीय महसूल वाढविण्याचे दृष्टीने व मनपाचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित राहण्याचे दृष्टीने कंत्राटदाराने शासकीय विमा काढणे आवश्यक होते.

मनपाचे देयकातून 1% रकमेचे शासकीय विमा रकमेची उपरोक्त पत्रातील परी.क्र. 3 नुसार वसुली केली असली तरी कंत्राटदारास विमा रकमेचे रु. 5595.95 झालेल्या प्रदानाच्या रकमेसंदर्भाने पुरेशी काळजी घेण्यात आलेली नाही.



Scanned by CamScanner

3) तांत्रिक मान्यतेच्या आदेशास संलग्न असलेल्या एल.टी. लाईन च्या (आयटम कोड क्र. 1401A) रु. 472584.22 च्या दर पृथःकरणानुसार रु. 3,88,476/- मूल्याची एल.टी. एरीअल बंच केबल ही 3x70 या तपशीलास (Specification) तांत्रिक मान्यता प्राप्त असतांना कंत्राटदाराच्या दिनांकरहित देयक व मोजमाप पुस्तिकेतील नोंदीनुसार 3x50 या तपशीलाचे रु. 388476/- मूल्याचे साहित्य बसविले असे दिसते. असे असतांना एम.एस.ई.डी.सी.एल. यांचेकडील कनिष्ठ अभियंता यांनी 24.01.2014 रोजी दिलेल्या व कार्यालयाच्या जावक संदर्भाशिवाय असलेल्या प्रमाणपत्रात सदरचे काम देखरेखीखाली व अंदाजपत्रकानुसार साहित्य लावून पूर्ण केल्याचे चुकीचे प्रमाणित केले. याकडे मनपातील सक्षम अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असून उचित कार्यवाहीसह एम.एस.ई.डी.सी.एल. यांचेकडून त्यास तांत्रिक मान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे.

4) सदर कामासाठी कंत्राटदाराशी विहित पद्धतीनुसार करारनामा करण्यात आला नाही असे दिसते. नस्तीमध्ये दि. 23/09/2014 च्या टिपणीत उल्लेखित दि. 18/12/2012 चा करारनामा "हॉस्पिटल वीज तक्रार निवारण केंद्र एरीयातील आवसार वार्ड येथील विद्युतीकरणाच्या कामाशी संबंधीत असून त्याची प्रत नस्तीमध्ये उपलब्ध आहे. या लागू नसलेल्या करारनाम्याचा उल्लेख करून त्यामधील अटीनुसार काम करण्यास कंत्राटदारास दि. 13/12/2013 च्या आदेशान्वये कार्यादेश देण्यात आला. सदर कार्यवाही अनुचित असून वैध करारनामा नसल्यामुळे कंत्राटदाराचे हितसंबंध जोपासणारी व मनपास अहितकारक असल्याचे दिसते.

5) वरीलप्रमाणे लागू ठरविलेल्या करारनाम्यातील अट क्र. 3 नुसार कामाची मुदत 30 दिवस असून त्यानंतर रु. 100/- प्रतिदिवस दंडाची तरतूद आहे. त्याप्रमाणे काम दि. 12/01/2014 पर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु या मुदतीत ते पूर्ण झाल्याचा स्पष्ट उल्लेख अभिलेख्यात उपलब्ध नाही. मोजमाप पुस्तिका व लाईट निरीक्षक यांचे विहित मुदतीत काम झाल्याचे प्रमाणपत्र यावरील स्वाक्षऱ्या दिनांकरहित आहे. एम.एस.ई.डी.सी.एल. यांच्या कनिष्ठ अभियंत्याने दि. 24/01/2014 नमूद करून स्वाक्षरी केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण झाल्याच्या चुकीच्या प्रमाणपत्रावर त्यांच्या कार्यालयाचा जावक संदर्भ नमूद नाही. कंत्राटदाराच्या देयकावर दिनांक नमूद नाही. तसेच नस्तीत काम झाल्याबाबत व देयकाचे प्रदान करणेबाबतची टिपणी दि. 10/09/2014 रोजी उपायुक्तांकडे सादर केली आहे. कामाच्या पूर्णत्वाच्या अपेक्षित कालावधीतही संबंधीत शिर्षाखाली रु. 15 लाख अंदाजे अनुदान उपलब्ध होते.

6) तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अ.क्र. 4 मधील सूचनेप्रमाणे लाईन मटेरियल साठी खरेदी केलेल्या साहित्याच्या मूळ पावत्या, देयके अभिलेख्यात उपलब्ध असणे आवश्यक आहे. परंतू तसे नसल्यामुळे व साहित्याच्या गुणवत्तेची तपासणी झाल्याची नोंद आढळत नसल्यामुळे प्रत्यक्ष लावलेल्या साहित्याच्या गुणवत्तेबाबत शंका निर्माण होण्यास वाव आहे. असे साहित्य हमीच्या कालावधीपुर्वीच निकामी किंवा नादुरुस्त झाल्यास त्याच्या भरपाईची जबाबदारी निश्चित करण्यासाठी कोणतीही पूर्व दक्षता घेतल्याचे दिसत नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता सदरचे काम विहित मुदतीचे आत पूर्ण झाले नसून मोघम प्रमाणपत्रे दुर्लक्षित केल्यास माहे सप्टेंबर 2014 मध्ये 8 महिने विलंबाने ते पूर्ण झाले आहे असे दिसते. त्यामुळे दंडाच्या दरानुसार रु. 24,000/- कंत्राटदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

यासंदर्भात अर्धसमास पत्र क्र. 12 दि. 17/04/2016 ला अनुसरून समर्पक अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 13, Hmm No : 12)

## 17 बि. ओ. टी. तत्वावरील पाणीपुरवठा योजनेच्या कराराचा भंग करुन नागरिकांना पाणी पुरवठयाची सोय उपलब्ध न करणे व मनपाचे आर्थिक नुकसानीच्या संभावनेबाबत.



Scanned by CamScanner

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 09

*लेखा शीर्ष : 111 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 93F*

गुंतलेली रक्कम रु. 18100000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 626314.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 626314.00/-

*महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्रं. नापापु-1001/प्र.क्रं.503/पापु-22 दिनांक 12 जून 2001 चे निकषानुसार चंद्रपूर शहर महानगरपालिका अंतर्गत नागरिकांना पाणीपुरवठा करणे याकरीता पाणीपुरवठा योजना खाजगी कंत्राटदार मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. चंद्रपूर यांना BOT तत्वावर देण्यात आली. परंतु शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार कार्यवाही न झाल्याने मनपा निधीची झालेली आर्थिक हानी तसेच करारात नमुद अटी व शर्तींची पूर्तता न करणे, मनपा कार्यालयास देय असलेल्या रकमा विलंबाने भरणे, विलंब कालावधीसाठी नियमानुसार व्याज वसूल न करणे इत्यादी प्रकरणी अनियमितता आढळून येते.*

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 189 (2) ( क) अन्वये चंद्रपूर शहर महानगर पाणीपुरवठा योजना मे.उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांना सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 17 दिनांक 18.08.2011 अन्वये निविदेतील अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्याने (करारात नमूद) रु. 181.00 लक्षाचा करार करण्यात आला असून मनपा चंद्रपूर यांचे पत्र क्र.चंमनपा/पापुवी/11/1767 दि. 28.09.2011 अन्वये पाणीपुरवठा योजना मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. चंद्रपूर यांना दिनांक 01.10.2011 पासून हस्तांतरीत करण्यात आली. सन 2014-2015 चे लेखापरीक्षणादरम्यान उपलब्ध झालेल्या अभिलेख्याची पडताळणी केली असता सदर प्रकरणी अनियमितता झाल्याचे आढळून आले. सदर योजनेतंर्गत मनपाचे संबधीत कंत्राटदारावर नियंत्रण नसल्याने कंत्राटदारास करारातील तरतुदींचा भंग करण्यात वाव मिळाला असे दिसते. याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. पूर्वीचे कंत्राटदार मे.गुरुकृपा असोसिएटस अँड कं. प्रा.लि. चंद्रपूर यांचेशी दि. 23.02.2004 ते 30.09.2011 या कालावधीपर्यंत चंद्रपूर शहरास पाणीपुरवठा करणेबाबत करार करण्यात आला होता. परंतु संबंधीत कंत्राटदाराने कराराचा कालावधी पूर्ण न करताच शहरास माहे सप्टेंबर – 2011 पाणीपुरवठा करणे बंद केले. कंत्राटदाराने निविदेतील अटी व शर्तींची पूर्तता केली नाही व कराराचा भंग केला. कंत्राटदाराने कराराचा भंग केल्या प्रकरणी त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करून दंड वसूल केल्याचे आढळून आले नाही, तसेच पूर्वीच्या कंत्राटदारास सुरक्षा ठेव परत करण्यात आली असल्याचे अर्धसमास पत्राच्या उत्तरात कळविले आहे. कराराचा भंग केल्याने सुरक्षा ठेव रक्कम जप्त करणे आवश्यक होते, परंतु तशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने मनपा निधीची हानी झाली असल्याचे दिसते.

2. मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. चंद्रपूर यांना सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 17 दिनांक 18.08.2011 अन्वये मंजुरी दिल्यानुसार दिनांक 01.10.2011 पासून पाणीपुरवठा योजना बि. ओ.टी. तत्वावर हस्तांतरीत करण्यात आली. कंत्राटदाराने पाणीपुरवठा योजना प्रकरणी निविदेत नमूद अटी व शर्तींची पूर्तता करण्यात आली असे नमूद असले तरी संबंधीत कंत्राटदाराची निविदा मंजूर करतांना निविदेतील अटी व शर्तींची पूर्तता केल्याप्रकरणी लिफाफा क्र.1 सोबत जोडण्यात आलेले दस्तऐवजामध्ये पाणीपुरवठा योजनेसंबंधी कंत्राटदारास पाणीपुरवठा करणेबाबत पूर्वानुभव इत्यादींच्या प्रती तपासणीस उपलब्ध झाल्या नाहीत.

3. उक्त कंत्राटदार यांचेकडून सुरक्षा ठेव म्हणून स्वीकारण्यात आलेली रु. 100 लक्ष च्या बँक गॅरंटीची वैधता तसेच नुतनीकरण याबाबत पडताळणी केली असता बँक गॅरंटीचे नुतनीकरण विलंबाने केले असल्याचे निदर्शनास आले. दिनांक



Scanned by CamScanner

31.10.2012 ला संपलेल्या बँक गॅरंटीचे नुतणीकरण दिनांक 12.12.2012 ला करण्यात आले. तसेच का.अ. पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांना इरई धरणातून पाणी उचल केल्या प्रकरणी सन 2014 ची देय असलेली व मे. उज्वल कंस्ट्रक्शन क.लि. चंद्रपूर यांचेकडून वसुल करावयाची बिगर पाणी पटटी देयकाची रक्कम रु. 15,92,325/- एवढी रक्कम कंत्राटदाराच्या बँक गॅरंटीतून वसुल करुन मनपा निधीत जमा केली.

4. मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांनी दि. 01.04.2011 पूर्वीच्या तसेच दि. 01.10.2011 पर्यंतच्या मनपास वसुल करावयाची पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम कंत्राटदाराने वसूल केली परंतु मनपा कार्यालयाकडे जमा केलेली नाही. असे अभिलेख्यावरुन निदर्शनास आले. या प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 86 दिनांक 27.06.2016 मधील मुददा क्रं. 4 अन्वये विचारणा केली असता, सदर माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविले. याबाबतचा तपशील उपलब्ध करुन देण्यात आला नसल्याने पडताळणी करता आली नाही.

5. उक्त कंत्राटदार यांना पाणीपुरवठा योजना दि. 01.10.2011 ला हस्तांतरीत करण्यात आली. करारनाम्यातील अट क्र. 112 नुसार दर तीन वर्षांनी 10% पाणीपट्टी करात वाढ करण्याबाबत नमूद असतांना सर्वसाधारण सभेची दरवाढ प्रकरणी मान्यता नसतांना कंत्राटदारने स्वत:चे अधिकारात सन 2013 मध्ये पाणी करात वाढ करुन कराराचे उल्लंघन केले असून नागरिकांकडून जादा दराने पाणीपट्टी कर वसूल केला . वाढीव पाणीपटटी करापोटी कंत्राटदाराने किती पाणीपटटी कर वसुल केला याबाबत अर्धसमास पत्रातील मुददा क्रं. 5 अन्वये विचारणा केली असता याबाबत झालेल्या कार्यवाहीची नस्ती उपलब्ध नाही असे कळविले . कंत्राटदाराने कराराचा भंग केल्याने त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करुन दंड वसुल करणे आवश्यक होते, परंतु तशी कार्यवाही करण्यात आली नाही. याप्रकरणी अंतर्गत लेखापरिक्षण करुन जादा वसुल करण्यात आलेला पाणीपटटी कराची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे

6. करारनाम्यातील अट क्र. 16 नुसार कंत्राटदाराने प्रत्येक वर्षी 1.50 कि. मी. नविन पाईप लाईन टाकणेबाबत करारनाम्यात नमुद आहे. कंत्राटदाराने दिनांक 01.10.2011 नंतर 5 वर्षामध्ये किती कि.मी. नविन पाईप लाईन टाकली, याबाबत अभिलेख्यात काहीही नमुद नाही. तसेच चंशमनपा/पापूवि-2015/3025 दिनांक 15.01.2015 चे पत्रातील मुददा क्रं. 31 नुसार कंत्राटदाराने वर्षनिहाय किती पाईप लाईन टाकली, याबाबत कंत्राटदारांने माहिती पुरविली नाही असे नमुद आहे. उक्त पाईपलाईन मनपाची मालमत्ता असल्यामुळे त्याची माहिती मनपाकडे असणे व त्याची नोंद मोजमापासह मोजमाप पुस्तकात असणे अत्यावश्यक होते. पर्यायाने प्रत्यक्षात अट क्रं. 16 नुसार प्रत्येक वर्षी विहित काम झाले नसल्याचीही शक्यता आहे. नागरीकांना पाण्याची सोय उपलब्ध करण्यासाठी पाईपलाईन टाकण्याचे कामावर मनपाचे दुर्लक्ष होणे अतिशय गंभीर व आर्थिक हानीची शक्यता दर्शविणारी बाब आहे, असे दिसून येते.

7. मुद्रांक शुल्काचा कमी दराने भरणा करणे. ( कराराची रक्कम रु. 1,81,00,000/- )

मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांना चंद्रपूर शहरासाठी पाणी पुरवठा योजना दिनांक 01.10.2011 पासून 10 वर्षासाठी बि. ओ. टी. तत्वावर चालविण्यासाठी रु. 1,81,00,000/- लक्षचा करार करुन हस्तांतरीत करण्यात आली. मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांनी करारनामा रु. 500/- चे मुद्रांक शुल्कावर सादर केला. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 नुसार मुद्रांक शुल्क प्रथम रु.10 लक्षसाठी रु. 100/- व पुढील प्रत्येक एक लक्षास रु. 100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क भरणेबाबत तरतूद आहे.

मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांनी रु. 181 लक्ष करीता रु. 17200/- चे मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असताना रु.500/- च्या मुद्रांकावर करारनामा केल्याने रु. 16700/- इतक्या रकमेची महाराष्ट्र शासनाची महसूल हानी झाली. सदर रकमेची वसूली करुन राज्य शासनाच्या खाती जमा करावी.

8. मनपा कार्यालयाने आकारण्यात आलेल्या दंडाच्या रकमेचा भरणा न केल्याने मनपा निधीची झालेली हानी.

( करारनाम्यातील अटीनुसार )

चंद्रपूर शहराला पाणी पुरवठा खाजगी कंत्राटदारांना बि.ओ.टी. तत्वावर चालविण्याकरीता मे.उज्वल कन्स्ट्रक्शन कं.



Scanned by CamScanner

अटी व शर्तीचे उलघंन झाल्यास कंत्राटदारावर दंडात्मक
लि. व मनपा प्रशासक यांच्यात झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचे उलघंन झाल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करुन दंड वसुल करणे आवश्यक आहे. मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांनी करारनाम्यातील अटी व शर्तीचे वारंवार उलघंन केल्याचे नस्तीतून दिसून येते. याप्रकरणी मनपा कार्यालयाने कंत्राटदारास वारंवार पत्र देवूनसुध्दा माहिती न पुरवणे, भरणा करावयाच्या रक्कमा विलंबाने भरणे, दंडाच्या रकमा जमा न करणे, नागरिकांना पाण्याचा पुरेशा पुरवठा न करणे अथवा अनियमित करणे, कर्मचा-यांचा विमा न उतरविणे इ. प्रकरणी कंत्राटदाराने करारनाम्यातील अटी व शर्तीचे वारंवार उलघंन केल्याने चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांचे पत्र क्र.पू. 1006 दिनांक 15.08.2015 अन्वये कंत्राटदाराने करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याने परि. क्र. 10 नुसार रु. 25000/-, परि. क्र. 53 नुसार करारातील अट क्र. 109 चे उलघंन केल्याप्रकरणी रु. 10000/-, परि.क्र.63 अन्वये रु. 50000/- व परि. क्र.7 नुसार रु. 41000/- व पत्र दिनांक 23.09.2015 मधील परि. क्र. 15 नुसार रु. 51000/- दंड आकारण्यात आला असुन दंडाची रक्कम मनपा निधीत जमा करणेबाबत निर्देश देवूनही एकूण दंडाची रक्कम रु. 177000/- चा भरणा न केल्याने मनपा निधीची हानी झाली.

9. मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांनी निविदेतील अटी व शर्ती तसेच करारनाम्यानुसार ठरल्याप्रमाणे प्रत्येक वर्षी देय असलेली रक्कम ऑक्टोबर महिन्यात भरणा करावयाची असतांना कंत्राटदाराने देय असलेल्या रक्कमेचा भरणा वारंवार विलंबाने केला आहे. तसेच मे. उज्वल कंस्ट्रक्शन कं. लि. यांनी मनपा कार्यालयास सादर केलेला धनादेश क्र. 000388 दिनांक 30.10.2015 हा वटविण्यासाठी बँकेत सादर केला असता पुरेश्या निधी अभावी अनादरित झाला. या प्रकरणी हि निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस ॲक्ट 1881 कलम 138 अन्वये कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षित होते, तशी कार्यवाही करण्यात आली नाही. कंत्राटदाराने करारात नमुद अटी व शर्तीनुसार मनपास देय असलेल्या रकमा मुदतपूर्व भरणा करणे आवश्यक असतांना विलंबाने भरणा करण्यात आल्या त्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करुन विलंब कालावधीकरीता व्याज वसूल करणे आवश्यक असतांना व्याज वसूल करण्यात आलेले नाही. विलंब कालावधीकरीता कंत्राटदाराकडून खालीलप्रमाणे व्याज वसूल करणे आवश्यक आहे.

( आकडे रुपयात )

| रक्कमेचा भरणा करावयाचा दिनांक | भरणा करावयाची रक्कम | भरणा करण्यात आलेली रक्कम | रक्कम भरणा केल्याचा दिनांक | विलंबाचे दिवस | नियमानुसार विलंब कालावधीसाठी वसूल करावयाची व्याजाची रक्कम 8 टक्के दराने |
|---|---|---|---|---|---|
| 01.10.2011 | 33,00,000 | 15,00,000<br>5,00,000<br>13,00,000 | दि.29.03..2012<br>दि.22.07.2011<br>दि.20.07.2012 | 181<br>----<br>294 | 59,507<br>------<br>83,770 |
| 01.10.2012 | 23,00,000 | 8,00,000<br>15,00,000 | दि.20.11.2012<br>दि.31.03.2013 | 51<br>182 | 8,942<br>59,836 |
| 01.10.2013 | 24,00,000 | 24,00,000 | दि.06.03.2014 | 157 | 82,586 |
| 01.10.2014 | 25,00,000 | 25,00,000 | दि.20.12.2014 | 81 | 44,384 |
| 01.10.2015 | 14,00,000 | निरंक | रक्कम अप्राप्त | 305<br>दि.31.7.16 पर्यंत | 93,589 |
| एकूण | | | | | 4,32,614 |



Scanned by CamScanner

**18 अंतर्गत भरतीप्रक्रियेव्दारे निवड करण्यात आलेल्या आरोग्य निरिक्षकास शासन अधिसुचना दिनांक 22.04.2009 च्या परि.8 मधील जोडपत्र-3 चा चुकीचा लाभ देवून वेतन निश्चिती करताना झालेले अतिप्रदानाबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : 113 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 93अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 109792.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 109792.00/-

***नगरपरिषदच्या नियमित सेवेत असलेल्या श्री. संतोष गर्गेलवार, सफाई कुली यांना अंतर्गत भरतीव्दारे आरोग्य निरीक्षक या पदावर निवड केल्यावर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक 22.04.2009 च्या नियम 8 मधील जोडपत्र-3 नुसार नविन पदाच्या वेतन श्रेणी रु. 5200-20200 ग्रेड पे 2400 मध्ये वेतननिश्चिती करण्यात आल्याने संबंधीतास अतिप्रदान झाले आहे.***

श्री. संतोष गर्गेलवार यांच्या सेवपुस्तकातील नोंदीनुसार त्यांची नगर परिषद, चंद्रपूर यांचे आदेश क्र. नप/मुली/साप्रअ/103/98 दिनांक 07.05.2003 अन्वये सफाई कुली या पदावर वेतनश्रेणी रु. 2550-55-2660-60-3200 मध्ये प्रथम नियुक्ती झाली असून ते दिनांक 08.05.2003 ला मध्यान्हपूर्व रुजू झाले. चंद्रपूर नगर परिषद, सर्वसाधारण सभा ठराव क्र. 43 दिनांक 28.10.2010 च्या अनुषंगाने त्यांची नगर परिषद, चंद्रपूर यांचे आदेश क्र. चंनप/मु.अ./साप्रआ/1/10 दि. 10.11.2010 अन्वये वेतन श्रेणी रु. 4440-7440 ग्रेड-पे 1300 मधून वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड-पे 2400 मध्ये आरोग्य निरीक्षक पदावर अंतर्गत भरती प्रक्रियेव्दारे निवड करण्यात आली. यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. महाराष्ट्र शासन वित्त विभाग मुंबई अधिसूचना क्र. वेपुर/1209/प्र.क्र.27/सेवा-9 दिनांक 22/04/2009 मधील परिच्छेद 8 जोडपत्र-3 चा लाभ दिनांक 01 जानेवारी 2006 किंवा त्यानंतर सरळ सेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना देय आहे. श्री. संतोष गर्गेलवार, आरोग्य निरीक्षक यांची मुळ नियुक्ती 08.05.2003 ची असून ते दिनांक 11.11.2010 ला वेतन श्रेणी 4440-7440 ग्रेड-पे 1300 मध्ये रु.5970/- वेतन घेत होते. पदाच्या जबाबदारील वाढ होत असली तरी सेवेत नियुक्ती दिनांक 01 जानेवारी 2006 पूर्वीची असल्याने जोडपत्र-3 लागू होणार नाही. परंतु सदर प्रकरणी श्री. गर्गेलवार यांची नवीन पदावरील दिनांक 11.11.2010 ची <u>नियुक्ती सरळ सेवेव्दारे</u> प्रारंभिक पदावर झाली नसल्याने वरील नियमाचा लाभ देय नसून दिनांक 11.11.2010 रोजी करण्यात आलेली वेतननिश्चिती चुकीची ठरते.

संबंधीताच्या नवीन पदावरील नियुक्तीमुळे जबाबदारीत, कर्तव्यात वाढ झाली असल्यामुळे म. ना. से. (सुधारित वेतन) नियम 2008 मधील नियम 3 नुसार 3% वेतनवाढीचा लाभ देवून दिनांक 11.11.2010 रोजी वेतननिश्चिती करुन त्या दिनांकापासून आजतागायत झालेल्या अतिप्रदानाची वसूली क्रमप्राप्त ठरते.

दिनांक 11.11.2010 ला जुन्या पदावरील रु. 4440-7440 ग्रेड वेतन रु. 1300 या वेतन श्रेणीतील



Scanned by CamScanner

वेतन – रु. 5970/-

अंतर्गत भरतीव्दारे निवडीचे पद – आरोग्य निरीक्षक.

रुजू दिनांक – 11.11.2010.

नवीन पदाची वेतन श्रेणी – रु. 5200-20200 ग्रेड पे रु.2400.

| कालावधी | देण्यात आलेले वेतन + ग्रेड पे. + घर भाडे भत्ता | देय असलेले वेतन + ग्रेड पे. + घर भाडे भत्ता | वसुलपात्र रक्कम |
|---|---|---|---|
| 11.11.10 ते 30.06.11 | 7510 + 2400 + 991 = 10901 | 6190 + 2400 + 859 =9449 | 1452 x 7 महिने 20 दिवस =11132 |
| 01.07.11 ते 30.06.12 | 7810 + 2400 + 1021 =11231 | 6450 + 2400 + 885 =9735 | 1496 x 12 महिने = 17952 |
| 01.07.12 ते 30.06.13 | 8120 + 2400 + 1052 =11572 | 6720 + 2400 + 912 =10032 | 1540 x 12 महिने = 18480 |
| 01.07.13 ते 30.06.14 | 8440 + 2400 + 1084 =11924 | 7000 + 2400 + 940 =10340 | 1584 x 12 महिने = 19008 |
| 01.07.14 ते 30.06.15 | 8770 + 2400 + 1117 =12287 | 7290 + 2400 + 969 =10659 | 1628 x 12 महिने = 19536 |
| 01.07.15 ते 30.06.16 | 9110 + 2400 + 1151 =12661 | 7580 + 2400 + 998 =10978 | 1684 x 12 महिने = 20208 |
| 01.07.16ते 31.08.16 | 9460 + 2400 + 1186 =13046 | 7880 + 2400 + 1028 =11308 | 1738 x 2 महिने = 3476 |
| एकूण | | | 109792/- |

(टिप - 1.कर्मचा-यांचे कर्तव्य व जबाबदारीत वाढ होत असल्याचे गृहीत धरून रकाना क्र. 3 मधील वेतन निश्चिती म.ना.से. (वेतन) 1981 चे नियम 11(1) नुसार करण्यात आली आहे. सदर वाढीबाबत मनपाचे स्तरावर खात्री करावी. 2. दि.01.08.2016 चे पुढील कालावधीनंतरची परिगणना मनपाने करावी.)

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 10 3 अन्वये अंतर्गत भरती प्रक्रियेव्दारे नियुक्त केलेल्या कर्मचा-याची वैयक्तिक नस्ती व अभिलेख उपलब्ध करून देण्यात कळविण्यात आले होते. परंतु अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने खुलासा करण्यात आलेला नाही. करिता परिच्छेद नोंदविण्यात आला.

DATDUBM6401 (Ref No : 26, Hmm No : 10)



Scanned by CamScanner

**19 श्री. महेश के. बारई, क.अ. यांच्या कार्यकारी अभियंता पदावरील पदोन्नतीस शासनाची मान्यता नसणेबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :123 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

**श्री. महेश के. बारई, कनिष्ठ अभियंता यांना कनिष्ठ अभियंता या पदावर 12 वर्ष नियमित सेवा झाल्याने आश्वासित प्रगती योजनेचा प्रथम लाभ म्हणून उपअभियंता पदाची वेतन श्रेणी देण्यात आली. सदर पदावर नियमित पदोन्नती न देता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचे पुर्व मान्यतेशिवाय कनिष्ठ अभियंता या पदावरुन थेट कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नती दिल्याने व अद्यापपर्यंत शासनाकडून मंजूरी अप्राप्त असल्याने अनधिकृतपणे वेतनाचे जादा प्रदान होत आहे.**

श्री. महेश के. बारई, हे नगर परिषद चंद्रपूर यांचे आदेश क्र. चंनपा/बांधकाम/57/901 दिनांक 20.08.1990 अन्वये कनिष्ठ अभियंता या पदावर रोजंदारी कर्मचारी म्हणून रुजू झाले. त्यानंतर नगर परिषद, चंद्रपूर यांचे नियुक्ती आदेश क्र. चंनपा/मुली/साप्रआ/104/98 दि. 22.12.1998 अन्वये वेतन श्रेणी रु. 1400-40-1800 EB 50-2300 या वेतन श्रेणीत कनिष्ठ अभियंता म्हणून दि. 01.01.1999 पासून नियमित सेवेत सामावून घेण्यात आले. यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. श्री. महेश के. बारई, यांना कनिष्ठ अभियंता या पदावर 12 वर्ष पूर्ण सेवा झाल्याने महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन – 1109/ प्र.क्र.44/सेवा-3 दिनांक 01.04.2010 नुसार दिनांक 01.01.2011 पासून उपअभियंता पदाची वेतन श्रेणी लागु करुन आश्वासित प्रगती योजनेचा प्रथम लाभ देण्यात आला. उपअभियंता या पदावर नियमित पदोन्नती न देता कनिष्ठ अभियंता या पदावरुन थेट कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर शासनाची मान्यता न घेता वेतन श्रेणी रु. 15600 – 39100 ग्रेड पे- 6600 मध्ये दिनांक 13.01.2014 पासून पदोन्नती दिल्याने गंभीर अनियमितता होवुन अतिप्रदान झाले.

2. श्री. महेश के. बारई हे स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधर असल्याने तत्कालिन नगरपरीषदेच्या स्थायी समिती सभा दिनांक 07.12.1999 चा ठराव क्र. 37 (ब) (वेळेवरील विषय) नुसार वेतन श्रेणी 1400-2300 ऐवजी वेतन श्रेणी रु. 2000-60-2300 EB 75-3200-100-3500 लागू करण्यात आली. तथापि, महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग शासन निर्णय क्र. सी.डी.एस. 1582/158/(215) आ(10) दि. 16 एप्रिल 1984 नुसार सुधारित वेतन श्रेणी लागू करतांना नगर विकास विभागाने त्यांचे अधिपत्याखालील कनिष्ठ अभियंत्याला उपरोक्त नुसार सुधारित वेतन श्रेणी लागू करतांना स्वतंत्र आदेश काढावेत असे नमूद आहे. परंतु श्री. महेश बारई यांना सुधारित वेतन श्रेणी लागू करतांना नगर विकास विभागाचे आदेश प्राप्त केल्याचे नस्तीत आढळून आले नाही किंवा सेवापुस्तकात तशी नोंद घेण्यात आली नाही. शासनाची मान्यता नसल्याने श्री. महेश के. बारई, कनिष्ठ अभियंता यांना देण्यात आलेली सुधारित वेतन श्रेणी तसेच पदोन्नती अनुज्ञेय ठरत



Scanned by CamScanner

नाही.

3. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम 1965 चे कलम 76(1) व (2) नुसार आढावा घेऊन मुख्याधिकारी, नगर परिषद चंद्रपूर यांचे पत्र क्र. चंनपा/मुली/साप्रआ/1636/05 दिनांक 22.03.2005 अन्वये सादर प्रस्तावानुसार नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्र. नपप्रसं/2005/6/32 सी.एच./1/प्रलंबित पदनी/प्र.क्र.877/2005/का-24/ दि. 17.12.2005 नुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. असंक1001/प्र.क्र. 29/2001 वित्तीय सुधारणा दिनांक 10.09.2001 मधील अटी व शर्तीला अनुसरुन नगर परिषद चंद्रपूरसाठी आकृतिबंध मंजूर करण्यात आला. त्यात बांधकाम विभागासाठी अभियंत्यांची खालील पदे मंजूर करण्यात आली.

| अ.क्र. | निवड श्रेणी | पद संख्या | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| 1 | नगर परिषद अभियंता निवड श्रेणी (PW) | 1 | 8000 – 13500 |
| 2 | नगर परिषद अभियंता निवड श्रेणी (PW-1) | 1 | 6500 – 10500 |
| 3 | नगर परिषद अभियंता निवड श्रेणी (PW-2) | 2 | 5500 – 9000 |
| 4 | नगर परिषद अभियंता निवड श्रेणी (PW-3 (II)) | 3 | 4500 – 7000 |

सदर आकृतिबंधास नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे पत्र दिनांक 05.06.2010 नुसार मुदतवाढ दिली.

त्यानंतर आयुक्त चंद्रपूर शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र. चंशमनपा/साप्रआ/10916/2012 दिनांक 17.07.2012 अन्वये सादर केलेल्या सुधारित प्रस्तावित आकृतिबंधास महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.चंमपा/2012/546/प्र.क्र.77/12/नवि-26 दिनांक 28 मे 2013 अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आकृतिबंधास मंजुरी दिली असून त्यात बांधकाम विभागाकरीता अभियंत्याची खालीलप्रमाणे पदे मंजूर आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| 1 | शहर अभियंता / कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | 1 | 15600-39100 ग्रे.पे. 6600 |
| 2 | उपअभियंता (स्थापत्य) | 4 | 15600-39100 ग्रे.पे. 5400 |
| 3 | शाखा अभियंता (स्थापत्य) | 4 | 9300-34800 ग्रे.पे. 4400 |
| 4 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 4 | 9300-34800 ग्रे.पे. 4300 |

4. नगर परिषद चंद्रपूरची सर्वसाधारण सभा दिनांक 18.08.2011 च्या मंजुर ठराव क्र. 36 चे अनुषंगाने वेळेवर आलेल्या विषयावर निर्णय घेवून वेतन श्रेणीचे लाभ देण्याकरिता ठराव मंजूर करून नगर परिषद चंद्रपूरने आदेश क्र. चंनप/मुअ/ साप्रआ/2011/1731 दिनांक 22.09.2011 अन्वये पाचव्या वेतन आयोगानुसार दिनांक 01.01.1999 पासून शाखा अभियंता पदाची वेतन श्रेणी रु. 2000-60-2300 EB 75 -3200-100-3500 तसेच सहाव्या वेतन आयोगाची वेतन श्रेणी रु. 6500-200-10500 मध्ये सुधारित वेतन श्रेणीचे लाभ पुर्वलक्षी प्रभावाने दिनांक 01.01.2006 पासून मंजूर करुन दिनांक 25.10.2011 पासून अस्तित्वात आलेल्या नवनिर्मित महानगरपालिकेवर दायित्व लादण्यात आले. नवनिर्मित महानगरपालिकेला सुरुवातीला काही वर्षे कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्याकरीता शासनाने निधी उपलब्ध करुन दिला असल्याने थकबाकी प्रदान करण्याकरीता शासनाच्या निधीचा वापर करण्यात आला असल्याची शक्यता आहे. सर्वसाधारण सभेमध्ये वेळेवर आलेल्या विषयावर ठराव मंजूर करुन आर्थिक लाभाचे निर्णय घेणे हे नियमाला अनुसरुन नाही, या प्रकरणी गंभीर स्वरुपाची अनियमितता आली.

5. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 (3) व (4) मधील तरतुदीनुसार शहर अभियंता या पदाकरिता



Scanned by CamScanner

नियुक्ती तसेच पदोन्नतीसाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची पुर्व मंजुरी आवश्यक आहे. वेतनमान किंवा वेतन संरचना यातील कोणतीही सुधारणा किंवा श्रेणी देण्याबाबत किंवा त्यातील सुधारणा (महागाई भत्ता वगळून) किंवा पदनामात बदल ह्या सर्व बाबी नवीन पदाची निर्मिती असल्याची मानण्यात येते. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण – 1711/690/प्र.क्र.125/11/नवी-28/दिनांक 21 जून 2011 अन्वये कोणत्याही पदाची निर्मिती, नियुक्ती किंवा पदाच्या वेतन श्रेणीतील सुधारणा याकरिता शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

6. श्री. महेश के. बारई कनिष्ठ अभियंता यांना नगर परिषद चंद्रपूर यांचे आदेश क्र. चंनप/नुअ/साप्रआ/ 2011/1731 दि. 22.09.2011 अन्वये 6 व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणी रु. 9300-34800 ग्रेड- पे 4400/- नुसार लाभ देण्यात आला. श्री. महेश के. बारई यांना कनिष्ठ अभियंता या पदावर 12 वर्षांची नियमित सेवा झाल्याने महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-1109/प्र.क्र.44/सेवा-3 दिनांक 01.10.2010 नुसार आश्वासित प्रगती योजनेचा प्रथम लाभ पदोन्नती श्रृंखलेतील उपअभियंता पदाच्या वेतनश्रेणीत रु. 15600-39100 ग्रे.पे. 5400/- दिनांक 01.01.2011 पासून लागू करण्यात आला त्यामुळे त्यांना पदोन्नती श्रृंखलेतील उपअभियंता पदावर प्रथम पदोन्नत करुन त्यानंतर विहित अर्हतकारी सेवा कालावधी पुर्ण झाल्यास शासनाच्या मान्यतेने कार्यकारी अभियंता पदावर उन्नत करणे नियमसंगत झाले असते.

परंतु श्री. महेश के. बारई यांना उपअभियंता पदावर नियमित पदोन्नतीचे आदेश न देता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम – 45 अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 09.01.2014 चा ठराव क्र. 106 नुसार दिनांक 13.01.2014 पासून कार्यकारी अभियंता या पदावर वेतन श्रेणी 15600-39100 ग्रेड-पे 6600 मध्ये महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाची पुर्व मंजुरी न घेताच शासन मंजुरीचे अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात माहे जून 2014 पर्यंत पदस्थापना दिली.

7. श्री. महेश के. बारई कनिष्ठ अभियंता यांना कनिष्ठ अभियंता या पदावरुन वेतन श्रेणी रु.15600-39100 ग्रेड-पे 6600 मध्ये शहर/कार्यकारी अभियंता या पदावर शासनाच्या पुर्व मंजूरीशिवाय पदोन्नतीचा लाभ देण्यात आल्याने सदर पदोन्नती नियमाला अनुसरुन नाही. प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु असल्याच्या दिनांकापर्यंतही सदरच्या पदोन्नतीस शासनाची मान्यता मिळालेली नसल्याने महाराष्ट्र महानगपालिका अधिनियमातील कलम 45 चे सरसकट उल्लंघन झाले असल्याचे स्पष्ट होते. पर्यायाने श्री. बारई यांना अनधिकृतपणे कार्यकारी / शहर अभियंता पद धारण करण्यास मुभा देण्यात येत असल्याचे दिसते. तसेच त्यांनी सदर पदाच्या अधिकार क्षेत्रातील विविध बांधकामे कामांना दिलेल्या तांत्रिक मंजू-या , परवानग्या सुध्दा अनधिकृत ठरतात. अधिनियमाचे कलम 45 (7) च्या परंतुकानुसार दि. 13.01.2014 नंतर प्रथम सदर महिन्याचा कालावधी वगळून दि. 13.01.2014 पासून झालेले वेतन व भत्याचे अनियमित प्रदानाबाबत उचित कार्यवाही करावी.

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 118 दिनांक 03/08/2016 नुसार विहीत मुद्यावरील माहिती सादर करण्यास कळविण्यात आले होते, परंतु विहीत कालावधीत अर्धसमास पत्राचे उत्तर सादर करण्यात आले नाही. करीता परिच्छेद नोंदविण्यात आला आहे.

DATDUBM6401 (Ref No : 28, Hmm No : 118)

***20 श्री. प्रकाश नारायण खोब्रागडे, सेवानिवृत्त (निवड श्रेणी अभियंता) यांना वेतनवाढ मंजूर नसतांना वेतनवाढ लाभ देणे, नक्षलग्रस्त एकस्तर पदोन्नती लाभानुसार निवृत्तीवेतनाची***



Scanned by CamScanner

**परिगणना करणे, तसेच निवृत्ती वेतन अंशदान व रजावेतन अंशदान शासनाकडे जमा न करणे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :123 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

> *श्री. प्रकाश नारायण खोब्रागडे, सेवानिवृत्त (निवड श्रेणी अभियंता) यांना वेतनवाढ मंजुर नसतांना वेतनवाढीचा लाभ देणे, नक्षलग्रस्त एकस्तर पदोन्नती अनुज्ञेय नसतांना त्या लाभानुसार निवृत्तीवेतनाची परीगणना करणे, तसेच निवृत्ती वेतन अंशदान व रजावेतन अंशदान शासनाकडे जमा न करणे, शासनाऐवजी मनपा निधीतून निवृत्तीवेतन विषयक लाभाचे प्रदान होणे या अनियमिततामुळे मनपा निधीचे नुकसान झाले आहे.*

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूरचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणादरम्यान सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तसेच निवृत्तीवेतन प्रकरणांची तपासणी करण्यात आली असता ,श्री. प्रकाश नारायण खोब्रागडे, सेवानिवृत्त (निवड श्रेणी अभियंता) यांचे प्रकरणी खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आढळून आली.

उक्त कर्मचाऱ्यास वेळोवेळी देण्यात आलेली पदोन्नती लाभ तसेच वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे -

i) मेकॅनिकल सुपरवायझर - दिनांक 09.12.1981 ला रुजू (प्रथम नियुक्ती)

3ऱ्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी रु. 290-10-390-15-465

सुधारित वेतनश्रेणी, दिनांक 09.12.1981 पासून रु. 395-15-500-20-700 25-900

सुधारित वेतनश्रेणी, दिनांक 09.12.1981 पासून रु. 425-15-560-20-900

4थ्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी दिनांक 01.01.1986 पासून रु.1400-40-1800 EB 60-2300

ii) शाखा अभियंता पदावर पदोन्नती - दिनांक 09.12.1986 (वर्ग -2 चा दर्जा)

वेतनश्रेणी रु. 2000-60-2300 EB 75-3200-100-3500

सुधारित वेतनश्रेणी रु. 6500-200-10500

iii) प्रथम कालबध्द पदोन्नती - दिनांक 01.08.2001

रु. 7450-225-11500) (उपअभियंता पदाची वेतनश्रेणी)

सुधारित वेतनश्रेणी ( 5 वा वेतन आयोगानुसार) - रु. 8000-275-13500

अभियंता पदावर नगरपरिषदच्या आदेशान्वये पदोन्नतीने पदस्थापना, दिनांक 31.05.2011

वेतनश्रेणी रु. 9300-34800 ग्रेड-पे रु. 5400

iv) शासन आदेशान्वये राज्य संवर्गात समावेशन - दिनांक 01.01.2008 पासून (निवडश्रेणी अभियंता PWD)



Scanned by CamScanner

पद उन्नत झाल्याने वेतन निश्चिती - वेतनश्रेणी रु.15600-39100 ग्रेड-पे रु. 5800

v) नक्षलग्रस्त एकस्तर पदोन्नतीचा लाभ - दिनांक 01.01.2008 पासून (वित्त विभाग शा. नि.दि.05.08.02)

वेतनश्रेणी रु.15600-39100 ग्रेड-पे रु. 6600

vi) आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ - दिनांक 01.08.2013

वेतनश्रेणी रु. 5600-39100 ग्रेड-पे रु. 6600,

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत -

1) <u>सेवाखंड नियमित न होणे</u> - श्री.प्रकाश नारायण खोब्रागडे, सेवानिवृत्त (निवड श्रेणी अभियंता) यांना दिनांक 9.12.1981 ते 31.12.1984 पर्यन्त वेळोवेळी तात्पुरत्या स्वरुपाचे नियुक्ती आदेश देण्यांत आले. त्यानंतर खंड देवुन वेळोवेळी नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले. सदरचा खंड कशाप्रकारे नियमित करण्यात आला, याबाबतची नोंद सेवापुस्तकात नाही. खंड कालावधी नियमित न करताच संपूर्ण कालावधी निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य धरण्यात आला. तसेच म.ना.से. (वेतन) नियम 1981 मधील नियम 37 नुसार सक्षम प्राधिकारी दक्षता रोध मंजूर करणार नाही तोपर्यंत वेतनवाढ देय नाही. दिनांक 01.12.1991 ला मंजूर करण्यात आलेली वेतनवाढ रु. 2300/- वर दक्षता रोध पार करतांना सक्षम प्राधिकारी यांची मान्यता नसतांना तसे मंजुरीचे आदेश नसतांना वेतनवाढ देण्यात आली. परिणामी पुढील वेतनवाढी प्रभावित होत असून 5 व्या वेतन आयोगानुसार दिनांक 01.01.1996 ला करण्यात आलेली निश्चिती चुकीची ठरते.

2) <u>वेतनवाढी मंजुरीची नोंद नसणे</u> - दिनांक 1.12.1992, दि. 1.12.1994 व दिनांक 1.8.2006 ला वेतनवाढीची सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली. परंतु कार्यालय प्रमुखाने वेतनवाढीस मंजूरी दिल्याबाबत स्वाक्षरी नाही. म्हणजेच वार्षिक वेतनवाढी मंजूर नसताना त्या विचारात घेवून पाचव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करण्यात आल्याने दिनांक 1.1.1996 ची वेतननिश्चिती चुकीची ठरते.

3) <u>वेतन निश्चितीमधील अतिप्रदानाची वसुली न करणे</u> - दिनांक 01.01.2008 पासून राज्य संवर्गात समावेशन झाल्याने शाखा अभियंताऐवजी नगरपरिषद निवडश्रेणी (PWD) अभियंता म्हणून पद उन्नत झाल्याने वेतनश्रेणी 15600-39100 ग्रेड पे 5800 मध्ये वेतननिश्चिती करण्यात आल्याने अतिप्रदान झाले. श्री. खोब्रागडे यांना उन्नत पदाची वेतनश्रेणीमध्ये ग्रेड पे रु.5400/- देय असतांना रु. 5800/- देण्यात आल्याने चंद्रपूर शहर महानगरपालिका यांचे आदेश दिनांक 29.11.2013 नुसार वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली. परंतु अतिप्रदानाची वसुली करण्यात आल्याची नोंद सेवापुस्तकात नाही.

4) <u>अनुज्ञेय नसताना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणे</u> - श्री. प्रकाश नारायण खोब्रागडे, सेवानिवृत्त यांना पुढीलप्रमाणे पदोन्नत्या देण्यात आल्या -

(i) प्रथम पदोन्नती - शाखा अभियंता (दि.09.12.1986)

(ii) प्रथम कालबद्ध पदोन्नती - उपअभियंता पदाची वेतनश्रेणी (दि.01.08.2001)

(iii) दुसरी पदोन्नती - समावेशनाद्वारे निवड श्रेणी अभियंता (दि.01.08.2001)

(iv) आश्वासित प्रगती योजनेचा लाभ - रु. 15600-39100 ग्रेड पे रु. 6600 (दि.01.08.2013 रोजी)

वरील क्र. 4 वरील दि.01.08.2013 पासूनचा लाभ वित्त विभाग शासन निर्णय दि.01.04.2010 नुसार अतिरिक्त ठरत असल्यामुळे त्यांना दिलेला रु.6600 ग्रे.वे.सह वरिष्ट वेतन श्रेणी देय होत नाही.

5) <u>अंशदानाचा शासनाकडे भरणा न करणे</u> - श्री. प्रकाश ना. खोब्रागडे, सेवानिवृत्त (निवड श्रेणी अभियंता) यांना नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्र.नपप्रसं/कक्ष-5/नि.श्रे.व श्रे.अ./संवर्ग अंतिम समावेशन/2010, दिनांक 15.3.2011 अन्वये दि.01.01.2008 पासून राज्यस्तरीय नगर परिषद संवर्गात समावेशन झाले असल्याने संबंधित



Scanned by CamScanner

नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी मुळ सेवाशर्ती नियम, 2006 मधील नियम 9 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 मध्ये विहित केल्यानुसार सामावून घेण्यात आलेल्या कर्मचा-यांचे रजा वेतन अंशदान तसेच मुळ सेवाशर्ती नियम, 2006 मधील नियम 11 अन्वये कर्मचा-याने नगरपरिषद/ महानगरपालिकेमध्ये केलेल्या आधीच्या सेवेचे देय असलेले निवृत्तीवेतन अंशदान, रजा वेतन अंशदान तसेच भविष्य निर्वाह निधी नियम 1998 अन्वये शासन विनिर्दिष्ट करील अशा दराने भविष्य निर्वाह निधीची रक्कम व्याजासह राज्य शासनाकडे संबंधित नियोक्त्याने भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन नगरपरिषद व महानगरपालिका, चंद्रपूरने रजा वेतन अंशदान, निवृत्ती वेतन अंशदान व भविष्य निर्वाह निधी इत्यादी रक्कमा शासनाकडे जमा केल्या नाही.

6) <u>एकस्तर वेतनश्रेणीतील वेतनानुसार निवृत्तीवेतन अदा करणे</u> - महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मुंबई शासन परिपत्रक क्र.सेनिवे-2013/प्र.क्र.46 सेवा-4, दिनांक 17.12.2013 अन्वये आदिवासी व नक्षलग्रस्त भागातून दिनांक 1.1.2006 रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना निवृत्तीच्या दिनांकास ते ज्या मुळ पदावर कार्यरत आहेत (एकस्तर पदोन्नतीचे पद वगळून) त्या पदाच्या पे बॅण्डमध्ये ते घेत असलेले वेतन अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतनावर निवृत्तीवेतनाची परीगणना करण्याचे निर्देश आहेत, म्हणजेच एकस्तर वेतन श्रेणीतील वेतनावर निवृत्तीवेतन देय नाही. ज्या कर्मचा-यांना अशा परिगणनेनुसार अनुज्ञेय निवृत्तीवेतनापेक्षा जास्त निवृत्तीवेतन अदा करण्यात आले असेल, अशा प्रकरणी निवृत्तीवेतन धारकाकडून जास्त अदा केलेले निवृत्तीवेतन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, 1982 मधील नियम क्र.134 (ए), (दिनांक 30.7.2007 नुसार केलेली सुधारणा) नुसार वसुल करणेबाबत निर्देश आहेत. उक्त अधिका-याच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता एकस्तर पदोन्नतीचा लाभ/ आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ विचारात घेवून निवृत्तीवेतनाची परीगणना व प्रदान केल्याने निवृत्तीवेतन विषयक लाभापोटी अतिप्रदान झाले आहे. असे असताना अद्यापपर्यंतही वसुलीची कार्यवाही करण्यात आली नाही.

7) <u>निवृत्ती वेतनाचे प्रकरण शासनाकडे वर्ग न करणे</u> - संबंधीत कर्मचारी शासनाचे उपरोक्त दिनांक 15/03/2011 च्या आदेशान्वये राज्यसंवर्गा मध्ये समायोजीत झाल्याने पर्यायाने ते शासनाकडील कर्मचारी ठरतात. त्यानुषंगाने त्यांचे निवृत्तीवेतन शासनाच्या नगरविकास मार्फत होणे मनासे (निवृत्तीवेतन)नियम 1982 प्रमाणे नियमसंगत असेल. तथापि , त्यांचे निवृत्तीवेतन मनपा निधीतून करण्यात येत आहे. सदर बाब चुकीची असून मनपा निधीतून करण्यात आलेल्या प्रदानाचे उचित समायोजन करावे व निवृत्तीवेतन प्रकरण शासनाकडे वर्ग करावे.

उपरोक्त आक्षेपाचे कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

DATDUBM6401 (Ref No : 29, Hmm No : 06)

## *21 नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाकरिता साहित्य खरेदी करतांना मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार वित्तीय औचित्याचे पालन न केल्याने झालेली अनियमीतता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

No. of Irregularities: 04

*लेखा शीर्ष : 158 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 277984.00 /-



Scanned by CamScanner

**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर अंतर्गत नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाचे काम अग्निशमन विभागाकडे असून सन 2014-15 या आर्थिक वर्षात नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाकरिता साहित्य खरेदी करण्यात आलेल्या प्रकरणी मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 58 अन्वये वित्तीय औचित्याचे पालन न केल्याने झालेल्या अनियमिततेबाबत.**

महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 285(1) अन्वये नैसर्गिक आपत्तीपासून बचाव करण्यासाठी साधने, वाहने, हत्यारे, उपकरणे तसेच पूरक दळणवळनाची साधने अग्निशमन विभागास महानगरपालिकेने खरेदी करून पुरविण्यात येतात. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाकरिता साहित्य खरेदी करण्याकरिता निविदा सादर करणेबाबत वृत्तपत्र दैनिक सकाळ व दैनिक चंद्रधूनमध्ये दिनांक 23 मे 2014 ला जाहिरात देण्यात आली. परंतु नैसर्गिक आपत्तीकरीता कोणते साहित्य खरेदी करण्यात येणार आहे, त्यांची नावे तसेच त्यांचा दर्जा इत्यादी बाबी नमूद करण्यात आल्या नाही. त्याचप्रमाणे साहित्य पुरवठा करावयाची मुदत 10 दिवस नमूद करण्यात आली. निविदा सादर करण्याचा कालावधी 7 दिवस देण्यात आला असून दिनांक 30 मे 2014 ला सायंकाळी 5 वाजता निविदा उघडण्यात आल्या. यामध्ये मे.3 एस.सोल्युशन्स कं. नागपूर, मे. अवंती इंटरप्रायजेस, चंद्रपूर व मे. किशोर ट्रेडर्स, मुर्तीजापूर ह्या कंत्राटदारांनी नैसर्गिक साहित्याचे दर बाब निहाय खालीलप्रमाणे सादर केलेले आहे.

( आकडे रुपयात )

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | मे.3 एस सोल्युशन्स कं. नागपूर | मे.अवंती इंटरप्रायजेस, चंद्रपूर | मे.किशोर ट्रेडर्स, मुर्तीजापूर |
|---|---|---|---|---|
| 1 | Reflective Fluorescent Life Jacket (2 inch Reflective strip) | 98.00 | 99.00 | 485.00 |
| 2 | Life Saving Jacket | 2800.00 | 950.00 | 3415.00 |
| 3 | Helmet ISI Fire Type | 1100.00 | 1400.00 | 820.00 |
| 4 | Rope 12 mm (200 feet) (Sisal Rope) | 3200.00 | 1130.00 | 1135.00 |
| 5 | Search Light TFC 1000 miter range | 5000.00 | 5500.00 | 73900.00 |
| 6 | Day night vision Binocular Magnification Power 60x Diameter Fo Objective lans-90 | 6000.00 | 6500.00 | - |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | mm Focusing Central 2 to 3 k.m. | | | |
| 7 | Rubber Rise four cell<br>Water proof Battery Torch | 2900.00 | 1430.00 | 1450.00 |
| 8 | Wooden Planks (3x6x1.5) | 3500.00 | 1500.00 | 1130.00 |
| 9 | Life Buoys Tubes | 3300.00 | 2100.00 | 5400.00 |
| 10 | Fire Suites | 25000.00 | 19500.00 | 69300.00 |
| 11 | Concrete cutter | 31000.00 | 35000.00 | 48900.00 |
| 12 | First Aid kit | 1200.00 | 900.00 | 4225.00 |
| 13 | Hand Gloves | 800.00 | 1500.00 | 190.00 |
| 14 | Mobile Public Announcement System | 6000.00 | 6200.00 | 15250.00 |

1. वरील प्राप्त झालेल्या तिन्ही निविदा कंत्राटदारांनी दिलेल्या निविदा दराची पडताळणी केली असता -
   1. मे.3 एस सोल्युशन्स कं. नागपूर यांचे साहित्य अनु.क्र.1,5,6,11 व 14 चे दर कमी आहे.
   2. मे.अवंती इंटरप्रायजेस, चंद्रपूर यांचे साहित्य अ.क्र.2,4,7,9,10 व 12 चे दर कमी आहे.
   3. मे.किशोर ट्रेडर्स, मुर्तीजापूर यांचे साहित्य अ.क्र 3, 8 व 13 चे दर कमी आहे.

प्राप्त निविदा दर तक्त्यानुसार सर्वात कमीचे निविदा दर विचारात घेता साहित्याच्या दरात वाटाघाटी करून दर निश्चित करण्याकरीता संबंधित कंत्राटदारांना दि.13/10/2014 ला बोलाविण्यात आले असता वाटाघाटी अंती तिन्ही निविदेतील दर्शविलेल्या दरात ½ % दर कमी करून साहित्य पुरविण्यास कंत्राटदारांनी सहमती दर्शवली व त्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली. निविदेत नमूद साहित्याचे दराची तुलना केली असता फार मोठ्या प्रमाणावर तफावत आढळून आली.

उदा. साहित्य अ.क्र.5 Serach light TFC 1000 miter range करिता मे.3 एस सोल्युशन्स कं. नागपूर यांचा दर रु.5000/- तर मे. अवंती इंटरप्रायजेस, चंद्रपूर यांचा दर 5500/- व मे.किशोर ट्रेडर्स, मुर्तीजापूर यांचा दर 73900/- प्रती नग आहे. वरील साहित्याच्या दरातील तफावत लक्षात घेता, वाटाघाटी अंती ½ % दर कमी करून साहित्य खरेदी पुरवठा आदेश दिल्याने मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 58 चे तंतोतंत पालन न केल्याने वित्तीय औचित्याचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट होते.

2. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.अशंस -2010/प्र.क्र.199/नवि-20, दिनांक 1 जानेवारी 2011 अन्वये शासन मान्य दर करार उपलब्ध असल्यास शासनाने मान्यता दिलेल्या दर संविदेनुसारच खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या कार्यालयाने स्थानिक स्तरावर निविदा मागवून संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांची मान्यता न घेता खरेदी करण्यात आली. त्यामुळे विहित केलेल्या तांत्रिक दर्जाचे साहित्य खरेदी बाबत गुणवत्ता पडताळण्यात आली नाही असे दिसते. तसेच खरेदी करतांना वित्तीय नियमाचे



Scanned by CamScanner

पालन करण्यात आले नाही. ही गंभीर स्वरूपाची अनियमितता आहे.

3. खरेदिव्दारे प्राप्त साहित्याची नोंद जंगम मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आली नाही. या कार्यालयात अशा प्रकारची नोंदवहीच ठेवण्यात आली नाही. प्राप्त साहित्याची नोंद माल साठा नोंदवहीत घेण्यात आली असून साहित्याचा दर्जा, त्यांची किंमत व साहित्य कोणास दिली यांची नोंद घेण्यात आली नाही. तसेच आपातकालीन व्यवस्था / आपत्ती व्यवस्थापन इत्यादीवर झालेला खर्च सन 2015-16 चे वार्षिक अर्थसंकल्पामध्ये लेखाशिर्ष क्रमांक 164 अंतर्गत खर्च निरंक दर्शविलेला आहे.

4. नैसर्गिक आपत्तीकरिता साहित्य खरेदीची कार्यवाही विलंबाने सुरु केली. महाराष्ट्रात पावसाळा जून मध्ये सुरु होत असल्याने साहित्य खरेदीची कार्यवाही माहे जानेवारी 14 मध्येच सुरु होणे आवश्यक होते. साहित्य खरेदी बाबत निविदा कार्यवाही दि. 31/10/2014 पूर्ण झाली असून पुरवठादारांना साहित्य पुरवठा आदेश पत्र क्र.चंशमनपा/आ/2250/2014, दि. 31/10/2014 ला देण्यात आला. त्यानुषंगाने पुरवठादारांनी साहित्याचा पुरवठा माहे नोव्हेंबर 2014 ला करण्यात आला. पावसाळा संपल्यानंतर पुरवठा झाल्याने नैसर्गिक आपत्तीचे औचित्य राहिले नाही. उपरोक्त मुद्यावरील खुलासा करून अनुपालन सादर करावे.

DATDUBM6401 (Ref No : 27, Hmm No : 89)

## 22 मोकाट कुत्रांच्या निर्बीजीकरणांबाबत चुकीचे धोरण अवलंबल्यामुळे दरवर्षी निष्फळ खर्च होण्याच्या शक्यतेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 06

*लेखा शीर्ष :165 शासन/मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1627020.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1627020.00/-

| |
|---|
| *विहित मुद्रांकावर करारनामा करण्यात आला नाही. उचित कार्यपद्धतीचा अंमल करण्यात आलेला नाही. Animal welfare organisation कडून निश्चित दरानुसार प्रतिपूर्ती करण्यात आलेली नाही. करारनामातील अटी व शर्तीचे पालन करण्यात आले नाही.* |

प्रमाणक क्र. 12, दिनांक- 11/09/2014, रक्कम रु.- 453330/-

प्रमाणक क्र. 14, दिनांक- 21/10/2014, रक्कम रु.- 407790/-

प्रमाणक क्र. 28, दिनांक- 03/12/2014, रक्कम रु.- 258750/-

प्रमाणक क्र. 29, दिनांक- 03/12/2014, रक्कम रु.- 346380/-



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

प्रमाणक क्र. 1766, दिनांक- 05/03/2015, रक्कम रु.- 160770/-

एकूण रक्कम रु.- 1627020/-

सन 2013-14 (जाहिरात निविदा प्रक्रिया जुलै 2013 पासून प्रारंभ) मध्ये कुत्रांचे निर्बिजीकरणाकरिता (मोकाट/बेवारस कुत्रे पकडणे,लस देणे, शत्रक्रिया करणे, काळजी घेऊन परत त्याच जागी नेवून सोडणे) पशुविषयक संस्था/अशासकीय संस्था यांच्याकडून चौथ्यांदा मागविण्यात आलेल्या फेरनिविदा सूचनेच्या अनुषंगाने मे. लक्ष्मी इस्टीटयूड ऑफ ॲनिमल वेलफेअर, अमरावती यांच्या कमी दराच्या निविदेला वाटाघाटी नंतर स्थायी समितीचा ठराव क्र.339, दि.28.02.2014 अन्वये मंजुरी देऊन दि. 01.03.2014 ला आदेश जारी करण्यात आले. सदर प्रयोजनासाठी आर्थिक वर्षात रु. 16,27,020/- एवढा खर्च करण्यात आला, या प्रयोजनार्थ रु.35 लाख एवढी तरतूद उपलब्ध होती.

त्यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) सदरची योजना द बर्थ ऑफ ॲनिमल (डॉग्स) कंट्रोल रूल 2001 च्या आधारावर कुत्र्यांची वाढती लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी राबवितांना मुळात 100% मादी कुत्र्यांना योजनेचा केंद्र मानून त्यांचे निर्बिजीकरण करणे योजनेच्या हेतूसाध्यतेसाठी योग्य ठरले असते. असे केल्यास पुढील वर्षामध्ये याच प्रकारचा अनावश्यक खर्च टाळता येऊ शकतो. करारनाम्यानुसार 60% मादी कुत्र्यांवर शत्रक्रिया झाली असल्यास उर्वरित 40% मादी कुत्रे त्यांच्या जननक्षमतेनुसार पुन्हा मोठया प्रमाणावर कुत्र्यांची संख्या निर्माण करून शकतात. अर्थात चुकीच्या धोरणामुळे दरवर्षी अनावश्यक खर्च करून जनतेच्या निधीचा अपव्यय करण्याची परंपरा कायम होण्याची शक्यता आहे. सन 2014-15 मध्ये 1299 मादी कुत्रे व 1059 नर कुत्र्यांचे निर्बिजीकरण झाल्याचे दर्शविण्यात आले असले तरी उर्वरित नर व मादी कुत्र्यांवर लक्ष केंद्रित न झाल्यामुळेही संख्या प्रभावीपणे नियंत्रणात येण्याची शक्यता वाटत नाही. परिणामी, सन 2014-15 या वर्षातील रु.16.27 लाख प्रत्यक्ष निर्बिजीकरणानंतरही अंतिम उद्दिष्टाच्या दृष्टीने निष्फळ ठरल्याचे मत नोंदविता येते.

2) सन 2014-15 मध्ये कुत्रांचे निर्बिजीकरणाकरिता संबंधित कंत्राटदाराने कार्यादेशाच्या (01.03.2014) दिनांकानंतर तब्बल चार महिन्यांनी (दि. 28.07.2014) सदरील कामाला सुरुवात केल्याचे दिसून आले. त्यामुळे मनपाने ठरविलेले उद्दिष्ट पूर्ण करता आले नाही असे दिसते.

3) रु.100 च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा करण्यात आला. महसूल व वन विभाग शासन अधिसूचना दि.23/04/2006 नुसार कंत्राटदारास रु.10 लाखापर्यंत रु. 100 च्या मुद्रांक शुल्कावर व 10 लाखावरील प्रत्येकी 1 लाख रुपयामागे रु.100 च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे बंधकारक असतांना मनपाने संबंधितासोबत तसे न केल्यामुळे रु. 2500 चे आर्थिक नुकसान झाले आहे. सबब वरील रुपये 2500 वसूल करून चालानद्वारे भरुन शासन सदरी जमा दर्शविणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

4) मोकाट/बेवारस कुत्र्यांची वार्षिक गणना अहवाल प्राप्त न केल्यामुळे मनपाने निर्बिजीकरणाकरिता उदिष्टे किती व कसे होते त्याबाबत स्पष्ट होऊ शकले नाही व अंदाजपत्रकामध्ये उदिष्टे निर्धारित नसतांना मोघमपणे मोठी तरतूद करण्यात आल्याचे दिसून येते.

सन 2014-15 मध्ये नर 1059 व मादी 1299 म्हणजेच एकूण 2358 कुत्यांचे निर्बिजीकरण केल्याचे डॉग रजिस्टर वरून दिसून आले. तथापि, द बर्थ ऑफ ॲनिमल (डॉग्स) कंट्रोल रूल 2001 नुसार तक्रार नोंदवही इत्यादी ठेवण्यात आली नाही. उक्त नियमानुसार संस्थने कमिटी स्थापन करणे, निगराणी व नियंत्रण ठेवणे आवश्यक असतांना त्याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही. त्यामुळे विना नियंत्रण सदरील कामे संबंधित संस्थेकडून केले जात असल्याचे स्पष्ट होते. तसेच संस्थेने driver record sheet, surger case record sheet, medicine invertory record sheet & details of monthly expenditure ठेवणे व ते मनपाने तपासून देयकाचे प्रदान करणे होते. तथापि, विहित अभिलेख्यांचा पाठपुरावा व तपासणी न करताच सदरील रकमाचे प्रदान करण्यात आले. अर्थात योजना राबवितांना उचित कार्यपद्धतीचा अंमल करण्यात आलेला नाही.

5) मनपा निधीतून सदरील कामासाठी खर्च रु. 16,27,020/- केल्याचे दिसून आले. परंतु खर्च करण्यात आलेल्या रकमांची animal welfare organisation कडून निश्चित दरानुसार प्रतिपूर्ती करण्यात येते. सदर रक्कम प्राप्त करण्यात आली नाही असे अंदाजपत्रकीय जमेच्या आकडेवारीवरून दिसते. ते प्राप्त करून मनपा निधीत जमा करावे.

6) करारनाम्यानुसार मादी कुत्र्यांचे 60% निर्बिजीकरण करणे बंधकारक असतांना फक्त 55.09% केले असल्याचे परीगणित होते, काम व्यवस्थित केल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

उक्त अनियमिततेबाबत संबंधित विभागाला अर्धसमास पत्र क्र.48 दि.17/05/2016 ला निर्गमित करून कळविले असता याबाबतचे अनुपालन अद्याप लेखापरीक्षणास प्राप्त नसल्यामुळे सदरील परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 69, Hmm No : 48)



Scanned by CamScanner

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान



Scanned by CamScanner

## 23 कर विभागातील सर्वसाधारण अनियमितता व कामकाजातील त्रुट्यामुळे मनपा महसुलाची हानी होत असल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 07

*लेखा शीर्ष :01 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9 ब*

| |
|---|
| ***मालमत्ता कर हा मनपाच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असताना त्यांचे निर्धारण, आकारणी व वसुली यामध्ये पारदर्शकता प्रभावी अंबलबजावणीचा अभाव दिसतो. नगररचना/बांधकाम विभागाशी कर विभागाचा समन्वय दिसून येत नाही. अधिनियमात तरतूद असलेल्या काही कराच्या आकारणीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.*** |

मनपा चंद्रपूरमधील कर विभाग सर्वात जास्त महसूल देणारा विभाग आहे असे अंदाजपत्रकावरून दिसते. असे असले तरी कर आकारणी व वसुलीची झोन स्तरावर होणाऱ्या प्रत्यक्ष कार्यवाहीवर मनपाच्या कर विभागाकडे नियमितपणे एकत्रित माहिती उपलब्ध होत नसून त्यायोगे या प्रक्रियेत उचित व प्रभावी नियंत्रणाचा अभाव असल्याचे अर्धसमास क्र.104, दि.20.07.2016 वरील प्राप्त अभिप्रायावरून दिसून आले. नवीन बांधकामावर कराची आकारणी करण्यासंबंधाने कर विभाग व नगररचना / बांधकाम विभागांमध्ये समन्वय आढळून येत नाही.

यासंदर्भाने पुढील त्रुट्या निदर्शनास येतात.

1) अ)- नगररचना विभागाने परवानगी दिलेल्या बांधकामांपैकी विशिष्ट वर्षात किती बांधकामे प्रत्यक्षात पूर्ण झाली याची माहिती कर विभागाकडे उपलब्ध असणे कर आकारणीच्या अनुषंगाने अत्यावश्यक आहे. परंतु नगररचना विभाग पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जारी करत नसल्यामुळे नगररचना व कर या दोन्ही विभागाकडे ती माहिती उपलब्ध नाही.

ब)- याशिवाय विनापरवानगी बांधकामाची प्रकरणे मनपा क्षेत्रात नझुल व झोपडपट्टी क्षेत्रात ही असण्याची शक्यता आहे. या अवैध बांधकामाची सर्वेक्षण होत असल्याचे दिसून आले नाही.

क)- वरील दोन्ही प्रकरणात (परवानगी प्राप्त व अवैध) बांधकामाची संख्या निश्चित होत नसल्यामुळे कर विभागाने उपलब्ध केलेल्या तपशीलात चालू वर्षातील पूर्ण झालेली बांधकामे व कर विभागाने गृहीत धरलेल्या नवीन मालमत्तांच्या संख्येचा मेळ घालता येत नाही. त्यामुळे बऱ्याच मालमत्ता वर्षानुवर्षे कराच्या कक्षेतून



Scanned by CamScanner

बाहेर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुढील काळात मालमत्तांची खाजगीकरणाद्वारे सर्वेक्षण करून संख्या निश्चित केली असता लेखापरीक्षण वर्षापूर्वी सदर त्रुटी असल्याची शक्यता आहे.

ड)- नगररचना विभागाने स्विकृत केलेल्या बांधकामाच्या नकाशाप्रमाणे मंजूर क्षेत्राच्या अनुषंगाने विशिष्ट मालमत्तेवर कराची आकारणी होण्यासाठी कर निरीक्षकाने मालमत्ता धारकाकडील मंजूर / स्विकृत नकाशाची प्रत तपासणे जरूरी आहे. ते नसल्यास सदरचे बांधकाम अवैध या सदरात मोडते. अशा अवैध दुप्पट बांधकामांवर मालमत्ता कर आकारता येतो. परंतु कर विभागाकडे अशा अवैध बांधकाम झालेल्या एकाही प्रकरणाची नोंद नाही असे अर्धसमासावरील (मुद्दा क्र.4) अभिप्रायावरून दिसते. सर्वेक्षणात असे एकही प्रकरण आढळून आले नसल्यास तसे कर विभाग / कर निरीक्षकांनी प्रमाणित करून अनुपालन करावे.

2) कर विभागाने पुरविलेल्या विवरणानुसार सन 2014-15 मध्ये एकूण 1853 मालमत्तांची भर पडली आहे असे दिसते. परंतु अर्धसमास क्र.104 अन्वये प्रकरणांची संख्या व कर निर्धारण / आकारणीच्या नस्त्या लेखापरीक्षणास तपासणीसाठी उपलब्ध करण्याची सूचना दिली असता कर विभागाने झोन स्तरावर तसे निर्देश जारी केल्याचे अभिप्रायात नमूद केले. प्रत्यक्षात त्याची पूर्तता होण्याबाबत गंभीरता दाखविण्यात आली नाही. यावरून कर निर्धारण व आकारणी अचूकपणे होत असल्याची खात्री होत नाही. अशा प्रकरणात मोठ्या प्रमाणावरील मालमत्ता कराच्या महसुलाची हानी होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) मालमत्तावरील कर निर्धारणासंबंधात मागणी नोंदवहीचे अवलोकन केले असता त्यामध्ये मालमत्तेचा प्रकार नोंदविलेला नाही असे दिसते. रहिवासी भाडेकरू असलेली रहिवासी मालमत्ता, व्यावसायिक मालमत्ता व इतर प्रकारामध्ये मालमत्ता आकारणीचे दर वेगवेगळे आहेत. रहिवासी मालमत्तांचे प्रकरणी एकही इमारतीमध्ये भाडेकरू व त्याप्रमाणे कराची स्वतंत्र आकारणी करण्यात आली नाही असे समजते. याची तपशीलवार तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याअभावी मालमत्ता कराच्या चुकीच्या आकारणीमुळे महसुलाची हानी संभवते.

4) ऑक्टोबर 2011 मध्ये नगरपरिषदचे मनपामध्ये रुपांतर झाल्यानंतर मालमत्ता धारक, कर मागणी, वसुली ई. तपशील इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बॅकलॉग एन्ट्रीसह ठेवण्यासाठी ई-गव्हर्नन्स अंतर्गत खाजगीकरण करण्यात आले होते असे दिसून आले. त्यामुळे मानवी पद्धतीने मागणी व वसुली नोंदवही (डिमांड रजिस्टर) ठेवण्यात आलेले नाही. परंतु सन 2014-15 चे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ठेवलेला तपशील (डाटा) मनपाकडे उपलब्ध नाही असे समजते. सदरचा डाटा पुनर्जीवित होऊन अभिलेखावर ठेवणे व त्याचा नंतर उपलब्ध असलेल्या तपशिलाशी मेळ घालून अचूकता प्रमाणित होणे आर्थिकदृष्ट्या गरजेचे आहे.

5) खुल्या भूखंडावर शुल्क आकारणी - स्थायी समिती ठराव क्र.142, दि.18.02.2013 अन्वये शहरातील खुल्या भूखंडांवर वस्तीच्या प्रकारानुसार आकारावयाच्या शुल्क दरांना मंजुरी देण्यात आली होती. परंतु सन 2013-14 मध्ये ठरावानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. परिणामी वसुली निरंक आहे. अशा खुल्या भूखंडाची संख्या मनपाकडे उपलब्ध नसावी असे कर विभागाच्या अभिप्रायावरून दिसून येते. यामुळे मनपा मोठ्या महसुलापासून वंचित आहे. याशिवाय अशा खुल्या भूखंडावरील कचरा घाण इत्यादीमुळे उद्भवणाऱ्या



Scanned by CamScanner

रोगराईवरील खर्चाचे दायित्व मनपावर येऊ शकते. सदर तुट टाळण्यासाठी थकबाकीसह शुल्क वसुली करून अनुपालन दर्शवावे.

6) पाणीपुरवठा लाभ कर - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 129 नुसार नळाद्वारे पाणीपुरवठा होत नसलेल्या जनतेला इतर माध्यमातून पाण्याची सोय उपलब्ध करून देत असल्यामूळे विशिष्ट दराने पाणीपुरवठा लाभ कर आकारता येतो. मनपा चंद्रपूरच्या काही क्षेत्रात मोठया प्रमाणावर टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा केला जात आहे. त्यासाठी इंधन, इतर बाबींवर मोठा खर्च होत असताना अधिनियमातील सदर तरतुदीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. (सन 2014-15 - सदर बाब सन 2013-14 व 2014-15 च्या सुधारित मूळ अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली असतानाही सन 2014-15 मध्ये वसुली निरंक आहे.)

7) वृक्षकर - वृक्षकर महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संवर्धन अधिनियम 1975 चे कलम 18(1) नुसार 1% वृक्षकर आकाराने आवश्यक असताना 0.5% दराने आकाराला जात आहे. 0.5% दराने सन 2014-15 मध्ये रु. 1524291/- ची वसुली झाली असून तेवढ्याच महसुलापासून मनपा वंचित आहे. याच दरानुसार सन 2010-11 ते 2014-15 पर्यंत एकूण रु.6298038/- एवढा कर वसूलपात्र आहे.

DATABWM6901 (Ref No : 14, Hmm No : 104)

***24 उचित समर्थनाशिवाय (Justification) जाहिरातीचे खाजगीकरणास अर्थसंकल्पीय सभेने स्थगिती दिल्यामुळे व प्रशासनाने विखंडनाच्या प्रस्तावाचा पाठपुरवठा न केल्यामुळे महसुलात प्रचंड नुकसान होणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2050000.00 /-

| |
|---|
| *जाहिरात कराचे उत्पन्न वाढवून अवैध जाहीरातीस प्रतिबंध घालण्यासाठी खाजगीकरणाच्या मान्य धोरणास अर्थसंकल्पीय सभेने स्थगिती दिल्याने त्याची समितीने मंजूर केलेल्या निविदेनुसार तीन वर्षात अपेक्षित रु. 66,80,500/- च्या उत्पन्नावर मनपाचे नुकसान झाले आहे. त्याव्यतिरिक्त सदर स्थगिती देण्याच्या शासनाकडे विखंडनासाठी पाठविलेल्या प्रस्तावाचासुद्धा मनपा प्रशासनाने पाठपुरवठा केला नाही.* |

मनपा हद्दीमध्ये होर्डिंग, बोर्ड, बॅनर इत्यादी वर खाजगी जाहिराती साठी मनपातर्फे शुल्क आकारणी करून अल्प



Scanned by CamScanner

प्रमाणात उत्पन्न प्राप्त करण्यात येत होते. अंदाजपत्रकीय आकडेवारीप्रमाणे मागील वर्षातील प्रत्यक्ष उत्पन्न पुढीलप्रमाणे होते.

सन 2010-11 – 71,435/-

सन 2011-12 – 73,532/-

सन 2012-13 – 1,78,018/-

या उत्पन्नात वाढ होण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 16 दि. 20.07.2012 अन्वये खाजगीकरणाचे धोरणास मंजुरी देण्यात येऊन स्थायी समितीच्या ठराव क्र. 59 दि. 07.11.2012 अन्वये निविदा आमंत्रित करण्यासाठी वार्षिक रु. 19,42,350/- ही देकार रक्कम ठरविण्यात आली. त्याअनुषंगाने दि. 28.01.2013 ते 20.02.2013 या कालावधीत तीन वेळा निविदा जाहिरात प्रसिद्ध करून मे. कन्सेप्ट इव्हेंट अँड आउटडोअर सोल्युशन्स, नागपूर यांच्याशी केलेल्या वाटाघाटी अंती एक लक्ष स्क्वेअर फुटपर्यंत ग्राउंड रेंट सह पुढील दर निश्चित करण्यात आले.

प्रथम वर्ष (2013-14) – 20,50,000/- (वार्षिक)

दुसरे वर्ष (2014-15) – 22,05,000/- (वार्षिक)

तिसरे वर्ष (2015-16) – 24,25,500/- (वार्षिक)

उपरोक्त दरास स्थायी समितीने ठराव क्र. 5 दि. 05.04.2013 अन्वये मंजुरी प्रदान केली.

यासाठी अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. दिनांक 20.07.2012 रोजी मनपा सर्वसाधारण सभेने खाजगीकरणाद्वारे उत्पन्न वाढीचे धोरण निश्चित केले असतांना व तुलनेने अधिक उत्पन्न मिळण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु असतांना मनपाच्या अर्थसंकल्पीय सभेने ठराव क्र. 105 दि. 22.03.2013 अन्वये खाजगीकरणाचा विषय त्याच्या व्यतिरिक्त उत्पन्न वाढीसाठी अन्य कोणताही मार्ग न सुचविता स्थगित ठेवण्याचा मनपाच्या हिताविरुद्ध निर्णय घेतला. परंतु त्यामागील सभेने भूमिका इतिवृत्तात स्पष्ट केली नाही.

2. वरील स्थगितीचा ठराव महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम 451(1) नुसार निखंडीत करण्यासाठी व कलम 451(3) नुसार दि. 20.07.2012 च्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त मनपा यांनी पत्र क्र. 354 दि. 26.03.2013 अन्वये राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर केला. परंतु त्यापुढील काळात शासनाकडून दिर्घकाळ मंजुरी प्राप्त न झाल्याने किंवा त्यासाठी मनपा प्रशासनाने शासनाकडे पाठपुरावा केला नसल्यामुळे मनपाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

सदरचे नुकसान पुढीलप्रमाणे आहे.

(रक्कम रुपयात)

| वर्ष | खाजगीकरणाद्वारे निश्चित केलेले उत्पन्न | जुन्या प्रचलित पद्धतीप्रमाणे – उत्पन्न | उत्पन्नातील तुट (नुकसान) |
|---|---|---|---|
| 2013-14 | 20,50,000 | 2,22,840 | 18,27,160 (89%) |
| 2014-15 | 22,05,000 | 3,54,590 | 18,50,410 (84%) |

याबाबत जारी केलेल्या अर्धसमासाचे अनुषंगाने मनपाचे अभिप्राय प्राप्त नसल्याने आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DATABWM6901 (Ref No : 20, Hmm No : 108)



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

**25 मनपा चंद्रपूर महानगरपालिका सन 2014-2015 चे मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत.**

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

*म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 160625455.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 43445502.00/-

***चंद्रपूर महानगरपालिकेचे सन 2014-2015 ची मालमत्ता कराची रक्कम रु. 43445502/- इतक्या थकबाकीबाबत.***

चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणांतर्गत कर आकारणी विभागाकडील विवरणपत्रानुसार खालीलप्रमाणे थकबाकी दिसून आली.

सन 2014-2015 मधील करवसुली

| अ.क्र | कराचे नाव | मागील थकबाकीसह एकुण मागणी | | सन 2014-2015 मधील वसुली | | दि.31.03.2015अखेर थकबाकी | वसुलीची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | थकबाकी | चालु | थकबाकी | चालु | | थकबाकी | चालू |
| 1 | मालमत्ता कर | 33124785 | 78718933 | 15949017 | 64606128 | 31288573 | 48.15 | 82.07 |
| 2 | शिक्षण कर | 8790196 | 22065351 | 4411983 | 18521924 | 7921640 | 50.19 | 83.94 |
| 3 | रोजगार हमी कर | 1011302 | 3504427 | 583206 | 2545543 | 1386980 | 57.67 | 72.64 |
| 4 | वृक्ष कर | 657942 | 1487104 | 317575 | 1201229 | 626242 | 48.27 | 80.78 |
| 5 | अग्निशमन कर | 618980 | 1614041 | 328899 | 1306468 | 597654 | 53.14 | 80.94 |
| 6 | सफाई कर | 0 | 8635160 | 0 | 7029703 | 1606457 | 00 | 81.40 |
| 7 | जाहिरात कर | 0 | 396234 | 0 | 378278 | 17956 | 00 | 95.47 |
| एकुण | | 44203205 | 116422250 | 21590680 | 95589273 | 43445502 | सरासरी | सरासरी |
| एकुण रक्कम रु. | | 160625455 | | 117179953 | | | | |
| | | | | | | | 51.48 | 82.46 |

मार्च 2015 अखेर वरीलप्रमाणे रु. 43445502/- एवढ्या कराची वसुली करण्यात आलेली नाही. वसुलीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की थकबाकीची वसुली केवळ 51.48% असून चालू वसुली 82.46% आहे. अर्थात थकबाकीच्या वसुलीकडे अधिक दुर्लक्ष होत असल्याचे लक्षात येते. सदर थकबाकी वसूल न केल्यामुळे महानगरपालिकेस अपेक्षित उत्पन्न प्राप्त झालेले नाही व त्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर थकीत रकमा वसुलीबाबत प्रभावी उपाययोजना केल्याचे दिसून येत नाही. याबाबत ठोस उपाययोजना करून प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करून थकबाकीची रक्कम तातडीने वसूल होणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

**26 वृक्षकर 1% ऐवजी 0.5% वसूल केल्यामुळे महसुलाची हानी झाल्याबाबत.**

**वृक्ष कर**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6298038.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 6298038.00/-

***महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संवर्धन अधिनियम 1975 चे कलम 18(1) नुसार मालमत्ता कराच्या 1% वृक्ष कर आकारणे आवश्यक असताना 0.5% वृक्षकर आकारुन चंद्रपूर मनपा सन 2014-2015 मध्ये रु.1524291 ची हानीबाबत.***

सन 2014-2015 चे कर विभागाचे लेखापरीक्षण करताना मालमत्ता कराच्या पावतीपुस्तकांची तपासणी केली असता वृक्षकर 1% ऐवजी 0.5% आकारल्याचे आढळून आले.

महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संवर्धन अधिनियम 1975 चे कलम 18(1) नुसार मालमत्ता कराच्या 1% वृक्ष कर आकारणे आवश्यक असताना 0.5% वृक्षकर आकारणी करून वृक्षसंवर्धन निधीखाली बँक खाते क्र 06910100004417 (UCO Bank) मध्ये जमा करण्यात येत आहे. मागील पाच वर्षातील वृक्ष संवर्धन निधी मध्ये 0.5% वृक्ष करापोटी रु. 6298038/- एवढा महसूल गोळा करण्यात आला असून खर्च वजा जाता बँक खात्यात रु. 5338671.82/- निधी शिल्लक आहे. (2010-2011 पूर्वीची जमा या परिच्छेदामध्ये विचारात घेतलेली नाही.) सदर महसूल 1% वसुलीयोग्य दराऐवजी 0.5% दराने जनतेकडून वसुल करण्यात आल्याने उपरोक्त अधिनियमानुसार त्या पाच वर्षात उर्वरित 0.5% प्रमाणे रु.6298038/- एवढा कर वसूल करण्यात आला नाही.

चंद्रपूर शहरालगतच्या कोळसा खाणी, वीज प्रकल्प, सिमेंट व इतर कारखान्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषणाची शक्यता असल्याने अधिकाधिक वृक्षारोपण, जतन व संवर्धन ही अत्यंत महत्वाची उपाययोजना करणे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हितावह होते. त्यासाठी 1975 च्या उपरोक्त अधिनियमात विस्तृत तरतुदी मांडण्यात आल्या आहेत. असे असताना त्यानुषंगाने पुरेसा निधी न उभारता आवश्यक वृक्षकराच्या



Scanned by CamScanner

अर्धी रक्कम वसूल करणे व त्यातूनही अपुरा खर्च करणे या अनियमितता आढळून येतात.

(रक्कम रुपयात)

| वर्ष | जमा केलेला (0.5%) वृक्षकर | जमा करणे योग्य (1%) वृक्षकर | कमी जमा केलेला वृक्षकर | वृक्षरोपण व इतर संबंधित बाबीवर केलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 2010-2011 | 909171 | 1818342 | 909171 | 17188 |
| 2011-2012 | 1056553 | 2113106 | 1056553 | 0 |
| 2012-2013 | 1363216 | 2726432 | 1363216 | 17188 |
| 2013-2014 | 1444807 | 2889614 | 1444807 | 917675 |
| 2014-2015 | 1524291 | 3048582 | 1524291 | 3045012 |
| **एकूण** | 6298038 | **12596076** | **6298038** | **3997063** |

टीप- 1) अंदाजपत्रकीय आकडेवारी

2) वरील तक्त्यात 2010-11 पूर्वीची आकडेवारी विचारात घेतलेले नाही.

यासंदर्भात उचित कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DLFSRWF8901 (Ref No : 64, Hmm No : 125)

## ***27 शास्ती 2% पेक्षा कमी आकारून चंद्रपूर मनपाचे झालेल्या हानीबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 39697.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 39697.00/-

*सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणादरम्यान आढळलेल्या मालमत्ता कराच्या थकबाकीच्या वसुलीमध्ये विहित दराने शास्ती न आकारल्यामुळे व याबाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे मनपा निधीची हानी झाल्याचे दिसून आले.*



Scanned by CamScanner

चंद्रपूर महानगरपालिका मधील सन 2014-2015 कर विभागाचे माहे मार्च 2014 मधील उपलब्ध करण्यात आलेल्या अभिलेख्याची तपासणी केली असता, घर मालमत्ता करामध्ये 2% पेक्षा कमी दराने शास्ती आकारण्यात आल्याचे आढळून आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण आठ कराधान नियम-41 मध्ये पहिल्या सहामाही कराची रक्कम बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरावयाची असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहामाही कराची रक्कम, प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबरपूर्वी भरावयाची असेल, आणि जर कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग, याव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील, अशी तरतूद आहे.

माहे मार्च 2015 मध्ये शास्तीसह वसुली केल्याचे आढळलेल्या निवडक पावत्या उदाहरणादाखल पुढीलप्रमाणे आहेत.

(रक्कम रुपयांत)

| अ.क्र. | पावती क्र | कराचे वर्ष | कर वसुलीसाठी झालेला विलंब | थकबाकी | थकबाकीवर आकारावयाची शास्तीची रक्कम 2% प्रतीमहिना | आकारलेली शास्तीची रक्कम | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 113269 | 2012-2015 | 36 महिने | 1611 | 837 | 419 | 418 |
| 2 | 113272 | 2013-2014 | 24 महिने | 1749 | 840 | 251 | 589 |
| 3 | 113285 | 2013-2015 | 24 महिने | 1208 | 580 | 290 | 290 |
| 4 | 113295 | 2013-2015 | 24 महिने | 1013 | 486 | 116 | 370 |
| 5 | 113909 | 2012-2015 | 36 महिने | 2638 | 1899 | 770 | 1129 |
| 6 | 113931 | 2012-2015 | 36 महिने | 5760 | 4147 | 1616 | 2531 |
| 7 | 115637 | 2012-2014 | 48 महिने | 5242 | 5032 | 1573 | 3459 |
| 8 | 117853 | 2013-2015 | 36 महिने | 1099 | 791 | 264 | 527 |
| 9 | 120156 | 2013-2015 | 36 महिने | 935 | 673 | 224 | 449 |
| 10 | 120175 | 2013-2015 | 36 महिने | 3270 | 2354 | 785 | 1569 |
| 11 | 112621 | 2012-2014 | 48 महिने | 3026 | 2905 | 908 | 1997 |
| 12 | 112630 | 2008-2015 | 84 महिने | 3226 | 5420 | 1089 | 4331 |
| 13 | 112631 | 2008-2015 | 84 महिने | 1006 | 1690 | 340 | 1350 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 113115 | 2008-2015 | 84 महिने | 724 | 1216 | 261 | 955 |
| 15 | 113150 | 2008-2014 | 72 महिने | 3279 | 5508 | 1066 | 4442 |
| 16 | 113195 | 2007-2015 | 108 महिने | 1656 | 3179 | 596 | 2583 |
| 17 | 113196 | 2008-2012 | 84 महिने | 1868 | 3138 | 448 | 2690 |
| 18 | 116914 | 2005-2012 | 108 महिने | 1264 | 2730 | 304 | 2426 |
| 19 | 119536 | 2011-2015 | 48 महिने | 5458 | 5240 | 1734 | 3506 |
| 20 | 119591 | 2009-2015 | 72 महिने | 1426 | 2053 | 475 | 1578 |
| 21 | 124304 | 2008-2012 | 84 महिने | 1133 | 1903 | 315 | 1588 |
| 22 | 124361 | 2011-2014 | 48 महिने | 1745 | 1675 | 155 | 920 |
| वसूलपात्र रक्कम रुपये | | | | | | | 39697 |

वरीलप्रमाणे विहित कालावधीत मालमत्ता कराची रक्कम भरणा करण्यात न आल्याने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार शास्तीची रक्कम वसूल करणे अनिवार्य होते. तथापि, याबाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे मनपा निधीची हानी झाल्याचे दिसून आले. याचप्रकारची अनियमितता सन 2014-2015 मधील इतरही पावत्यांमध्ये असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी संबंधित मालमत्ता धारकाकडून शास्तीची रक्कम वसूल करून अनुपालन सादर करावे.

यासंदर्भात जारी केलेले मूळ अर्धसमास पत्र क्र.21 दि.06/04/2016 नुसार अभिप्राय मागविले असता ते प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DLFSRWF8901 (Ref No : 65, Hmm No : 21)

## *28 नगररचना विभागाच्या दुर्लक्षामुळे विविध नियमांचे व अटी शर्तींच्या उल्लंघनासह मनपाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याबाबत.*

नगररचना

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 07

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*



Scanned by CamScanner

**बांधकाम मंजुरीच्या प्रकरणांमध्ये विविध नियमाखालील तरतुदीचे उल्लंघन होत असून त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.**

मनपा चंद्रपूर येथील नगररचना विभाग महसूल प्राप्तीच्या दृष्टीने महत्वाचा विभाग असून वाढीव चटईक्षेत्र, गुंठेवारी, इमारत बांधकाम परवानगी/विकास/अनुज्ञप्ती नूतनीकरण इ. बाबींपासून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न अपेक्षित असताना उचित नियंत्रण, नियमित सर्वेक्षणाअभावी पुढीलप्रमाणे अपेक्षेपेक्षा कमी उत्पन्न प्राप्त झाले.

| उत्पन्नाच्या बाबी | अपेक्षित | प्रत्यक्ष उत्पन्न | |
|---|---|---|---|
| इमारत परवाना/विकास/ अनुज्ञप्ती नूतनीकरण | 3.50 कोटी | 1.66 कोटी | 47% |
| वाढीव चटईक्षेत्र | 0.75 कोटी | 00 | 0% |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त कमी उत्पन्नाच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार अभिन्यास / लेआउट्सना मंजुरी देताना एकूण क्षेत्रफळापैकी ठराविक क्षेत्र (उदा. 2 ते 5 हेक्टर क्षेत्राच्या ले आउट्स पैकी 20% क्षेत्र) लोकोपयोगी वापर आणि सोयीसुविधांसाठी (Public Utility) आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. अशा आरक्षित क्षेत्रावर मैदाने, रस्ते, नाल्या इ सोयी अभिन्यासधारकाने मनपाच्या निर्देशांप्रमाणे विकसित करून मनपाकडे हस्तांतरित करावयाचे जिल्हाधिकारी यांनी विविध प्रकरणात अभिन्यासधारकांना, अकृषक वापरासाठी दिलेल्या परवानगी आदेशानुसार बंधनकारक करण्यात आले आहे.

परंतु नगरविकास विभागाकडे वरीलप्रमाणे विकसित करून हस्तांतरित करावयाच्या रस्ते, मैदाने, नाल्या इ मालमत्ताबाबत आवश्यक कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. परिणामी, अशा अभिन्यासातील सदर मालमत्ता मनपास हस्तांतरित न होणे व त्या अभिन्यासधारकाने विकसित न केल्याने त्याचा भार मनपाने उचलून अभिन्यासातील रहिवाशांना सोयी उपलब्ध करून देण्याची व पर्यायाने अभिन्यासधारकाने करावयाचा खर्च मनपाने केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

नविन बांधकामांच्या अनुषंगाने नगरपरिषदांची विकास नियंत्रक नियमावली मधील नियम 6.2.10, 6.2.11, 6.2.13 व 6.2.14 नुसार अनुक्रमे परवानगी शुल्क, सुरक्षा ठेव, विकास शुल्क (नगररचना कायदा 1966 मधील कलम 124 A) व प्रिमिअम चार्जेसची आकारणी करण्याची तरतूद आहे. परंतु मनपा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावरील बांधकाम उचित परवानगी शिवाय व नगररचना विभागाचे दुर्लक्षामुळे होत असल्यामुळे सदर शुल्कापासून मनपा वंचित आहे असे दिसते.

2. <u>अवैध बांधकामामुळे रु. 8.73 कोटी महसुलाची हानी</u> - कर विभागाने उपलब्ध माहितीनुसार सन 2014-2015 मध्ये मनपा क्षेत्रात 1853 मालमत्तांची वाढ झाली असून नगरविकास विभागाने प्रत्यक्षात 296 बांधकामांना परवानगी दिल्याचे अभिलेख्याप्रमाणे दिसून येते. यावरून बांधकाम परवाना शुल्क, विकास शुल्क डावलून बांधकाम झालेली आहेत असे स्पष्ट होते. या अवैध / अनधिकृत बांधकामावर नगरविकास विभागाचे दुर्लक्ष असल्यामुळे (296 परवानगीच्या अनुषंगाने रु. 1.65 कोटी परवानगी व विकासशुल्क या प्रमाणानुसार) अनधिकृत बांधकामांपोटी (1853-296) म्हणजेच 1557 बांधकाम परवानगी व विकास शुल्कचे अंदाजे रु.8.73 कोटी (रु. 873.18 लाख) एवढ्या महसुलाची हानी झाल्याची शक्यता आहे.

3. <u>बांधकाम परवानगी देण्यास विलंब करणे</u> - नगरपरिषदांची विकास नियंत्रण नियमावली मधील नियम 6.6.3 नुसार" Sanction/ Refusal shall be given within 60 days of notice for permission otherwise it will be



Scanned by CamScanner

assumed as deemed permission causing loss of several fees"

बांधकाम परवानगी नोंदवहीचा आढावा घेतला असता सहा महिन्याच्या विहित मुदतीचे उल्लंघन करून विलंबाने मंजुरीची प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत असे दिसून आले-

उदा.

| | | |
|---|---|---|
| Primas Realtors private limited | प्रकरण क्र-113, दि. 17/06/2011 | विलंब अंदाजे 2 वर्षे |
| सर्व्हे नं. 21, प्लाट क्र.1 | बांधकाम परवनगी दि. 04/07/2013 | |

नगररचना विभागाकडे अशा प्रलंबित प्रकरणापैकी उपरोक्त नियम 6.6.3 मधील तरतुदीचा विकासकामांना/मालमत्ताधारकांना लाभ होऊन विविध शुल्कांपासून प्राप्त होऊ शकणाऱ्या महसुलाचे मनपास नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4. <u>अग्नीशमन उपाययोजना (fire safety measures) शिवाय बांधकाम नकाशा मंजूर करणे</u> - Fire Protection of National Building Code मधील भाग-4 व Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act 2006 मधील तरतुदीनुसार सर्व प्रकारच्या इमारतींचे बांधकाम होणे आवश्यक आहे. MRTP Act 1966 अंतर्गत नगरपरिषदांची विकास नियंत्रण नियमावली मधील नियम 6.2.6.1, 20 नुसार पुढील विशेष प्रकारच्या इमारतीच्या प्रारूप नकाशात अग्नीशमन यंत्रणेची तरतूद असल्याशिवाय नकाशे मंजूर करता येत नाही.

अ. 15 मीटर पेक्षा जास्त उंच इमारती

ब. शैक्षणिक, व्यावसायिक, औद्योगिक इ. प्रकारच्या इमारती

क. 500 चौ.मि. पेक्षा जास्त क्षेत्राच्या मिश्र रहिवासी योजना (mixed occupancies)

याप्रकारच्या इमारतीच्या नकाशांमध्ये अग्नीशमन यंत्रणा / उपाययोजना स्पष्टपणे दर्शविली असणे अत्यावश्यक आहे (6.2.6.1 मधील 1 ते 9)

त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत-

1) Access to fire appliances/vehicles
2) Size of main and alternate staircase
3) Location and size of fire Lift
4) Air conditioning system with fire dampers
5) Smoke exhausters system
6) Details of fire alarm system
7) Location of fire protection installation, इत्यादी.

नगररचना विभागाने मंजूर केलेल्या प्रकरणांत नकाशांचा सर्वसाधारण आढावा घेतला असता वरील अत्यावश्यक बाबी अंतर्भूत असल्याचे आढळून आले नाही. तसेच सदर नकाशांना मनपाच्या किंवा शासनाच्या अग्नीशमन अधिकाऱ्यांकडून (अग्नीशमन विषयक बाबींच्या संदर्भात) मान्यता प्राप्त असल्याचे दिसून येत नाही (6.2.12) पर्यायाने अग्नीशमन विभागाकडून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 11(2) अन्वये आकारण्यायोग्य शुल्काची सुद्धा हानी झाल्याची शक्यता आहे.

काही प्रकरणे पुढीलप्रमाणे-



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| श्रीमती किरण जयस्वाल | फ्लॅट स्किम | बांधकाम परवानगी 344/2014<br><br>दि. 16/06/2014 |
| मे. अंकीत बिल्डर्स | दुकाने व रहिवास योजना | बांधकाम परवानगी 73/2014<br><br>दि. 12/12/2014 |
| मे. धवन रिअल इस्टेट | Multifamily Dwelling<br><br>7985 चौ.मि. | बांधकाम परवानगी 340/2013 |

5. <u>मालमत्ता कर भरल्याचा पुरावा नसताना बांधकामास मंजुरी देणे</u> – उपरोक्त नियमावलीतील नियम 6.2.15 नुसार बांधकामास मंजुरी देण्यापूर्वी सदर भूखंडावर मालमत्ता कराची थकबाकी नसल्याबाबत कर विभागाकडून प्रमाणपत्र प्राप्त करून ते प्रकरणास जोडणे आवश्यक असताना सर्व प्रकरणात नगररचना विभागाने दुर्लक्ष केल्याचे दिसून आले.

6. <u>पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व ताबा प्रमाणपत्र (certificate of occupancy) जारी न होणे</u> – (नियम 7.5 व 7.6)

नगररचना विभागातील बांधकाम परवानगी नोंदवहीत व संबंधित प्रकरणात सदरची प्रमाणपत्रे दिल्याचे आढळून येत नाही. तसेच जोत्यानंतरचे बांधकाम करण्यासही परवानग्या जारी केल्याचे दिसून आले नाही. बांधकाम मंजुरी नकाशाप्रमाणे प्रत्यक्ष बांधकाम झाल्याची खात्री नगररचना विभाग करीत नाही. परिणामी, अनधिकृत बांधकामे, अटी व शर्तीचे उल्लंधन यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने नगररचना विभाग गंभीर नाही हे स्पष्ट होते.

उपरोक्त नियमावलीतील विविध तरतुदीनुसार नगररचना विभागाचे नियंत्रण व अवैध बांधकामावर निर्बंध नसल्यामुळे अवैध बांधकामे करणाऱ्याविरुद्ध MRTP Act 1966 मधील कलम 52 नुसार तरतूद असलेल्या दंडाच्या रकमेचे नुकसान होत आहे. या व्यतिरिक्त नागरिकांच्या हितास बाधा आणणाऱ्याविरुद्ध कलम 53 (अवैध बांधकाम पाडणे) नुसार व नियमावलीतील नियम 10.1 (c)(d) (संबंधित अनुज्ञप्तीधारक अभियंता, वास्तूशास्त्रज्ञ यांच्या विषयक कार्यवाही) नुसार कार्यवाही करण्यासही संबंधित विभाग उदासीन असल्याचे दिसते.

7. <u>बांधकाम मंजुरी आदेशातील अटी व शर्ती बाबत नगररचना विभाग स्वतःच गंभीर नसणे</u> – नगररचना विभागाकडून विविध बांधकामांना मंजुरी देताना विविध अटी व शर्ती नमूद असलेले आदेश जारी करण्यात येतात त्यानुसार पूर्तता होत असल्याबाबत व होत नसल्यास त्याची दखल घेऊन उचित कार्यवाही करण्यास नगररचना विभाग प्राधिकृत असताना बांधकामास मंजुरी दिल्यानंतर सदर बांधकामाकडे सरसकट दुर्लक्ष करून नियमानुसार विहित असलेल्या जबाबदारीपासून अलिप्त असल्याचे आढळून येते. त्यामुळे रेन हार्वेस्टिंग (अट क्र.12) भूकंप रोधक बांधकाम (अट क्र.20), विहित एक वर्षाच्या कालावधीत बांधकाम पूर्ण करणे व भोगवटा प्रमाणपत्र घेणे (अट क्र.1) इ. तरतुदींचे उल्लंघन होत आहे.

DATABWM6901 (Ref No : 15, Hmm No : 104)



Scanned by CamScanner

**29 घनकचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्प सुरु न झाल्यामुळे कचरा सपाटीकरण इ. बाबीवर रु.7.72 लाख एवढा निरर्थक खर्च होणेबाबत.**

**घनकचरा प्रक्रिया प्रकल्प**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :188 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 772796.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 772796.00/-

| |
|---|
| *सक्षम नसलेल्या कंत्राटदाराची निवड करून घनकचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट न लागल्याने पर्यावरण व सार्वजनिक आरोग्य धोक्यात येणे तसेच आवश्यक नसताना प्रक्रिया प्रकल्पाचे ठिकाणी कचरा सपाटीकरण वर रु.7.72 लाख एवढा निरर्थक खर्च करून नागरिकांच्या करातून प्राप्त महसुलाचा आयोग्य विनियोग करण्यात आला.* |

प्रमाणक क्र. 15, दि.27/11/2014, रु.668526 (LBT Account)

प्रमाणक क्र. 16, दि.27/11/2014, रु.104270 (LBT Account)

शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी मनपाने D-BOOT (Design, Build, own, Operate andTransfer) या तत्वावर स्थायी समितीच्या ठराव क्र.42 दि.31/05/2013 अन्वये निविदा दर मान्य करण्यात आलेल्या मे.कन्यका नॉन कन्व्हेंशनल एनर्जी प्रा.लि. नागपूर यांना दि.23/08/2013 रोजी सात वर्षासाठी एकूण रु.30 कोटी मुल्याचे कंत्राट आदेश जारी केले. या आदेशाचे दिनांकानंतर प्रक्रिया प्रकल्प उभारून सहा महिन्यांचे आत कंपोस्ट खत व नऊ महिन्यांचे आत आर.डी.एफ विटा तयार करण्याचे निर्देशित होते. सदर प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी सोय म्हणून मनपाकडून कचरा सपाटीकरण रस्ते मोकळे करणे यासाठी रु.7.72 एवढा खर्च करण्यात आला.

**यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.**

1. सदर कंत्राटदाराने सन 2014-2015 च्या अखेर पर्यंत व त्यापुढील काळातही काम सुरु केले नाही. वास्तविक निविदा मंजूर करताना कंत्राटदाराची आर्थिक क्षमता, कामाचा अनुभव या महत्वाच्या अटीकडे दुर्लक्ष करण्यात आले असे लक्षात येते. ( अधिक तपशीलासाठी आवश्यक असलेली संबंधित नस्ती अर्धसमास पत्र क्र.110 दि.29/07/2016 चे अनुषंगाने लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.) पर्यायाने प्रत्यक्ष प्रक्रीयेऐवजी मोठ्या प्रमाणावर घनकचरा संबंधित डेपो येथे जमा झाल्याने पर्यावरण सार्वजनिक आरोग्य



Scanned by CamScanner

धोक्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात चुकीच्या पद्धतीने निविदा मंजुरीची कार्यवाही पार पडल्याचा संभव आहे.

2. मे.कन्यका यांना जारी केलेल्या दि.23/08/2013 च्या आदेशापासून सहा महिन्याचे आत म्हणजेच 22/02/2014 पर्यंत प्रक्रिया प्रकल्प सुरु होणे आवश्यक होते परंतु त्यानंतर च्या कालावधीत कंत्राटदाराने प्रकल्प उभारणी केली नाही अर्थात कार्यादेशाचा भंग झालेला असताना व कामाची सुरुवातच झाली नसताना मनपाने मुदतीनंतरच्या पुढील कालावधीत दि.14/06/2014 ते 30/06/2014 व 13/09/2014 ते 16/09/2014 या कालावधीत अनुक्रमे रु.668526/- व रु.104270/- मूल्याचे (एकूण रु.772796/-) कचरा सपाटीकरण करून प्रक्रिया प्रकल्पासाठी रस्ते मोकळे करून देण्यासाठी पोकलेन मशिन लावण्याचे कामावर अनावश्यक खर्च केला. (त्याच प्रयोजनासाठी 14-15 मध्ये अजून किती खर्च करण्यात आला याची माहिती उपलब्ध करण्यात आली नाही.) सदरचा खर्च रु.7.72 लाख (व माहिती उपलब्ध न केलेला अन्य याच प्रयोजनावरील खर्च) अतिशय बेजबाबदारपणे व मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 58 मध्ये उल्लेखित वित्तीय औचित्याचे उल्लंघन करून करण्यात आला असे दिसते. परिणामी तो वसूलपात्र ठरतो.

DATADWM6901 (Ref No : 16, Hmm No : 110)

***30 मुळ खडीकरण असलेल्या रस्त्यावर अंदाजपत्रकानुसार आवश्यक नसताना दर्शविलेल्या रु. 2,60,526/- मुल्याच्या निरर्थक खडीकरणाबाबत.***

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 0

*लेखा शीर्ष:331 राज्य शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4825311.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4564785.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 260526.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1983948.00/-

***मुळचे खडीकरण असलेल्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाच्या प्रस्तावित कामात तरतुद नसताना रु. 2,60,526/- चे नव्याने खडीकरण केल्याचे दर्शविणे, पेव्हर ब्लॉक्स् लावणे, नाली बांधकाम इ.रु.14.19 लाख मुल्याची नवीन कामे न करता रु. 19,83,948/- मुल्याचे कॉंक्रीटीकरणाचे अतिरिक्त काम केल्याचे दर्शविण्यात आले आहे.***



Scanned by CamScanner

कामाचे नाव :- नगीनाबाग प्रभागात रेव्हेन्यु कॉलनी ते खोजा कॉलनीपर्यन्त रस्ता कॉंक्रीटीकरण.

प्रमाणक क्र.10, दिनांक 12.11.2014 रुपये 14,48,015/- ( प्रथम धावते देयक )
प्रमाणक क्र.40, दिनांक 27.03.2015, रुपये 33,77,296/- ( दुसरे व अंतिम देयक )

उपरोक्त कामास नगर अभियंता यांची क्र.563, दिनांक 23.12.2013 अन्वये तांत्रिक मान्यता व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून स्थायी समितीच्या ठराव क्र.53 (4), दिनांक 4.3.2014 अन्वये 2% कमी दरा मे.के.एस.परमार यांच्या निविदेस मंजूरीसह दिनांक 28.4.2014 रोजी कार्यादेश जारी करण्यात आला. सदर कामाचे मुळ प्राकलन रु.46,84,790/- मुल्याचे असून वरील प्रमाणकान्वये रु.48,25,311/- चे शोधन करण्यात आले.

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :-

1) या 420 मीटर लांब रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रकात रस्त्याचे खडीकरणाची बाब समाविष्ट नाही अर्थात मुळात खडीकरण केलेल्या रस्त्यावर कॉंक्रीटीकरण प्रस्तावित होते, असे असताना सक्षम परवानगी न घेता 265.45 घनमीटरचे खडीकरण (393 मीटर लांब रस्त्यावर) केल्याचे दर्शवून रु.981.45 प्रति घनमीटरप्रमाणे रु.2,60,526/- एवढी रक्कम निरर्थक खर्च करण्यात आली. प्रत्यक्षात मुळात आवश्यकता नसल्याने सदरचे काम न करता रु.2,60,526/- ची उचल करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब शासन निधीतून अनावश्यक खर्च केल्याने तो वसुलपात्र ठरतो. वसुली करुन शासन जमा करण्यात यावे.

2) अंदाजपत्रकातील बाब क्र.5 व 6 वरील कॉंक्रीटीकरणाच्या कामातील रुंदी अनियमितपणे वाढवून अनुक्रमे रु.5,18,423/- (73.88% ज्यादा) व रु.13,44,285/- (60.53% ज्यादा) मुल्याचे अतिरिक्त काम नोंदविण्यात येवून त्या अनुषंगाने रु.19,83,948/- चे अतिरिक्त प्रदान करण्यात आले आहे.

3) उपरोक्त उदाहरणाचे व्यतिरिक्त इतर कामांच्याही लेखापरीक्षणात कॉंक्रीटीकरणाच्या बाबीवर सर्वसाधारणपणे अतिरिक्त काम केल्याचे नोंदविण्यात आले आहे. सदर वाढीव कामासाठी सुधारित मान्यता तांत्रिक मंजूरी, परवानगी इ.घेतली जात नाही असेही दिसते. सदर कॉंक्रीटीकरणाच्या कामात कंत्राटदारास तुलनेने ज्यादा आर्थिक लाभ प्राप्त होत असल्याचे शक्यता असून त्यासाठी इतर आवश्यक बाबीचे कार्यान्वयन न करता बचत केली जात असावी असे वाटते. सदर वस्तुस्थितीची मनपा प्रशासनाने जाणीवपूर्वक तपासणी करणे उचित व आवश्यक असेल.

या संदर्भात जारी केलेल्या अर्धसमासपत्र क्र.114, दिनांक 29/07/2016 वरील अभिप्राय प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

मनपाच्या विविध प्रकारच्या मोजमापांतर्गत कामांच्या नस्त्यांचे लेखापरीक्षण करताना अनियमित वाढीव कामांची वरील बाब समान आढळून आली आहे. परिणामी शासनाकडून प्राप्त अनुदान व मनपा निधीचा मोठया प्रमाणात गैरविनियोग करण्यात आल्याची शक्यता आहे

DATABWM6901 (Ref No : 17, Hmm No : 114)

**31 म.न.पा.चंद्रपूर शहर येथील अधिकारी/कर्मचारी व इतर फर्मला दिलेल्या अग्रिमाबाबत.**

सन 2014-15



Scanned by CamScanner

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***सन 2014-15 या आर्थिक वर्षात मनपा चंद्रपूर शहरने त्यांचे अधिकारी/कर्मचारी तसेच इतर फर्मला दिलेल्या अग्रिमांचे समायोजन अग्रिम दिल्यापासून तीन महिन्यांचे आत करणे आवश्यक असतांना ब-याच कालावधीपर्यंत ते प्रलंबित ठेवून विलंबाने समायोजन केले आहे. दोन अग्रिमांचे 1994 व 2004 पासून अद्यापही समायोजन करण्यात आले नाही.***

चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरने सन 2014-15 या आर्थिक वर्षात त्यांचे अधिकारी/कर्मचारी तसेच इतर फर्मला योजना/उपक्रम राबविणे/प्रवासभत्ता तसेच वाहन खरेदीकरिता अग्रिम दिल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मं.मुंबई शासन निर्णय क्र.विअप्र-10.08/प्र.क्र.70/2008/विनियम, दिनांक 15.5.2009 तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, 1978, भाग पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.18, नियम क्र.142-क नुसार अग्रिम काढल्याच्या दिनांकापासून तीन महिण्यांचे आत त्याचे समायोजन करणे आवश्यक आहे. परंतु ब-याच विलंबाने अग्रिमाचे समायोजन केल्याचे दिसून येते. तसेच विवरणपत्रातील अ.क्र.1 व 2 वरील अग्रिमाचे प्रदीर्घ कालावधीपासून प्रलंबित असून अद्यापही समायोजन करण्यात आले नाही.

पुढील तक्त्यामधील अ.क्र.3 ते 27 वरील अग्रिमाचे समायोजन विहित मुदतीच्या नंतर विलंबाने करण्यात आले आहे. याप्रमाणे वर्षानुवर्षे आकस्मिक खर्चासाठी कर्मचा-यांना देण्यात आलेल्या रकमांच्या खर्चाची देयके कार्यालयास सादर न करणे व पर्यायाने आवश्यक समायोजन न करणे या गंभीर अनियमिततेमुळे रकमांचा गैरवापर, गैरविनियोग, अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि, प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

अग्रिमाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | अग्रिम दिलेल्या अधिकारी/ कर्मचारी/ फर्मचे नांव | प्रमाणक क्र.व दिनांक | अग्रिम देण्याचे प्रयोजन | अग्रिमाची रक्कम | अग्रिम समायोजन प्र.क्र.व दि. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | टाटा इंजि.ऑटो.कंपनी, | प्र.क्र.2400 दि.24.11.1994 | टाटा सुमो कार खरेदी अग्रिम | 20000/- | - | |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दिल्ली | | | | | |
| 2 | श्री.संजय वाघमारे, टाऊन प्लॅनर | प्र.क्र.325., दि.1.6.2004 | मुंबई प्रवास भत्ता अग्रिम | 6000/- | - | |
| 3 | श्री.बेनहर इ.जोसेफ, एस.आय. | प्र.क्र.727, दि.15.1.2010 | प्रदुषण नियंत्रक मंडळ, चंद्रपूर यांचेकडून शहरातील नाल्यातील पाण्याची तपासणीबाबत अग्रिम. | 5000/- | प्र.क्र.285, दि. 11.6.2014 | माहे मे-14 पेड इन जून-14 चे वेतनातून कपात |
| 4 | श्री.महेश के.बारई, कनिष्ठ अभियंता | प्र.क्र.96, दि.23.12.2011 | महानगरपालिका हद्द वाढविणेबाबतचा प्रस्ताव तयार करणेकरिता अग्रिम | 15000/- | प्र.क्र.292, दि. 11.6.2014 | माहे मे-14 पेड इन जून-14 चे वेतनातून कपात |
| 5 | श्री.अनिल मेदमवार, कनिष्ठ लिपिक | प्र.क्र.352, दि.9.7.2012 | मुंबई प्रवासाकरिता प्रवासभत्ता अग्रिम | 2500/- | प्र.क्र.270, दि.11.6.2014 | माहे मे-14 पेड इन जून-14 चे वेतनातून कपात |
| 6 | श्री.राऊत, नगर रचनाकार | प्र.क्र.1347, दि.4.2.2013 | चंद्रपूर विकास योजना अधि प्रमाणित प्रति सादर करणेबाबत अग्रिम | 40000/- | प्र.क्र.199, दि. 4.6.2014 | |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | श्री.सुरेश अरगुडे, वाहन चालक | प्र.क्र.1783, दि.30.3.2013 | मा.आयुक्त यांचे वाहन सर्व्हीसिंगकरिता अग्रिम | 10000/- | प्र.क्र.107, दि.7.5.2014 | |
| 8 | श्री.सुरेश अरगुडे, वाहन चालक | प्र.क्र.540, दि.23.8.2013 | मा.आयुक्त व महापौर यांचे कारकरिता कव्हर खरेदी | 2000/- | प्र.क्र.389, दि.4.8.2014 | माहे जुलै-14 पेड इन ऑगस्ट-14 चे वेतनातून कपात |
| 9 | डॉ.सौ.अलका आकुलवार, वैद्यकीय अधिकारी | प्र.क्र.683, दि.25.9.2013 | नागरी आरोग्य केन्द्राकरिता किरकोळ खर्चासाठी अग्रिम | 5000/- | प्र.क्र.44,दि. 29.4.2014 | |
| 10 | श्री.मनोज नव्हेट, कनिष्ठ लिपिक,कर विभाग | प्र.क्र.986, दि.7.12.2013 | मनपाचे मालकीचे गांधी चौक व जटपुरा कांजी व्यापार संकुलाचे जाहीर फेरलिलाव दि.7.12.13 व दि.9.12.13 चे किरकोळ खर्चाकरिता अग्रिम | 4000/- | प्र.क्र.223, दि.4.6.2014 | |
| 11 | श्री.बी.डी.गोवर्धन, कनिष्ठ लिपिक,कर विभाग | प्र.क्र.1309, दि.24.1.2014 | मनपा समोरील बाजार फी वसुलीचे कंत्राट लिलाव दि.28.1.14 चे किरकोळ खर्चाकरिता अग्रिम | 4000/- | प्र.क्र.442, दि.2.9.2014 | |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 12 | डॉ.अंजली आंबटकर, वैद्यकीय अधिकारी | प्र.क्र.1237, दि.10.1.2014 | दि.19.1.2014 ला होणा-या पल्स पोलीओ लसीकरण कार्यक्रमाचे खर्चाकरिता अग्रिम | 35000/- | प्र.क्र.745, दि.10.9.14 | |
| 13 | श्री.संतोष गर्गेलवार, आ.नि. | प्र.क्र.1484, दि.20.2.2014 | मनपा कत्तलखाना (सॉल्टर हाऊस) अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 नुसार परवाना फी करिता अग्रिम | 25000/- | प्र.क्र.531, दि .23.7.2014 | |
| 14 | डॉ.अंजली आंबटकर, वैद्यकीय अधिकारी | प्र.क्र.1496, दि.21.2.2014 | मनपातर्फे दि.23.2.2014 ला पल्स पोलीओ अभियानाकरिता किरकोळ खर्चाकरिता अग्रिम | 29000/- | प्र.क्र.786, दि.10.9.2014 | |
| 15 | श्री.विजय मोगरे | प्र.क्र.1675, दि.13.3.2014 | ब्लाऊज पेटीकोट शिलाई | 48560/- | प्र.क्र.565, दि.01.8.2014 | |
| 16 | श्री.नंदु लाखे, कनिष्ठ लिपिक | प्र.क्र.981, दि.7.12.2013 | मुंबई प्रवासाकरिता प्रवासभत्ता अग्रिम | 2000/- | प्र.क्र.561, दि. 13.10.2014 | माहे सप्टेंबर-14 पेड इन ऑक्टोबर-14 चे वेतनातून कपात |
| 17 | श्री.सुरेश अरगुडे, वाहन चालक | प्र.क्र.132, दि.27.5.201 | मनपाचे वाहन क्र.एमएच-34-9887 फियाटचे सर्व्हीसिंगकरिता | 15000/- | | |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | अग्रिम | | | |
| | | | प्र.क्र.607,दि.19.11.2014 | 3000/- | एकूण रु.15000/- | |
| | | | प्र.क्र.755,दि.6.12.2014 | 3000/- | | |
| | | | प्र.क्र.817, दि.17.1.2015 | 3000/- | | |
| | | | प्र.क्र.900, दि.13.2.2014 | 3000/- | | |
| | | | प्र.क्र.981, दि.4.3.2015 | 3000/- | | |
| 18 | श्री.मधुसुदन दिंगलवार, आ.नि. | प्र.क्र.151, दि.29.5.2014 | खाजगी कामगार घेण्यास | 25000/- | प्र.क्र.1054, दि.14.11.2014 | |
| 19 | श्री.भूपेश गोटे | प्र.क्र.153, दि.29.5.2014 | किरकोळ साहित्य खरेदी | 2500/- | प्र.क्र.1037, दि.14.11.2014 | |
| 20 | श्री.बंडु आत्राम, कनिष्ठ लिपिक,जनगणना | प्र.क्र.595, दि.8.8.2014 | जनगणना 2014 चे प्रगणक गटानिहाय लोकसंख्येची आकडेवारी व नकाशे तसेच संगणीकृत तयार करणेकरिता अग्रिम राशी | 5000/- | प्र.क्र.1389,दि.19.12.2015 | |
| 21 | श्री.भूपेश गोटे, आरोग्य निरीक्षक | प्र.क्र.1198, दि.6.12.2014 | मनपा नवीन इमारत व सभागृहात असणारे संडास,सिंक व इतर साफसफाईकरिता अग्रिम | 5000/- | प्र.क्र.1388,दि.19.12.2015 | |
| 22 | श्री.विवेक | प्र.क्र.1699, | महाकाली देवी | 10000/ | प्र.क्र.1705,दि.13.8.20 | |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोतनुरवार, आरोग्य निरीक्षक | दि.25.2.2015 | यात्रेकरिता व्यवस्था अग्रिम | - | 15 | |
| 23 | श्री.सुभाष तोंबरे, लिपिक, फायर विभाग | प्र.क्र.1732, दि.3.3.2015 | मा.आयुक्त यांचे कार्यालयीन वाहन दुरुस्ती. | 10000/- | प्र.क्र.769,दि.13.8.2015 | |
| 24 | श्री.सारंग निर्मळे, प्रभाग अधिकारी,झोन क्र.2 | प्र.क्र.1899, दि.19.3.2015 | महाकाली यात्रा किरकोळ साहित्य खरेदीकरिता अग्रिम | 10000/- | प्र.क्र.770, दि. 13.8.2015 | |
| 25 | श्री.दिलीप नवघरे, वाहन चालक | प्र.क्र.2157, दि.31.3.2015 | मनपा वाहन क्र.एमएच-34-9596 चे सर्व्हीसींग व इतर खर्चाकरिता अग्रिम | 14000/- | प्र.क्र.771, दि. 13.8.2015 | |
| 26 | श्री.मनोज नन्हेट, कनिष्ठ लिपिक | प्र.क्र.2158, दि.31.3.2015 | नागरिकांना एसएमएस द्वारा अवैध बॅनर बोर्ड बाबत माहिती पुरविण्याकरिता नविन मोबाईल हॅण्डसेट घेण्याकरिता अग्रिम | 2300/- | प्र.क्र.548, पावती क्र.54732, दि. 5.11.2015 | नुसार मनपा फंडात रक्कम जमा |
| 27 | श्री.शरद नागोसे, कनिष्ठ लिपिक | प्र.क्र.2164, दि.31.3.2015 | महाकाली यात्रा 2015 करिता किरकोळ खर्चासाठी अग्रिम | 3000/- | प्र.क्र.1076,दि. 5.10.2015 | |

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 82, दि.20.06.2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून कोणतेही समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 38, Hmm No : 82)



Scanned by CamScanner

32 श्री. महेश बारई, शहर अभियंता, मनपा, चंद्रपूर यांचे प्रवासभत्ता देयकामध्ये चुकीचे आकारणीमुळे झालेल्या अतिप्रदानाचे वसुलीबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :126 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 9134.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9134.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3147.00/-

**श्री.महेश बारई, शहर अभियंता, मनपा, चंद्रपूर शहर यांनी माहे फेब्रुवारी-2015 मध्ये चंद्रपूर ते मुंबई येथे बैठकीकरिता केलेल्या प्रवासाचे प्रवासभत्ता देयकामध्ये चुकीची आकारणी केल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाचे वसुलीबाबत.**

1) प्रमाणक क्र.1758,
दिनांक - 3.3.2015
प्रदान रक्कम – 9134/-
लेखा शिर्ष – 126,

चंद्रपूर शहर महानगरपालीकेचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात श्री.महेश बारई, शहर अभियंता, मनपा, चंद्रपूर शहर यांनी मुंबई येथे होणा-या बैठकीकरिता दिनांक 25.2.2015 ते दिनांक 28.2.2015 या कालावधीत चंद्रपूर ते मुंबई व परत अशा शासकीय कामाकरिता केलेल्या प्रवासाचे प्रवासभत्ता देयक रु.9134/- मंजूरीस सादर केलेले आहे. सदर देयकाची तपासणी केली असता खालीलप्रमाणे देयक मंजूरीस सादर केलेले आहे.

| निघण्याचे ठिकाण | दिनांक | वेळ | पोचण्याचे ठिकाण | दिनांक | वेळ | वाहनाचा प्रकार | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चंद्रपूर | 25.2.2015 | दु.3.00 | नागपूर | 25.2.2015 | सायं.6.00 | खाजगी वाहन | 1440 |
| नागपूर | 25.2.2015 | रा.8.40 | मुंबई | 26.2.2015 | स.7.55 | रेल्वे | 1707 |
| **मुंबई** | **26.2.2015** | **रा.8.15** | **नागपूर** | **27.2.2015** | **स.7.20** | **रेल्वे** | **1707** |
| मुंबई | 27.2.2015 | रा.8.15 | नागपूर | 28.2.2015 | स.7.20 | रेल्वे | 2302 |
| नागपूर | 27.2.2015 | स.9.30 | चंद्रपूर | 27.2.2015 | दु.12.00 | खाजगी कार | 1440 |
| | | | दैनिक भत्ता | @ रु.290/- | प्रमाणे 2 दिवस | | 580 |
| | | | | | | एकूण | 9134 |



Scanned by CamScanner

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत –

श्री.बारई, शहर अभियंता यांनी दिनांक 26.2.2015 रोजी सकाळी 7.55 वाजता मुंबई येथे पोहोचल्यानंतर दिनांक 26.2.2015 रोजीची बैठक रद्द होवून त्याऐवजी दिनांक 27.2.2015 रोजी निश्चित झाल्याने दिनांक 26.2.2015 रोजी मुंबई येथे मुक्काम करून सदर प्रवासाचे तिकीट रद्द करणे आवश्यक होते. परंतु, सदर प्रवासाचे तिकीट रद्द न करता दिनांक 26.2.2015 रोजी रात्री 8.15 वाजता मुंबईहून नागपूरला प्रवास केल्याचे देयकात दर्शविण्यात आले आहे. तसेच, पुन्हा दिनांक 27.2.2015 रोजी मुंबईहून नागपूरला प्रवास केल्याचे देयकात नमुद केले आहे. त्याच दिवशी म्हणजेच दिनांक 27.2.2015 रोजी मुंबई येथे बैठक असताना सदर देयकात दिनांक 27.2.2015 रोजी नागपूर ते चंद्रपूर खाजगी वाहनाने प्रवास केल्याबद्दल रु.1440/- ची आकारणी व प्रदान करण्यात आले आहे. दिनांक 26.2.2015 व दिनांक 27.2.2015 रोजी दोनदा मुंबईहून नागपूर प्रवास दर्शविण्यात आला परंतु नागपूरहून परत मुंबईला प्रवास केल्याचे देयकात नमुद नाही.

त्यामुळे, दिनांक 26.2.2015 रोजी मुंबई ते नागपूर प्रवासाचे तिकीटाचे भाडे रु.1707/- तसेच दिनांक 27.2.2015 रोजी नागपूर ते चंद्रपूर रोजी खाजगी वाहनाने केलेल्या प्रवासाचे भाडे रु.1440/- अशी एकूण रु.3147/- ची वसुली संबंधितांकडून करून रक्कम मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

DATDSTM7301 (Ref No : 39, Item No : 97)

| 9 | वडगाव प्रभाग नानाजी घर रस्ता डांबरीकरण. | 4232260 | 238 | 31.03.15 | 4189920 | 4300 | 100 | 4200 |
| 10 | गौरी तलाव प्रभाग ते तेलंग घर कॉंक्रीट नाली. | 2296000 | 240 | 31.03.15 | 1257437 | 2300 | 100 | 2200 |
| 11 | लालपेठ कॉलरी बाबुल झाडे ते राजन प्रवीण घर कॉंक्रीट रस्ता. | 1861140 | 241 | 31.03.15 | 592948 | 1900 | 100 | 1800 |
| 12 | अंचलेश्वर प्रभाग बुद्ध विहार कॉंक्रीट रोड. | 2182060 | 245 | 31.03.15 | 2015173 | 2200 | 100 | 2100 |
| 13 | महाकाली मंदिर राकडे ते पचारे घर कॉंक्रीट रस्ता. | 2496210 | 259 | 31.03.15 | 1930734 | 2500 | 100 | 2400 |
| 14 | विवेकनगर प्रभाग डॉ. कमार ते डॉ. सरदेशपांडे कॉंक्रीट रस्ता. | 2167160 | 263 | 31.03.15 | 833128 | 2200 | 100 | 2100 |
| 15 | लालपेठ प्रभाग राजू भाई ते राजल्ला घर कॉंक्रीट रस्ता. | 1313070 | 267 | 31.03.15 | 1315472 | 1400 | 100 | 1300 |
| 16 | बायपास रोड ते हनुमान मंदिर रस्ता बांधकाम. | 2942500 | 272 | 31.03.15 | 2815204 | 3000 | 100 | 2900 |
| 17 | विवेकनगर प्रभाग जैन ते टावर पर्यंत रस्ता डांबरीकरण. | 1782890 | 212 | 30.03.15 | 1764478 | 1800 | 100 | 1700 |
| 18 | शास्त्रीनगर रचना अपार्टमेंट ते चर्च रस्ता डांबरीकरण. | 2593810 | 210 | 30.03.15 | 2567938 | 2600 | 100 | 2500 |
| 19 | इंदिरानगर प्रभाग दुरटकर ते शेंडे कॉंक्रीट रोड. | 2045700 | 201 | 26.03.15 | 2023174 | 2100 | 100 | 2000 |
| 20 | अंचलेश्वर गेट ते बगला चौक रस्ता डांबरीकरण. | 30123990 | 200 | 26.03.15 | 8430590 | 32000 | 100 | 31900 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 21 | बाजार प्रभाग बोहरा ते धेनुरकर घर कॉंक्रीट रस्ता. | 2533200 | 199 | 26.03.15 | 836035 | 2600 | 100 | 2500 |
| 22 | साठे चौक ते बिनबा चौक रस्ता डांबरीकरण. | 3267900 | 195 | 26.03.15 | 2948500 | 3300 | 100 | 3200 |
| 23 | शास्त्रीनगर धोटे ते कांबळे घर डांबर रोड. | 1493300 | 189 | 25.03.15 | 1407021 | 1500 | 100 | 1400 |
| 24 | नोफरकार लेआउट कॉंक्रीट रोड. | 2530830 | 182 | 07.03.15 | 2503020 | 2600 | 100 | 2500 |
| 25 | | 1952400 | 181 | 07.03.15 | 1930981 | 2000 | 100 | 1900 |
| 26 | | 1397710 | 165 | 02.03.15 | 1397710 | 1400 | 100 | 1300 |
| 27 | | 3985720 | 161 | 02.03.15 | 3901879 | 4000 | 100 | 3900 |
| | | | | | | | एकूण नहसुली हानी रु. | 2,01,200 |

DATABWM6901 (Ref No : 52, Ilmm No : 54)

### 43 वृक्षारोपण/वृक्षसंवर्धन योजनेंतर्गत वृक्षलागवड करणेबाबत.

त्यांना आवडेल ते झाड', सन 2014-15

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 03

*लेखा शीर्ष :304 मनपा/वृक्ष निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1167158.00 /- आक्षेपाधीन रक्कम रू. 1167158.00/-

*नागरिकांना प्राप्त झालेली रोपे विक्रीची 50% रक्कम रु. 5,83,579/- मनपाच्या वृक्षनिधीमध्ये जमा झाल्याचे दिसून आले नाही. किमान एक वर्षापर्यंत झाडे जिवंत राहिले असल्यास नागरिकास रकमेची परतफेड करण्यात आली नाही म्हणजेच झाडे जिवंत नसल्याचे स्पष्ट होते व त्यावरील खर्च निष्फळ झाल्याचे दिसून येते. सामाजिक वनीकरण विभाग, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, कृषी विभागातील रोपवाटिकांमध्ये उद्दीष्टांतर्गत मोफत रोपे उपलब्ध असताना मनपाच्या प्रशासकीय प्रस्तावाच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे खाजगी रित्या रू11,67,158/- ची खरेदी करून अवाजवी खर्च करण्यात आला.*



Scanned by CamScanner

प्रमाणक क्र.704 दि.02.09.2014 रु.451130/-

प्रमाणक क्र.01 दि.02.12.2014 रु.548870/-

प्रमाणक क्र.02 दि.23.03.2015 रु.167158/-

चंद्रपूर शहरामध्ये सी.एस.टी.पी.एस., वे.को.लि. (वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड) व इतर कारखाने असल्याने शहरामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्यामुळे प्रदूषण मुक्त शहर व पर्यावरण संवर्धनाचे दृष्टीकोनातून शहरात वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन व वृक्षाचे संरक्षण करतील अश्या नागरिकांना "त्यांना आवडेल ते झाड" उपलब्ध करून देण्याची योजना सन 2014-15 मध्ये मनपातर्फे राबविण्यात आली आहे. महानगरपालिका व पर्यावरण प्रेमी संस्था तर्फे सर्वेक्षण करणाऱ्या चमूजवळ वृक्षांची रोपे लागवड व संवर्धनासाठी नोंदणी करावयाची होती. त्याप्रमाणे प्राप्त झालेले निविदा दरातील 50% दराने तीन फूट वाढलेली रोपे नागरिकांना मौलाना अब्दुल कलम आझाद उद्यान, चंद्रपूर येथून उपलब्ध करून देण्यात आली. रोपांचे वर्षभर योग्य जतन व संगोपन करून रोपांचे सुदृढ वृक्षात रुपांतर केल्यास महानगरपालिका व पर्यावरण प्रेमी संस्था यांचे संयुक्त समितीद्वारे पुढील वर्षी जुलै महिन्यात नागरिकांना अदा केलेल्या रकमेच्या रोपांची किंमत परत करण्यात येईल या तत्वावर "आवडेल ते झाड" ही योजना राबविण्यात आली.

यावर लेखापरीक्षणाचे पुढील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वृक्षनिधी शिर्षाखाली "आवडेल ते झाड" या योजनेकरिता सन 2014-15 मध्ये 43,621 झाडांची निविदा धारकाकडून खरेदी करण्यात आली त्यावर रु.11,67,158/- महानगरपालिकेने खर्च केलेले आहे. 50% सवलतीच्या दराने तीन फुट वाढलेली रोपे नागरिकांना मौलाना अब्दुल कलाम आझाद उद्यान चंद्रपूर येथून उपलब्ध करून दिल्यानंतर नागरिकांना प्राप्त झालेली रोपे विक्रीची 50% रक्कम रु. 5,83,579/- वृक्षनिधीमध्ये जमा झाल्याचे दिसून आले नाही.

2) योजनेच्या आराखड्याप्रमाणे किमान एक वर्षापर्यंत जिवंत राहिलेल्या झाडामागे संबंधित नागरिकास त्याने त्या रोपापोटी महानगरपालीकेस अदा केलेली खरेदीची किंमत परत करण्याचे अपेक्षित होते. परंतु अशी कोणतीही रक्कम परत केलेली नाही असे दिसते. म्हणजेच रु. 11,67,158/- खर्चूनही रोपे एक वर्षापर्यंतही जगू शकली नाही असे म्हणता येते. झाडी जगली असल्यास मनपाकडे तशी नोंद नाही. म्हणजेच रु.11.67 लाख हा खर्च निष्फळ ठरला अशी शक्यता नाकारता येत नाही.

3) महसूल व वन विभागाचे शासन परिपत्रक क्र.एफडीएम-2013/प्र.क्र.329/फ-3, दि. 5 मार्च 2014 अन्वये सन 2014-15 साठी लागवड कार्यक्रमा अंतर्गत नागपूर विभागास 3 कोटी 77 लाख उद्दिष्ट प्राप्त होते असे नस्तीमधील उपलब्ध अभिलेख्यावरून दिसते. त्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, कृषी विभागातील रोपवाटिकांमध्ये मोफत रोपे उपलब्ध असताना मनपाने स्थायी समितीचे ठराव क्रमांक 63, दि.10/07/2014 अन्वये 'आवडेल ते झाड' ही रु. 15 लाख मूल्याची योजना वित्तीय औचित्यामध्ये बसत नसताना मनपाच्या प्रशासकीय प्रस्तावाच्या अनुषंगाने मंजूर केली.

वरील क्र. 2 व 3 वरील मुद्दे विचारात घेतल्यास आवश्यक नसतांना योजना राबविणे व राबविलेल्या योजनेवर कार्योत्तर नियंत्रण नसल्याने त्यावरील संपूर्ण खर्च निष्फळ ठरुन पर्यायाने जनतेच्या रकमेचा चुकीच्या पद्धतीने विनियोग झाल्याने मनपा निधीची हानी झाली आहे.

DATPMPM5901 (Ref No : 55, Hmm No : 125)



Scanned by CamScanner

44 वैयक्तिक शौचालय योजनेवरील प्राप्त निधीपैकी चार वर्षात केवळ 7% निधी खर्च करून शासन निधी अकारण अडकवून ठेवणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : 344 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 75515000.00 /-

| |
|---|
| शासनाची महाराष्ट्र सुजल व निर्मल योजना अभियानांतर्गत जाहीर केलेली योजना अतिशय समाधानकारकपणे राबवून अखर्चित निधी महानगरपालिकेने उद्दिष्टपुर्तीविना मोठ्या प्रमाणावर बँकेत अकारण गुंतवून ठेवलेला आहे. |

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राज्यात महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांकडील खाजगी नळ व वैयक्तिक शौचालय बांधकाम योजनेसाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. नादक 2012/प्र.क्र.-121/ पापु-22, दि.01/03/2012अन्वये सहा महिन्याच्या कालावधीसाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्ट व अनुदान प्राप्त झाले होते.

<u>मूळ योजना</u>

1) उद्दिष्ट- i) खाजगी नळ जोडणी - 616

ii) वैयक्तिक शौचालय - 408

iii) नळ कनेक्शन – वैयक्तिक शौचालय - 2150

टीप:- (ii व iii मिळून एकूण 2558 उद्दिष्ट)

2) शासन:- लाभार्थी हिस्सा- 90% : 10% (यामधील 10% हिस्सा प्रत्येक लाभार्थी किंवा मनपाने उपलब्ध करून द्यावयाचा होता)

3) नागरी संस्थेचा सहभाग किंवा लाभार्थी हिश्श्यासह अनुज्ञेय अनुदान

1. खाजगी नळ जोडणी - रु. 4000 प्रति कुटुंब

2. वैयक्तिक शौचालय बांधकाम- रु.12000/-

4) मंजूर योजनेचे मूल्य - रु. 7,55,15,000/- (7.55 कोटी)

शासन अनुदान 90% - 6,79,63,500/- (प्रत्यक्ष प्राप्त अनुदान रु.3.39 कोटी )

नागरी संस्थेचा सहभाग 10%- 75,51,500/-

-----------

एकूण रु. 7,55,15,000/-



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

चंद्रपूर महानगरपालिकेचे त्रैमासिक प्रगती अहवालानुसार सन 2014-15 अखेरपर्यंत 177 लाभार्थ्यांनी अनुदानाचा लाभ घेतला व 45 लाभार्थ्यांची कामे सुरु आहेत असे दिसून येते.

या योजनेतील निधीबाबतची आकडेवारी पुढील प्रमाणे आहे.

अ) अंदाजपत्रकाप्रमाणे सन 2011-12 ते 2014-15 पर्यंत झालेला एकूण खर्च

सन 2011-12- रु. 272516/-

सन 2012-13- रु.1228000/-

सन 2013-14- रु. 507000/-

सन 2014-15- रु. 460000/-

---------------

एकूण रु.24,67,516/- (प्राप्त अनुदानाच्या 7%) (रु.17.70 लक्ष उपयोगिता प्रमाणपत्रानुसार खर्च)

ब) बँक खाते पुस्तिकानुसार

(खाते क्र.06910110002445)

युको बँक चंद्रपूर

सन 2014-15 अखेर उपलब्ध शिल्लक रु.246261/-

क) एकूण 2 FDR द्वारे गुंतवलेली मुद्दल

FDR- 915086 रु.5982090

FDR- 914940 रु.6075631

---------------

रु.12057721/- (या गुंतवणुकिवरील प्राप्त व्याज रु.760952)

एकूण (अ+ब+क) रु.1.47 कोटी

मनपास या योजनेंतर्गत प्राप्त निधी – रु.3.39 कोटी

---------------

तफावत रु.1.92 कोटी

या वरील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) या योजनेखाली सन 2011-12 पासून एकूण प्राप्त निधी 3.39 कोटी असतांना वरील अ, ब व क प्रमाणे 1.47 कोटी एवढ्या निधीचा तपशील आढळून येतो. उर्वरित 1.92 कोटी बाबत महानगरपालिकेकडे नोंद/अभिलेखे आढळून आले नाही व तसा खुलासाही करण्यात आला नाही.

2) अंदाजपत्रकावरील आकडेवारीनुसार (वरील अ) सदर योजना सुरु झाल्यापासून 24.67 लक्ष एवढा खर्च झाला असतांना 24.67 लक्ष ऐवजी 17.70 लक्ष या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास पाठविण्यात आले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकीय खर्चाची आकडेवारी किंवा उपयोगिता प्रमाणपत्र मधील नोंदी चुकीच्या व मोघम असल्याचे दिसते.

3) वरील 'अ' मधील आकडेवारीनुसार झालेला खर्च हा प्राप्त रु.3.39 कोटी अनुदानाच्या तुलनेत अत्यल्प असून उर्वरित निधी अनियमितपणे शासनाच्या परवानगी शिवाय बँकांमध्ये वेळोवेळी गुंतवून व पुनःर्गुंतवणूक करुन संबंधित शासन निधी 'कल्याणकारी' योजनेवर न राबविता व्याजरुपाने महसूल प्राप्त करण्यासाठी वापरला आहे. सदर बाब शासनाच्या धोरणात्मक निर्णयाशी विसंगत असून सदर अनियमिततेस शासनाकडून क्षमापन प्राप्त करावे व बँकाकडून प्राप्त



Scanned by CamScanner

व्याजाची रक्कम रु.7,60,952/- (उपलब्ध गुंतवणूक नोंदवहीनुसार) युको बँक, चंद्रपूर खाते क्र.06910110002445 रु. 5982090 व व खाते क्र.06910110002445 रु. 6075631 व मूळ अखर्चित रक्कम शासनास परत करावी. एकंदरीत या योजनेची अंमलबजावणी अत्यंत असमाधानकारक असे नमूद करण्यात येते.

या संदर्भात अर्धसमासपत्र क्र. 122, दि.03/08/2016 अन्वये जारी केलेल्या अर्धसमासाच्या अनुषंगाने खुलासा अप्राप्त असल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATPMPM5901 (Ref No : 56, Hmm No : 122)

## 45 विद्युत देखभाल दुरुस्तीच्या देयकातून आवश्यक कपाती न करणे, वापरलेल्या साहित्य व निकामी साहित्याबाबत उचित नियंत्रण नसणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :159 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 14178009.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13105488.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1072521.00/-

| |
|---|
| *विद्युत देखभाल दुरुस्तीच्या कामात नव्याने लावलेल्या साहित्याची तपासणी व ते बसवितांना निरीक्षण न करणे, योग्य दराने शासकीय कराची वसुली न करणे, इ अनियमितता आढळून आल्या आहेत.* |

मनपा चंद्रपूर मध्ये विद्युत विभागाशी संबंधित देखभाल दुरुस्ती, खरेदी इ. वर मोठ्या प्रमाणावर खर्च होत असून त्यामध्ये वापरलेल्या साहित्याची मे. आधुनिक इलेक्ट्रिक सर्व्हिस, चंद्रपूर यांचेकडे सन 2013-14 व 2014-15 या दोन वर्षातील विद्युत पथदिवे देखभाल व दुरुस्तीचे कंत्राट असून त्यांना अंदाजपत्रकीय आकडेवारीनुसार पुढीलप्रमाणे शोधन करण्यात आले आहे.

**2013-14 - रु. 72,72,444/-**
**2014-15 - रु. 1,41,78,009/-**

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत –

1. TDS - अ) आयकर अधिनियमाच्या कलम 194- C नुसार कंत्राटदाराच्या देयकातून पुढीलपैकी लागू दरानुसार आयकराची कपात करणे आवश्यक आहे.

अ) 1% - of payment made to individual or HUF.

ब) 2% - In all other cases.

सदर प्रकरणातील निविदा मे. आधुनिक इलेक्ट्रिक सर्व्हिस, चंद्रपूर या नावाने मंजूर असून त्याच नावाने रकमांचे



Scanned by CamScanner

प्रदान झाले आहे. त्यामुळे वरील 'ब' प्रमाणे आयकर कपातीचा दर 2% हा लागू ठरतो. परंतु 1% प्रमाणे कपात करण्यात आल्याने पुढीलप्रमाणे केंद्रशासनाच्या महसुलाची हानी झाली आहे.

(रक्कम रुपयात)

| वर्ष | देयकाची एकूण रक्कम | आयकर कपात | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष 1% | आवश्यक 2% | हानी 1% |
| 2013-14 | 72,72,444 | 72,724 | 1,45,449 | 72,724 |
| 2014-15 | 1,41,78,009 | 1,41,780 | 2,83,560 | 1,41,780 |
| एकूण हानी | | | | 2,14,504 |

ब) मनपा अंतर्गत इतरही विभागांच्या विविध प्रकारच्या कामांच्या अनुषंगाने कंत्राटदारांच्या मागण्यांचे प्रदान करतांना सर्वसाधारणपणे 2% एवजी 1% दराने आयकराची कपात केल्याचे दिसून आले आहे. कंत्राटदारांच्या निविदा कंपनीच्या नावाने (Other than individual and HUF – कलम 194c) व रकमांचे प्रदान कंपन्यांच्याच नावाने असले तरी त्या कंपन्यांच्या मालकाचे पॅन कार्ड उपलब्ध असल्यास 1% दराने आयकराची कपात करण्यात आली आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या महसुलाची हानी झाल्याची शक्यता आहे.

2. वैध अनुज्ञप्ती प्रमाणपत्र उपलब्ध नसणे

विद्युत विषयक कामे करणाऱ्या कंत्राटदारांना उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील अनुज्ञप्तीद्वारे व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात येते. सदरहू निविदेबाबत सादर केलेल्या दस्तऐवजामध्ये दि. 01.01.2011 ते 30.11.2013 या कालावधीचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र उपलब्ध आहे. तथापि, त्यानंतरच्या कालावधीचे तसे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने सन 2014-15 मध्ये केलेल्या कामासाठी शासनाने विहित केलेल्या आवश्यक तांत्रिक कार्यक्षमतेबाबत शंका निर्माण होण्यास वाव आहे.

3. नवीन साहित्याची चाचणी व निरीक्षण न होणे

कंत्राटदराने विद्युत देखभालीच्या कामासाठी वेळोवेळी नवीन साहित्य खरेदी करून यंत्रणेमध्ये बसविल्याचे अभिलेख्यावरून दिसते. तथापि ते साहित्य बसवितांना मनपाच्या तांत्रिक अधिकाऱ्याकडून प्रत्यक्ष निरीक्षण व साहित्याची चाचणी झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे देखभाल दुरूस्तीच्या नियमित देयकात वेळोवेळी लावलेल्या नवीन साहित्यांच्या खरेदीच्या मागणी मोघम असल्याची व त्रुटीपूर्ण असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

4. कामगार कल्याण उपकराची कपात न करणे

महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. बीसीए.2009 / प्र.क्र. 108 / कामगार – 7अ दि. 17.06.2010 नुसार दि. 01.07.2010 पासून कंत्राटी कामाच्या एकूण मूल्याच्या 1% कामगार कल्याण उपकर देयकातून कपात करणे आवश्यक होते.

सदर प्रकरणी अशी कपात न करण्यात आल्याने दोन्ही वर्षांचे एकूण प्रदान रु. 2,14,50,453/- चे 1% म्हणजे रु. 2,14,504/- चे राज्य शासन महसुलाचे नुकसान झाले आहे. याबाबत जारी केलेल्या अर्धसमासाच्या अनुषंगाने खुलासा करण्यात आला नाही. स्तव रु. 2,14,504/- वसुलपात्र आहे.

5. मूल्यवर्धित कराची कमी दराने कपात करणे

विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. VAT-1505/CR-123/Taxation-1 दि. 04.04.2012 पासून कार्यकंत्राट कराच्या दरात सुधारणा झाली आहे. त्यान्वये महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2 अंतर्गत नोंदणीकृत



Scanned by CamScanner

कंत्राटदारांकडून प्रदान रकमेच्या 2% व अनोंदणीकृत कंत्राटदारांकडून 5% कर कपात करणे आवश्यक आहे.

संबंधित नस्तीमध्ये निविदा प्रपत्रासोबत सदर कंत्राटदाराची दि. 01.04.2006 चे व्हॅट प्रमाणपत्र उपलब्ध आहे. परंतु सदर प्रकरणात निविदा सादर केल्याच्या दिनांकास वैध आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. शिवाय त्यासंबंधीचे अलीकडच्या वर्षाचे वार्षिक रिटर्न सुद्धा उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे अर्धसमासात उल्लेख केलेल्या या विषयीच्या मुद्द्याचे स्पष्टीकरण लेखापरीक्षणास प्राप्त झालेले नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता पुढीलप्रमाणे कामाच्या कार्यकंत्राट कराची 3% वसुली क्रमप्राप्त ठरते.

(रक्कम रुपयात)

| वर्ष | देयकाची एकूण रक्कम | कमी वसुली 3% |
|---|---|---|
| 2013-14 | 72,72,444 | 2,18,173 |
| 2014-15 | 1,41,78,009 | 4,25,340 |
| एकूण हानी | | 6,43,513 |

सदर बाबीची उचित शहानिशा करून आवश्यक कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 19, Hmm No : 127)

***46 महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 अन्वये मंजुर करण्यात येणा-या परतावा अग्रिम व नापरतावा रक्कम तसेच मासिक वर्गणीबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| *महानगरपालिका चंद्रपूर येथे महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 च्या नियम 8 (1)(ब) नुसार मुळ वेतनाच्या किमान 6% तसेच कमाल वर्गणी एकूण वित्तलब्धीच्या मर्यादेपेक्षा जादा दराने मासिक वर्गणी वसुल करणे, मर्यादेपेक्षा अतिरिक्त कपातीच्या रकमेवर अनावश्यक व्याज देणे, कर्मचा-यांना परतावा रक्कम मंजूर केल्यानंतर एकूण रकमेतून कमी न करणे तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार शेवटच्या हप्त्याचे ज्यादा प्रदान करणे इत्यादी प्रकरणी त्रुटया आढळून आल्या.* |



Scanned by CamScanner

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 च्या अनुषंगाने महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान भविष्य निर्वाह निधी मंजूर प्रकरणे तसेच नोंदवहीची पडताळणी केली असता पुढील त्रुटया आढळून आल्या.

1. योग्य पडताळणीशिवाय भविष्य निर्वाह निधी अग्रिमाची रक्कम मंजूर करणे-

सर्वसाधारण परिस्थितीत परतावा अग्रिम मंजूर करतांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 च्या 13 (2) अन्वये मुळ वेतनाच्या तीन पट किंवा खात्यात जमा असलेल्या शिल्लक रकमेच्या निम्मी रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल ती मंजूर करता येते. तसेच नियम क्र.13 (3) अन्वये खातेधारकाने मागील घेतलेले अग्रिमाचे किमान 12 मासिक हप्ते किंवा शेवटचा हप्ता यापैकी जो अगोदर असेल तो त्याची परतफेड करेपर्यंत सर्वसाधारण परिस्थितीत त्यास कमाल मर्यादेपेक्षा ज्यादा अग्रिम मंजूर करता येत नाही.

त्याचप्रमाणे नापरतावा रक्कम उचल करणेबाबत सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम क्र.16 ते 20 मधील तरतुदीनुसार वर्गणीदाराच्या सहा महिन्याच्या वेतनाएवढी रक्कम किंवा निधीतील शिल्लक रकमेच्या 50 टक्के यापैकी जी कमी असेल ती रक्कम किंवा वर्गणीदाराच्या खात्यात शिल्लक असणारी एकूण रक्कम व वर्गणीदाराच्या अग्रिमाचे प्रयोजन पाहता सक्षम प्राधिकारी त्यास शिल्लक रकमेच्या जास्तीत जास्त ¾ एवढी रक्कम मंजूर करता येईल.

भनिनि नोंदवहीची तसेच प्रकरणाची पडताळणी केली असता परतावा अग्रिम/नापरतावा रक्कम मंजूर करताना कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातील शिल्लक रक्कम किती व त्यानुसार अग्रिम मंजूरीस किती रक्कम पात्र आहे, याबाबत नमुना एक व नमुना तिन मध्ये माहिती परिपुर्ण भरलेली नाही, असे दिसून आले. त्यामुळे विभागाकडून प्राप्त अभिलेख्यानुसार किती रक्कम मंजूर केली याचा बोध होत नाही.

नमुना एक व तिन मध्ये माहीती परीपुर्ण भरलेली नसल्यामुळे उचल करावयाची रक्कम नियमानुसार प्रदान करण्यात आली किंवा नाही, यांची तपासणी करता आली नाही.

2. कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीचे वार्षिक विवरणपत्र न देणे-

सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार संबंधित वर्गणीदारांनी परतावा अग्रिम तसेच नापरतावा रकमेची मागणी विहित नमुन्यातील स्वतंत्र अर्ज नमुना-एक व नमुना-तीन अर्जासोबत सादर केलेला आहे. परंतु सादर केलेल्या अर्जासोबत वर्गणीदाराने मागील वर्षाचे खाते शिल्लक विवरणपत्र सादर केलेले नाही. महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी 1998 चे नियम 6 (1) (2) मधील तरतुदीनुसार प्रत्येक आर्थिक वर्ष समाप्तीनंतर शक्य तितक्या लवकर प्रत्येक वर्गणीदारास त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात वर्षभरात जमा वर्गणी , केलेली उचल, व्याजाची रक्कम तसेच 31 मार्च अखेर खात्यात असलेली शिल्लक रक्कम याबाबतचे खाते विवरणपत्र संबंधीत खातेदारास देवून अचुक असल्याची खात्री केल्याबद्दल पोच घेणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे खातेदाराच्या खाती शिल्लक असलेल्या रकमेशी योग्य ती पडताळणी न करता प्रकरणे मंजूर केलेली आहेत, असे निदर्शनास येते.

3. वित्तलब्धीनुसार वर्गणीची मर्यादा न तपासणे-

सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम क्र. 8 (1) (ब) नुसार मुळ वित्तलब्धीच्या किमान 6 टक्के दराने भविष्य निर्वाह निधीची मासीक वर्गणी वेतनातून कपात करणे आवश्यक आहे. तसेच कमाल वर्गणीची मर्यादा निश्चित केली असल्यामुळे त्याहून अधिक वर्गणी भरली असल्यास अशा ज्यादा भरण्यात आलेल्या रकमेवर व्याज देय नाही. महानगरपालिका कार्यालयात ठेवण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवही तसेच मासिक वेतन देयकाची पडताळणी केली असता उदाहरणादाखल खालील कर्मचा-यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची मासिक वर्गणी कमाल मर्यादेपेक्षा जादा कपात करुन त्यावर व्याज देण्यात



Scanned by CamScanner

आल्याने मनपा निधीची हानी झाली आहे.

1.श्री सिताराम ल. येरेवार शिपाई खाते क्र. 621 नुसार संबंधित वर्गणीदाराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

संबंधीत कर्मचा-याची मासिक वित्तलब्धी (मुळ वेतन 9620 व ग्रेड-पे रु. 1800) रु. 11420/- असताना माहे एप्रिल 2014 पासून वेतनातून दरमहा रु.13000/- दराने कपात करण्यात आली.

अ) माहे एप्रिल 2014 ते मार्च 2015 पर्यंत कपात केलेली वर्गणी रु. 13000x 12 = रु. 156000/-

ब) माहे एप्रिल 2014 ते जून 2014 पर्यंत कपात करावयाची वर्गणी रु. 11420x3 = रु. 34260/-

माहे जुलै 2014 ते मार्च 2015 पर्यंत कपात करावयाची वर्गणी रु. 11770x9 = रु.105930/-

(ब) रु. 140190/-

जादा कपात करण्यात आलेली रक्कम (अ) - (ब) रु. 15810/-

2. श्रीमती. ज्योती प्रतापसिंह राठौर क.लि. खाते क्र. 970 नुसार यांचे वेतनातून कमाल मर्यादेपेक्षा जादा मासिक वर्गणीची रक्कम रु. 14100/- दराने करावयाची असताना रु. 15000/- प्रमाणे करण्यात आल्याने संबंधीत कर्मचा-यास जमा रकमेवर जादा व्याज देण्यात आल्याने मनपा निधीची हानी झाली.

जादा कपात करण्यात आल्याने त्यावर अदा करण्यात आलेले व्याजाची वसुलपात्र रक्कम मनपा निधीत जमा करावी व संबंधीताच्या लेख्यात सुधारणा करून अनुपालन करावे.

4. जादा व्याजाचे प्रदान होणे-

महाराष्ट्र शासन राजपत्र , वित्त विभाग अधिसुचना क्र. भनिनि- 2013/प्र.क्र.सेवा-6 दिनांक 28.06.2013 नुसार महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या जमा शिल्लक रकमेवर 8.7 % व्याजदर निश्चित केलेला आहे.

परंतु चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना सन 2013-14 या आर्थिक वर्षा अखेरच्या जमा रकमेवर 8.8 % दराने व्याज दिल्याने अतिप्रदान झाले असून मनपा निधीची हानी झाली आहे.

1) श्री. सुरेश गोविंदराव आंबेकर (से. नि. वरिष्ठ लिपीक) भनिनि खाते क्र. 838 हे दिनांक 30.09.2013 सेवानिवृत्त झाले असून त्यांना भनिनि ची एकुण देय रक्कम रु. 231720/- वर 8.8 % दराने व्याज दिल्याने अतिप्रदान झाले असून मनपा निधीची हानी झाली आहे.

ब) श्री. रामभाऊ गणपतरावर नगरकर ( से. नि.सफाई कुली) खाते क्र.1732 हे दिनांक 31.08.2013 ला सेवा निवृत्त झाले असून त्यांना भनिनि ची एकुण देय रक्कम रु. 113798/- वर 8.8 % दराने व्याज दिल्याने अतिप्रदान झाले असून मनपा निधीची हानी झाली.

क) श्री.अशोक बळीराम टेंभे, सफाई कुली खाते क्र. 1943 यांचा दिनांक 11.09.2013 ला मृत्यू झाला असून त्यांचे वारसदारांना भनिनि ची एकूण देय रक्कम रु.91721/- वर 8.8% दराने व्याज देण्यात आल्याने अतिप्रदान झाले असून मनपा निधीची हानी झाली.

वर नमुद प्रकरणे उदाहरणादाखल असून उर्वरीत प्रकरणाची पडताळणी व शहानिशा करून सर्व प्रकरणी अतिप्रदानाची वसुली करून मनपा निधीत जमा करून अनुपालन सादर करावे.

DATDUBM6401 (Ref No : 30, Hmm No : 74)



Scanned by CamScanner

## 47 सेवापुस्तकातील अनियमितता तसेच वेतननिश्चितीबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : 126 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 38 व 45 नुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात संबंधीत कर्मचाऱ्याच्या सेवाकालावधीमध्ये घडणाऱ्या सर्व प्रकारच्या घटनांची नोंद घेण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची असुन सेवापुस्तकात वार्षिक वेतनवाढी, तात्पुरत्या व स्थानापन्न पदोन्नत्या, रजेच्या नोंदी व रजेचा हिशोब, जात पडताळणी नोंद, निवृत्तीवेतन नामनिर्देशनाची नोंद, सेवापडताळणी नोंद, मराठी व हिंदी भाषा सुट मिळाल्याची नोंद, DCPS लेखा क्रमांकाची नोंद इत्यादी नोंदी घेऊन कार्यालय प्रमुखाने साक्षांकित करणे आवश्यक आहे. अशा नोंदी सेवापुस्तकात घेण्यात आलेल्या नाहीत.*** |

महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 38 व 45 नुसार शासकीय कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात संबंधीत कर्मचा-यांच्या सेवाकालावधीमध्ये घडणा-या सर्व प्रकारच्या घटनांची नोंद घेण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची असून सेवापुस्तकात वार्षिक वेतनवाढी, तात्पुरती पदोन्नती व पदस्थापना, रजेच्या नोंदी व रजेचा हिशोब, चारित्र्याचे प्रमाणपत्र, वैद्यकिय तपासणी , सेवापडताळणीची नोंद , स्वगणक परिक्षा उत्तीर्ण होण्याची नोंद, मराठी व हिन्दी भाषा सुट मिळाल्याची नोंद , परिभाषीत अंशदान योजनेच्या खाते क्रमांकाची नोंद, गट विमा योजनेच्या सदस्यत्वाची नोंद इत्यादी नोंदी घेवुन कार्यालय प्रमुखानी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिकेतील कार्यरत काही कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची सन 2014-15 चे लेखापरिक्षणा दरम्यान पडताळणी केली असता सेवापुस्तकात आवश्यक नोंदीच घेण्यात आल्या नसल्याचे आढळून आले.

1) <u>वेतन निश्चिती करताना तसेच वार्षिक वेतनवाढी मंजूर करताना झालेले अतिप्रदान-</u>

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या कार्यालयातील सन 2014-15 च्या लेखापरिक्षणा दरम्यान सेवापुस्तकाची पडताळणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आली.

शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. वेपूर/प्र.क्र. 69/ सेवा-9 दिनांक 05.05.2010 परि. क्र. 2.5 मध्ये नमुद केल्यानुसार 3 % वेतन वाढीची परिगणना करताना 1 रुपया व त्यापुढील रक्कम 10 च्या पटीत घेण्यात येवून 99 पैसे दुर्लक्षित करणेबाबत शासनाचे आदेश आहेत. उदा. 3 % वेतन वाढ रु. 250.40 अशी परिगणना होत असल्यास 40 पैसे दुर्लक्षित करून रु. 250 वेतनवाढ देय होेल. परंतु पुढील प्रकरणात रु. 10/- व रु.20/- ने जादा वार्षिक वेतनवाढ मंजूर केल्याने अतिप्रदान झाले आहे.

अ) कु. संघमित्रा पुणेकर, क. लि. वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड पे रु.1900 मध्ये दिनांक 01.01.2006 ला 6 व्या वेतन आयोगाचे वेतननिश्चितीनुसार मुळ वेतन रु.6510/- व ग्रेड-वेतन रु.1900/- नुसार वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना दि 01.07.2007 पासून जादा दराने वेतनवाढ लागू करण्यात आली.

(रक्कम रुपयात)



Scanned by CamScanner

| वेतनवाढ दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2007 | 7040 | 7030 |
| 01.07.2008 | 7310 | 7300 |
| 01.07.2009 | 7590 | 7580 |
| 01.07.2010 | 7880 | 7870 |
| 01.07.2011 | 8180 | 8170 |
| 01.07.2012 | 8490 | 8480 |
| 01.07.2013 | 8810 | 8800 |
| 01.07.2014 | 9140 | 9130 |
| 01.07.2015 | 9850 | 9840 |

संबंधीत कर्मचा-यास दि. 01.07.2013 ला देय असलेली वेतनवाढ मंजूर केल्याची नोंद नसताना वेतनवाढीचा लाभ देण्यात आला. तसेच वर नमुद केल्यानुसार जादा दराने वेतनवाढी दिल्यामुळे अतिप्रदान झालेले आहे. वेतनवाढीतील तफावती दुर करून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

ब) श्री. गुलाब गर्गेलवार, यांची क.लि. वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु.1900 मध्ये दिनांक 01.01.2006 ला 6 व्या वेतन आयोगाचे वेतननिश्चितीनुसार मुळ वेतन रु.6510 व ग्रेड-वेतन रु.1900 नुसार वार्षिक वेतनवाढ मंजुर करताना दि. 01.07.2007 पासून जादा दराने वेतनवाढ लागू करण्यात आली. तसेच दि. 01.10.2002 ची वेतनवाढ मंजुर नसताना वेतनवाढीचा लाभ देण्यात आला.

| वेतनवाढीचा दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2007 | 7040 | 7030 |
| 01.07.2008 | 7310 | 7300 |
| 01.07.2009 | 7590 | 7580 |
| 01.07.2010 | 7880 | 7870 |
| 01.07.2011 | 8180 | 8170 |
| 01.07.2012 | 8490 | 8480 |
| 01.07.2013 | 8810 | 8800 |
| 01.07.2014 | 9140 | 9130 |

उपरोक्त प्रकरणी जादा दराने वेतनवाढी दिल्याने अतिप्रदान झालेले असून वेतनवाढीतील तफावत दुर करून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

1) श्री. रामदास रा. निखारे, बांधं. मिस्त्री यांची दिनांक 01.01.2011 ला वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु. 1600 नुसार मुळ वेतन रु. 6870 व ग्रेड वेतन रु. 1600 मध्ये वार्षिक वेतनवाढ मंजुर करताना दि. 01.07.2011 पासून जादा दराने वेतनवाढ लागू करण्यात आली.



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

| वेतनवाढीचा दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2011 | 7130 | 7110 |
| 01.07.2012 | 7400 | 7380 |
| 01.07.2013 | 7670 | 7650 |
| 01.07.2014 | 7950 | 7930 |
| 01.07.2015 | 8240 | 8220 |

उपरोक्त प्रकरणी जादा दराने वेतनवाढी दिल्याने अतिप्रदान झाले असून वेतनवाढीतील तफावत दुर करून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

ड) श्री. संजय वा. टिकले क.लि. यांची वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु.1900 मध्ये मध्ये दिनांक 01.01.2006 ला 6 व्या वेतन आयोगाचे वेतननिश्चितीनुसार वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना दि. 01.07.2009 पासून जादा दराने वेतनवाढ लागू करण्यात आली.

तसेच दि. 01.01.2011 रोजी मुळ वेतन रु. 8360 ग्रेड-वेतन रु.1900 नुसार वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना जादा दराने वेतनवाढ लागू करण्यात आली.

| वेतनवाढीचा दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2009 | 8070 | 8060 |
| 01.07.2010 | 8370 | 8360 |
| 01.07.2011 | 8680 | 8670 |
| 01.07.2012 | 9370 | 9350 |
| 01.07.2013 | 9730 | 9710 |
| 01.07.2014 | 10100 | 10080 |
| 01.07.2015 | 10480 | 10460 |

उपरोक्त प्रकरणी जादा दराने वेतनवाढी दिल्याने अतिप्रदान झाले असुन वेतनवाढीतील तफावत दुर करून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

इ) श्री. प्रमोद पां. रामेडवार क.लि. यांची वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु.1900 मध्ये मध्ये दिनांक 01.01.2006 ला 6 व्या वेतन आयोगाचे वेतननिश्चितीनुसार वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना दि. 01.07.2009 पासून मूळ वेतनात रु. 10/- ते रु. 20/- प्रति माह जादा प्रदान झाल्याचे दिसून आले. तसेच दि. 10.08.2012 ला आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देताना वेतननिश्चिती चुकीची झाली असल्याने मुळ वेतन रु. 8640 ग्रेड-वेतन रु. 1900 नुसार वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना अतिप्रदान झाले.

| वेतनवाढीचा दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2009 | 7750 | 7740 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 01.07.2010 | 8040 | 8030 |
| 01.07.2011 | 8340 | 8330 |
| 01.07.2012 | 8650 | 8640 |
| 01.07.2013 | 9320 | 9300 |
| 01.07.2014 | 9680 | 9660 |
| 01.07.2015 | 10050 | 10030 |

उपरोक्त प्रकरणी जादा दराने वेतनवाढी दिल्याने अतिप्रदान झाले असुन वेतनवाढीतील तफावत दुर करून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

ङ) श्री. रमेश ला. रासेकर बांध. मिस्त्रि यांनी वेतनश्रेणी रु. 4440-7440 ग्रेड-पे रु.1300 मध्ये दि. 01.07.2011 रोजी वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-वेतन रु. 1600 मध्ये आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करताना मुळ वेतन रु. 6610 ग्रेड-वेतन रु.1300 नुसार वेतननिश्चिती चुकीची झाल्याने वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना मूळ वेतनात रु. 10/- ते रु. 20/- प्रति माह जादा प्रदान झाल्याचे दिसून आले.

| वेतनवाढीचा दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2007 | 5940 | 5930 6व्या वेतन आयोगानुसार |
| 01.07.2008 | 6160 | 6150 |
| 01.07.2009 | 6390 | 6380 |
| 01.07.2010 | 6630 | 6610 |
| 01.07.2011 | 7130 | 7110 आश्वासित प्रगती योजनेच लाभ दिला. |
| 01.07.2012 | 7400 | 7380 |
| 01.07.2013 | 7670 | 7650 |
| 01.07.2014 | 7950 | 7930 |
| 01.07.2015 | 8240 | 8220 |

उपरोक्त प्रकरणी जादा दराने वेतनवाढी दिल्याने अतिप्रदान झाले असुन वेतनवाढीतील तफावत दुर करून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

च) श्री. राजेश झाडे क. लि. यांनी वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु.1900 मध्ये दिनांक 01.01.2006 ला 6 व्या वेतन आयोगाचे वेतननिश्चिती तसेच दिनांक 01.07.2009 ला आश्वासित प्रगती योजनेचा लाभ वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु. 2400 मध्ये मुळ वेतन रु. 7600 ग्रेड-वेतन रु.2400 नुसार वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना मूळ वेतनात रु. 10/- ते रु. 20/- प्रति माह जादा प्रदान झाल्याचे दिसून आले.

| वेतनवाढीचा दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2006 | 7060 | 7050 |
| 01.07.2007 | 7330 | 7320 |
| 01.07.2008 | 7610 | 7600 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 01.07.2009 | 8210 | 8190 आश्वासित प्रगती योजनेनुसार वेतननिश्चिती |
| 01.07.2010 | 8530 | 8510 |
| 01.07.2011 | 8860 | 8840 |
| 01.07.2012 | 9200 | 9180 |
| 01.07.2013 | 9550 | 9530 |
| 01.07.2014 | 9910 | 9890 |
| 01.07.2015 | 10280 | 10260 |

उपरोक्त प्रकरणी जादा दराने वेतनवाढी दिल्याने अतिप्रदान झाले असुन वेतन वाढीतील तफावत दुर करून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

ग) श्री. भुषण पां. ठाकरे क.लि. यांची वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु.1900 मध्ये मध्ये दिनांक 01.01.2006 ला 6 व्या वेतन आयोगाचे वेतननिश्चिती तसेच दिनांक 01.01.2011 ला वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु. 2400 मध्ये मुळ वेतन रु. 8360 ग्रेड वेतन रु. 2400 मध्ये वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना मूळ वेतनात रु. 10/- प्रति माह जादा प्रदान झाल्याचे दिसून आले.

| वेतनवाढीचा दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2009 | 8070 | 8060 |
| 01.07.2010 | 8370 | 8360 |
| 01.07.2011 | 9020 | 9010 आश्वासित प्रगती योजनेनुसार वेतननिश्चिती |
| 01.07.2012 | 9370 | 9360 |
| 01.07.2013 | 9730 | 9720 |
| 01.07.2014 | 10100 | 10090 |
| 01.07.2015 | 10480 | 10470 |

ज) श्री. अनिल बनकर, क. लि. यांची क्र चंनपा/मुली/साप्रवि/80/99 दि.12.10.1999 आदेशान्वये नियुक्ती करण्यात आल्याचे दिसून आले व 13.10.1999 ला रुजू झाले. परंतु अटी व शर्तीनुसार संबंधिताला दोन वर्षाच्या कालावधीत टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होवुन सेवापुस्तकामध्ये नोंद घेणे आवश्यक असताना याबाबत सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली नाही तसेच परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र नस्तीला लागून नाही.

तसेच वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे रु.1900 मध्ये दिनांक 01.07.2007 ला वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना मूळ वेतनात रु. 10/- प्रति माह जादा प्रदान झाल्याचे दिसून आले.



Scanned by CamScanner

| वेतनवाढीचा दिनांक | मंजुर करण्यात आलेली वेतनवाढ | नियमानुसार देय वेतनवाढ |
|---|---|---|
| 01.07.2007 | 7040 | 7030 |
| 01.07.2008 | 7310 | 7300 |
| 01.07.2009 | 7590 | 7580 |
| 01.07.2010 | 7880 | 7870 |
| 01.07.2011 | 8180 | 8170 |
| 01.07.2012 | 8780 | 8770 |
| 01.07.2013 | 9100 | 9090 |
| 01.07.2014 | 9430 | 9420 |

उपरोक्त प्रकरणी जादा दराने वेतनवाढी दिल्याने अतिप्रदान झाले असुन वेतनवाढीतील तफावत दुर करुन वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

3. सेवांतर्गत आश्वाशित प्रगती योजना -

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. वेतन 1109/प्र.क्र.-41/सेवा-3 मंत्रालय, मुंबई दि. 05.07.2010 नुसार तसेच चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर पत्र क्र. चंशमनपा/साप्रआ-31/2013 दि. 03.04.2013 चे आदेशान्वये चंद्रपूर शहर महानगरपालिका अंतर्गत वर्ग-3 चे कर्मचाऱ्यांना सलग 12 वर्ष सेवा पुर्ण झाली असल्याने व पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ देण्यात आला. आदेशातील अ.क्र. 5 चे कर्मचारी श्री. सुधाकर बुटले क. लि. यांना आदेशानुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दि. 01.04.2011 पासुन देय असतांना दि. 01.01.2011 पासुन देण्यात आला. तसेच आदेशातील अ.क्र. 6 चे कर्मचारी श्री. अशोक जथाडे क. लि. यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दि. 01.01.2011 पासून देय असताना दि. 01.04.2011 पासून देण्यात आला. या प्रकरणाची उचित तपासणी करुन आवश्यकतेनुसार वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

4. चारित्र्य पडताळणीबाबत.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण/2007/पडताळणी नवि-26 दिनांक 21 नोव्हें. 2007 नुसार महानगरपालिकेमध्ये सेवा भरती करताना पोलीस विभागाकडून चारित्र्याची पडताळणी करुनच उमेदवाराची नियुक्ती करावी, असे निर्देश असताना संबंधीत कर्मचा-यास पोलिस विभागाकडून पडताळणी न करताच नियुक्ती देण्यात आली. तसेच इतर कर्मचा-याचे बाबतीत सुध्दा पोलिस विभागाकडून चारित्र्याची पडताळणी झाली असल्याची नोंद सेवापुस्तकात नाही.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | सेवेत नियुक्तीचा दिनांक | आढळून आलेल्या उणिवा |
|---|---|---|---|
| 1. | कु. निता स. शेडमाके एन एम | 01.10.2013 | पोलीस विभागाकडून चारित्र्याची पडताळणी झाली नाही. |
| 2. | कु. वैशाली रा. पुनसे ए एन एम | 15.10.2013 | -------//-------- |
| 3. | कु. पिंकी उ. बावणे एन एम | 23.07.2014 | --------// ------ |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | श्री. अशोक श्री. जथाडे क. लि. | 01.01.1999 | पोलीस विभागाकडून चारित्र्याची पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. |
| 5. | श्री. सुनिल रा. माळवे क. लि. | 06.12.2000 | -------//------- |
| 6. | श्री. सारंग सु. निर्मळे क. लि. | 07.12.2000 | -------//------- |
| 7. | श्री. गुलाब गर्गेलवार क. लि. | 26.08.1992 | -------//------- |
| 8. | श्री. वासंती एम. बहादुरे क. लि. | 29.04.1999 | -------//------- |

नमूद प्रकरणे ही उदाहरणादाखल असून सर्व कर्मचा-याचे बाबतीत सेव पुस्तकात पोलीस विभागाकडून चारित्र्याची पडताळणी झाल्याची नोंद घेवून अनुपालन सादर करावे.

DATDUBM6401 (Ref No : 32, Hmm No : 39)

## 48 न्यायालयीन प्रकरणात महानगरपालिकेला सेवा देणा-या अधिवक्त्यांच्या शुल्कातून आयकराची उचित दराने कपात न करणे.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : 179 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 651022.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 41885.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 41885.00/-

| |
|---|
| *महानगरपालिका, चंद्रपूर या कार्यालयाचे वतीने न्यायालयीन प्रकरणासाठी नियुक्त अभियोक्ता यांना प्रदान करण्यात आलेले शुल्क, नियमानुसार कपात करावयाचा आयकर तसेच कपात केलेला आयकर शासन खाती जमा करणे तसेच प्राप्त रकमा विलंबाने शासन खाती जमा करणे इत्यादी प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून येते.* |

चंद्रपूर महानगरपालिकेकडील न्यायालयीन प्रकरणी कार्यालयाची बाजू मांडण्याकरिता पॅनलवर विविध अधिवक्त्यांची नियुक्ती करुन स्थायी समितीच्या ठरावाद्वारे निश्चित केलेल्या दराने प्रदान करण्यात येते. सन 2014-15 मध्ये एकूण 46 प्रकरणांमध्ये रु. 6,11,350/- इतका खर्च दर्शविण्यात आला.



Scanned by CamScanner

1. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा.प्र.क्र.5, दिनांक 22.2.2008 नुसार आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेळोवेळी आयकर अधिनियमातील तरतुदीनुसार आयकर कपात करणे बंधनकारक असून वित्त् विभाग, शासन परिपत्रक क्र.आयकर 1009/प्र.क्र.40/कोषा क्र.5, दिनांक 10.12.2013 नुसार उदगम कपातीबाबत सुचना दिलेल्या आहेत. आयकर कलम 194 जे नुसार व्यावसायीक सेवा शुल्कावर 10 टक्के आयकर कपात करणे बंधनकारक होते. परंतु अधिवक्ता यांना त्याचे प्रदान करतांना एकूण देय रकमेवर विहीत दरानुसार आयकर कपात न केल्याने शासन महसुलाची हानी झाल्याचे लेखापरीक्षणादरम्यान आढळून आले. तपशिलवार विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

सन 2014-15 (रक्कम रुपयात)

| अ.क्र. | अधिवक्त्याचे नांव | प्रकरण संख्या(46मुळ प्रकरणे) | प्रदान केलेली रक्कम | नियमा नुसार कपात करावयाची रक्कम | प्रत्यक्षात कपात केलेला आयकर | कमी वसुल केलेला आयकर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. ॲड प्रकाश बजाज | 25 | 112050 | 11205 | 11005 | 200 |
| 2 | श्री. ॲड अविनाश सावरी | 2 | 10000 | 1000 | 0 | 1000 |
| | | | | | | |
| 3 | श्री. ॲड पी.एम.सातपुते | 23 | 114100 | 11410 | 5500 | 5910 |
| | | | | | | |
| 4 | श्री. ॲड एम.एच.टंडन | 3 | 18700 | 1870 | 650 | 1220 |
| | | | | | | |
| 5 | श्री. ॲड महेश धाजक | 18 | 227000 | 22700 | 18700 | 4000 |
| 6 | श्री. ॲड विक्रम टंडन | 8 | 38500 | 3850 | 3000 | 850 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 7 | श्री. ॲड जे.बी.कासट | 3 | 30000 | 3000 | 3000 | 0 |
| | एकूण | | 550350 | 55035 | 41855 | 13180 |

सन 2014-15 मध्ये रु. 55035/- एवढी आयकरापोटी रक्कम कपात करावयाची असतांना रु.41855/- एवढाच आयकर प्रत्यक्षात कपात करण्यात आल्याने रु.13180/- एवढी आयकराची रक्कम कमी कपात करण्यात आल्याने केंद्र शासनाच्या महसुलाची हानी झालेली आहे.



Scanned by CamScanner

| अ. क्र. | अभिवक्त्याची नावे | आयकराचा भरणा केलेली रक्कम | प्रमाणक क्र. व दिनांक | शासनाकडे भरणा केलेली रक्कम, चालान क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. ॲड एम. एच. टंडन | 650 | 493 दि. 16.07.2014 | |
| 2. | श्री. ॲड. महेश धात्रक | 7300 | 494 ते 499 दिनांक 16.07.2014 | |
| 3. | श्री. प्रकाश बजाज | 5200 | 500 ते 501 दिनांक 16.07.2014 | रु.13150/- 40 दि.25.7.2014 |
| | एकूण | 13150 | | |

सन 2014-15 आर्थिक वर्षात अभिवक्ता यांना प्रदान करतेवेळी कपात करण्यात आलेला एकूण आयकर रु. 41855/- एवढया रकमेपैकी रु. 13150/- इतकाच आयकराचा भरणा केल्याचे अभिलेख्यामध्ये चलान प्रत आढळून आली. उर्वरित रु. 28705/- एवढया रकमेची चलान आढळून आली नाही.

2. अभिवक्त्याला द्यावयाची फी ची रक्कम प्रदानाबाबत दर निश्चिती करताना जिल्हा शासकिय अभियोक्ता यांच्या सल्ल्याने दर निश्चित केलेले नाहीशुल्क दाव्यासाठी प्रत्येक ,क ठरविताना कुठल्या निकषाचा आधार घेतला याचा तपशिल नाही.

DATDUBM6401 (Ref No : 31, Hmm No : 34)

## 49 वैदयकीय प्रतिपूर्ती देयकातील चुकीच्या प्रदानामुळे झालेल्या अतिप्रदानाची वसुली करणेबाबत तसेच वैदयकीय देयकातील अनियमितेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कालम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 42278.00/-

*सन 2014-15 या आर्थिक वर्षात मनपा चंद्रपूर शहरने त्यांचे अधिकारी / कर्मचारी यांची वैदयकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर करताना शासन निर्णयानुसार दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन न केल्याचे दिसून आले. त्यामुळे अश्या नियमबाहय प्रदान केलेल्या रकमांची वसुली करून रक्कम मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.*

चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरने सन 2014-15 या आर्थिक वर्षात त्यांचे आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांची वैदयकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर केली आहे. सदर देयके मंजूर करताना वेळोवेळी निर्गमित केलेले शासन



Scanned by CamScanner

निर्णय व दिलेल्या निर्देशानुसार अटी व शर्तीकडे दुर्लक्ष केल्याचे आढळून आले.

सदर प्रदान केलेली देयके नियमबाह्य असल्यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून चुकीचे प्रदान झालेली रक्कम वसुल करून मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

अशा पध्दतीने प्रदान केलेल्या देयकातील काही उदाहरणे खालीलप्रमाणे असून मनपा चंद्रपूरने अशी संपूर्ण प्रकरणे पुन्हा तपासून चुकीच्या प्रदानाची रक्कम संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

(1) प्रमाणक क्र.1106, दिनांक 27.3.2015, रु.25370/-
श्री.बारीकराव विठ्ठल भडके, सफाई कामगार

श्री.बारीकराव विठ्ठल भडके, सफाई कामगार यांनी त्यांचे पत्नीचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक रु.28189/- मंजूरीस सादर केले असून वरील प्रमाणकान्वये त्यांना सदर देयकाची रु.25370/- वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर केलेली आहे.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.एमएजी-1099/प्र.क्र.240/99/ आरोग्य-3, दिनांक 30.08.1999 नुसार खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दि.9.2.2013 ते 16.2.2013 या कालावधीत भरती असतांना जो खर्च आला असेल त्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेनुसार प्रदान करता येते. परंतु रुग्णालयातील वास्तव्याच्या कालावधी व्यतिरिक्त औषधे खरेदीची देयके मंजूर केलेली आहेत.

अनुज्ञेय नसलेल्या मागणीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बिल क्र. व दिनांक | रक्कम (रुपये |
|---|---|---|
| 1 | 47, दि.20.2.2013 | 2600 |
| 2 | 28535, दि.28.3.2013 | 192.58 |
| 3 | 93, दि.01.04.2013 | 256.78 |
| | एकूण | 3049/- |

तरी वरीलप्रमाणे रुग्णालयातील वास्तव्याच्या कालावधीबाहेरील मंजूर केलेली रक्कम रु.3049/- संबंधितांकडून वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

(2) प्रमाणक क्र.519, दिनांक 2.9.2014, रु.12317/-
प्रमाणक क्र.1125, दिनांक 27.3.2015, रु.12317/-
श्री.आडकु सिताराम जधाडे, बांध.कुली.

श्री.आडकु सिताराम जधाडे, बांधकाम कुली यांनी स्वतःचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक रु.27372/- मंजूरीस सादर केले असून वरील प्रमाणकान्वये त्यांना सदर देयकाची रु.24634/- वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर केलेली आहे. त्यांचा आंतररुग्ण म्हणून वास्तव्याचा कालावधी दिनांक 27.9.2012 ते 1.10.2012 होता.



Scanned by CamScanner

अनुज्ञेय नसलेल्या मागणीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बिल क्र. व दिनांक | रक्कम (रुपये |
|---|---|---|
| 1 | SD 46538,दि.9.10.2012 | 348.70 |
| 2 | C-12944,दि.25.10.2012 | 489.40 |
| 3 | C-10867,दि.9.10.2012 | 217.60 |
| 4 | C-13395,दि.3.11.2012 | 931.00 |
| | एकूण | 1987/- |

तरी वरीलप्रमाणे रुग्णालयातील वास्तव्याच्या कालावधीबाहेरील मंजूर केलेली रक्कम रु.1987/- संबंधितांकडून वसुल करून मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

(3) प्रमाणक क्र.1103, दिनांक 27.3.2015, रु.35742/-
श्री.संतोष भास्करराव गर्गेलवार, स्वच्छता निरीक्षक

श्री.संतोष भास्करराव गर्गेलवार, स्वच्छता निरीक्षक यांनी त्यांचे पत्नीचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक रु.39714/- मंजूरीस सादर केले असून वरील प्रमाणकान्वये त्यांना सदर देयकाची रु.35742/- वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर केलेली आहे.

सदर देयकाची पडताळणी केली असता त्यांनी देयकासोबत सादर केलेल्या Discharge कार्डवर नवजात बाळाचा उल्लेख असून देयक क्र.765, दि.24.10.2013, रु.29000/- मध्ये Baby care charges रु.1000/- आकारण्यात आले आहेत. त्यामुळे सदर देयक हे प्रसुतीसंबंधीचे दिसून येते.

प्रसुतीसंबंधी वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक मंजूर करताना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.एमएजी 1099/प्र.क्र.237/आरोग्य-3, दि.21.8.1999 नुसार शासकीय स्त्री कर्मचारी/अधिकारी अथवा कर्मचा-याची पत्नी यांना प्रसुतीपूर्वी गर्भधारणेनंतर पहिल्या दोन ते तीन महिन्यात शासकीय रुग्णालयात नाव नोंदविणे आवश्यक आहे. प्रसुतीपूर्वी नोंदणी केली नसल्यास कोणत्याही परिस्थितीत पूर्ण कालावधीच्या प्रसुतीसाठी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील खर्चास मान्यता मिळणार नाही. असे असतांना प्रसुतीसंबंधी शासकीय रुग्णालयात नाव नोंदणीसंबंधी कोणतीही कागदपत्रे सादर केली नसताना वरील प्रमाणकान्वये रु.35742/- चे देयक मंजूर केलेले आहे.

सदर देयक हे नियमानुसार कागदपत्रे सादर न केल्याने अनुज्ञेय होत नसल्यामुळे संबंधितांकडून रु.35742/- ची वसुली करून मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

(4) प्रमाणक क्र.1116, दिनांक 27.3.2015, रु.31063/-
श्रीमती जयवंती ईश्वरलाल समुंद.

श्रीमती जयवंती ईश्वरलाल समुंद यांनी स्वतःचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक रु.34515/- मंजूरीस सादर केले



Scanned by CamScanner

असून वरील प्रमाणकान्वये त्यांना सदर देयकाची रु.31063/- वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर केलेली आहे. त्यांचा आंतररुग्ण म्हणून वास्तव्याचा कालावधी दिनांक 28.12.2013 ते 4.1.2014 होता.

अनुज्ञेय नसलेल्या मागणीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बिल क्र. व दिनांक | रक्कम (रुपये |
|---|---|---|
| 1 | 4611,दि.5.12.2013 | 600/- |
| 2 | 09,दि.5.12.2013 | 900/- |
| | एकूण | 1500/- |

तरी वरीलप्रमाणे रुग्णालयातील वास्तव्याच्या कालावधीबाहेरील मंजूर केलेली रक्कम रु.1500/- संबंधितांकडून वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

तसेच वैदयकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर करतांना सर्वसाधारणपणे पुढील अनियमितता दिसून आल्यात.

1) वैदयकीय प्रतिपूर्ती देयकामध्ये रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक लिहिण्यात येत नाही. त्याऐवजी ब-याच प्रकरणी डॉक्टरांचा नोंदणी क्रमांक लिहिण्यात आले आहेत.

2) रु.5000/- पेक्षा अधिक रकमेच्या देयकावर मुद्रांक शुल्क लावण्यात येत नाही.

3) प्रमाणकावर "पेड बाय मी" (Paid by me) लिहुन स्वाक्षरी घेण्यात येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.एमएजी 2005/9/प्र.क्र.1/आरोग्य-3, दिनांक 19.3.2005 मधील अ.क्र.2 नुसार खाजगी रुग्णालयातील वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती तक्ता-ब मधील दरानुसार न करता सरसकट 90% प्रमाणे करण्यात येते. त्यामुळे नियमानुसार वास्तव्य खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे 1 ते 4 प्रकरणी वैदयकीय प्रतिपूर्ती देयकाची चुकीचे प्रदानाची रक्कम संबंधितांकडून वसुल करुन मनपा निधीत जमा करुन पूर्तता करावी. तसेच अशी संपूर्ण अनियमित प्रकरणे मनपा स्तरावर तपासणे आवश्यक आहे.

DATDSTM7301 (Ref No : 40, Hmm No : 96)

## *50 स्थानिक संस्था कराव्यतिरिक्त विलंबाने भरणा करावयाच्या व्याजाची रक्कम मनपा निधीमध्ये भरणा न केल्याने झालेल्या नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :06 मनपा निधी*



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 162813.00/-

***स्थानिक संस्था कराची रक्कम विहित मुदतीत भरणा न केल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम मधील कलम 48(3)(क)(1) नुसार सरळव्याजरूपाने प्रत्येक महिन्याचे 2% प्रमाणे विलंब शुल्क व्याजाचे रूपाने वसूल करून मनपानिधीमध्ये भरणा करण्यात आले नाही.***

(1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील कलम 40 नुसार व्यापाऱ्यांनी दर महिन्यातील माल विक्रीच्या अनुषंगाने पुढील महिन्याच्या 20 तारखेपर्यंत स्थानिक संस्था कर पदनिर्देशित बँकेत भरणा केला पाहिजे. चंद्रपूर महानगरपालिका येथील स्थानिक संस्था कर विभागातील सन 2014-2015 मधील व्यापाऱ्यांनी मनपाला सादर केलेल्या चलनाच्या प्रतींची पदनिर्देशित बँक स्क्रोलशी पडताळणी केली असता स्थानिक संस्था कराची रक्कम 20 मार्च पर्यंत भरणा न केल्याचे दिसून आले यावर महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) अधिनियममधील कलम 48(3)(क)(1) नुसार सरळव्याजरूपाने प्रत्येक महिन्याचे 2% प्रमाणे विलंब शुल्क व्याजाचे रूपाने वसूल करणे आवश्यक आहे. तथापि, खालील नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी सदर परिच्छेद कायम करण्याच्या दिनांकापर्यंत व्याजाची रक्कम कमी अथवा भरणाच न केल्यामुळे पुढील रु. 162813/-(11232/-+151581/-) एवढ्या रकमेने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे विभागाने पुरविलेल्या अभिलेख्यावरून दिसून आले.

व्याजाची रक्कम भरणा न करण्यात आलेल्या नोंदणीकृत व्यापारांची यादी

| अ.क्र. | व्यापाऱ्यांचा नोंदणी क्र. | एल.बी.टी.ची भरणा केलेली रक्कम (रु.) | चलनाचा दिनांक | दि.21.03.2015 ते प्रत्यक्ष भरणा झाल्याच्या दिनांकापर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी भरणा केलेली व्याजाची रक्कम | भरणा न केलेली व्याजाची रक्कम |
| 1 | CMC/LBT/T1/085/2012 | 6360 | 26/03/2015 | - | 127 |
| 2 | CMC/LBT/T1/460/2014 | 60712 | 23/03/2015 | - | 1214 |
| 3 | CMC/LBT/T1/023/2012 | 3007 | 23/03/2015 | - | 60 |
| 4 | CMC/LBT/T1/149/2012 | 14699 | 30/03/2015 | - | 294 |
| 5 | CMC/LBT/T1/270/2012 | 4663 | 24/03/2015 | - | 93 |
| 6 | CMC/LBT/T1/085/2012 | 11630 | 26/03/2015 | - | 233 |
| 7 | CMC/LBT/T1/067/2012 | 8586 | 26/03/2015 | - | 173 |
| 8 | CMC/LBT/T1/463/2014 | 37814 | 24/03/2015 | - | 756 |
| 9 | CMC/LBT/T2/42/---- | 1021772 | 30/03/2015 | - | 20435 |
| 10 | CMC/LBT/T2/051/2012 | 80764 | 24/03/2015 | - | 1615 |
| 11 | CMC/LBT/T2/051/2012 | 3518 | 24/03/2015 | - | 70 |
| 12 | CMC/LBT/T2/052/2012 | 27984 | 23/03/2015 | - | 560 |
| 13 | CMC/LBT/T2/085/2012 | 5626 | 23/03/2015 | - | 113 |
| 14 | CMC/LBT/T2/086/2012 | 14044 | 23/03/2015 | - | 281 |
| 15 | CMC/LBT/T2/T2/42/---- | 714498 | 04/03/2015 | - | 28866 |



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 16 | CMC/LBT/T2/254/---- | 3653 | 24/03/2015 | - | 73 |
| 17 | CMC/LBT/T2/069/2012 | 7290 | 23/03/2015 | - | 146 |
| 18 | CMC/LBT/T2/482/2014 | 3440 | 31/03/2013 | - | 69 |
| 19 | CMC/LBT/T2/045/2012 | 45320 | 23/09/2015 | 4717 | - |
| 20 | CMC/LBT/T2/045/2012 | 63647 | 30/03/2015 | 5246 | - |
| 21 | CMC/LBT/T2/045/2012 | 57130 | 30/03/2015 | - | 42335 |
| 22 | CMC/LBT/T2/045/2012 | 47980 | 12/03/2015 | - | 7134 |
| 23 | CMC/LBT/T2/045/2012 | 67613 | 19/03/2015 | - | 8530 |
| 24 | CMC/LBT/J2/390/2013 | 20000 | 01/07/2015 | - | 2082 |
| 25 | CMC/LBT/J2/049201/ | 4730 | 30/03/2015 | - | 95 |
| 26 | CMC/LBT/J2/0145/2015 | 6587 | 01/08/2015 | - | 686 |
| 27 | CMC/LBT/J2/366/2013 | 7493 | 26/03/2015 | - | 150 |
| 28 | CMC/LBT/J2/358/2013 | 2970 | 24/03/2015 | - | 60 |
| 29 | CMC/LBT/J1/103/2013 | 11892 | 20/04/2015 | - | 480 |
| 30 | CMC/LBT/J1/158/---- | 8885 | 17/06/2015 | - | 178 |
| 31 | CMC/LBT/J1/015/2012 | 29070 | 30/07/2015 | - | 3026 |
| 32 | CMC/LBT/J1/241/2012 | 22013 | 29/07/2015 | - | 2291 |
| 33 | CMC/LBT/J1/241/2012 | 11449 | 29/07/2015 | - | 1191 |
| 34 | CMC/LBT/J1/258/--- | 11122 | 29/07/2015 | 917 | - |
| 35 | CMC/LBT/J1/394/2012 | 6794 | 31/07/2015 | - | 707 |
| 36 | CMC/LBT/A1/020/2012 | 6188 | 23/06/2015 | - | 510 |
| 37 | CMC/LBT/A1/052/2012 | 3821 | 30/03/2015 | - | 76 |
| 38 | CMC/LBT/A1/066/2012 | 4422 | 26/03/2015 | - | 88 |
| 39 | CMC/LBT/A1/110/2012 | 101993 | 27/04/2015 | - | 4121 |
| 40 | CMC/LBT/A1/1190/2015 | 23220 (23110) | 27/03/2015 | 352 | - |
| 41 | CMC/LBT/A1/146/2015 | 149310 | 23/03/2015 | - | 2986 |
| 42 | CMC/LBT/A2/008/2012 | 27262 | 17/07/2015 | - | 2838 |
| 43 | CMC/LBT/A2/009/2012 | 119214 | 31/07/2015 | - | 12408 |
| 44 | CMC/LBT/A2/021/2012 | 31244 | 30/03/2015 | - | 625 |
| 45 | CMC/LBT/A2/050/2014 | 38200 | 25/03/2015 | - | 764 |
| 46 | CMC/LBT/A2/050/2014 | 80116 | 25/03/2015 | - | 1602 |
| 47 | CMC/LBT/A2/050/2014 | 72000 | 25/03/2015 | - | 1440 |
| | | | रक्कम रु. | 11232 | 151581 |
| | | | वसूल करावयाची एकूण रु. | | 162813 |

सदरील व्यापाऱ्यांपैकी 15 व्यापाऱ्यांनी अभय योजना 2015 अंतर्गत लाभ घेतला असल्याचे अर्धसमास पत्रान्वये कळविले. तसेच, स्थानिक संस्था कर विभागाने संबंधित पुराव्याची साक्षांकित प्रत उपलब्ध केली नसून अर्धसमास पत्राच्या अनुपालनामध्ये वसूल करण्यात येत असल्याचे मोघम कळविले आहे.



Scanned by CamScanner

उपरोक्त व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कराव्यतिरिक्त विलंबाच्या व्याजाची रक्कम मनपा निधीमध्ये भरणा करणे आवश्यक होते. तथापि, सदरील नमूद व्यावसायिकांनी व्याजाची रक्कम वेळोवेळी मनपा निधीमध्ये भरणा करण्यात न आल्यामुळे मनपाच्या आर्थिक निधीचे नुकसान झाल्याचे दिसुन आले. तरी, स्थानिक संस्था कर विभागाने उपरोक्त व्याजाची रक्कम रक्कम रु. 162813/- संबंधीतापासून वसूल करुन मनपा निधीमध्ये जमा करण्यात यावे.

DLFSPPM8501 (Ref No : 70, Hmm No : 32)

## *51 स्थानिक स्वराज्य संस्था कर जमा महसुलाच्या आकडेवारीतील तफावत, नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून वार्षिक विवरणपत्रे मुदतीत प्राप्त न होणे व मनपामार्फत कराचे निर्धारणास विलंब होणेबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 05

*लेखा शीर्ष : 06 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2935000.00/-

| |
|---|
| *सन 2014-15 या वर्षात स्थानिक संस्था कराचा प्राप्त महसुलाच्या आकडेवारीमध्ये तफावत दिसते. नोंदणी अर्जावर परिपूर्ण माहिती नमूद नसणे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम 22 अन्वये व्यापाऱ्यांकडून प्रमाणपत्र देण्यात आले नाही. वार्षिक विवरणपत्रे विभागास विहित मुदतीत सादर न केल्यामुळे नियम 48(6) नुसार रु. 29,35,000 एवढ्या रुपयापर्यंत शास्तीची जमा मनपा निधीत करणे आवश्यक आहे. 3337 व्यापाऱ्यांपैकी सन 2014-15 या वर्षाअखेर केवळ 62 नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडील स्थानिक संस्था कराचे मूल्य निर्धारण झाले आहे. 50 कोटीवरील रुपयाची वार्षिक उलाढाल करीत असलेल्या व्यापाऱ्यांचे कर निर्धारण झाले नाही.* |

(1) नगररचना विभाग अधिसूचना क्रमांक 0209/प्र.क्र.65/09/नवि.34, दि.25 मार्च 2010 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) दि. 01/11/2012 पासून महानगरपालिकेस लागू असून त्यानुसार नोंदणी झालेल्या व्यापारी परस्पर बँकामध्ये चलनाद्वारे कर जमा करतात. आर्थिक वर्ष संपल्यानंतर त्यांच्या विक्रीच्या अनुषंगाने कराचे निर्धारण केले जाते. प्रत्यक्ष प्राप्त कर महसुलाचा आढावा घेतला असता सन 2014-15 या वर्षात स्थानिक संस्था कराचा प्राप्त महसुलाच्या आकडेवारीत पुढीलप्रमाणे विसंगती दिसून येते.



Scanned by CamScanner

(i) रोखपुस्तकानुसार अखेरची शिल्लक - रु. 3,00,19217.47 (रु. 3.00 कोटी)

(ii) बँक विवरणपत्राप्रमाणे (एकूण 7 बँक खाते मिळून)-रु. 4,52,044,08.47 (रु. 4.52 कोटी)

(iii) अर्थसंकल्पाप्रमाणे प्रत्यक्ष जमा - रु. 34,68,23,734.00 (रु.34.83 कोटी)

वरीलप्रमाणे तफावत प्रचंड मोठी असून त्यांच्या बँक ताळमेळाअभावी प्रत्यक्ष महसुलाच्या आकडेवारीबाबत सत्यता कायम होत नाही.

(2) स्थानिक संस्था कर दि. 01/11/2012 पासून लागू असून त्यानंतर 1 महिन्याच्या आत व्यापाऱ्यांनी महानगरपालिकेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. नस्त्यांची तपासणी करताना प्रतिष्ठानांनी नोंदणीसाठी अर्जावर सादर केलेल्या दिनांक नमूद केला नसून मनपाने सुद्धा आवक क्रमांक व दिनांक सदर अर्जावर नोंदविलेला नाही असे दिसून आले. तथापि, अर्धसमास पत्राद्वारे विचारणा केली असता व्यापाऱ्यांच्या प्रतिष्ठानात नोंदणीसाठी शिबीर आयोजित करण्यात आले असल्यामुळे आवक क्रमांक व दिनांक नमूद करणे आवश्यक नसल्याचे कळविण्यात आले.

तसेच प्रकरणातील नस्त्यांमध्ये मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 प्रमाणे झालेल्या नोंदणीचा पुरावा नमूद नाही.

(3) चंद्रपूर महानगरपालिकामध्ये एल.बी.टी.लागू झालेल्या दिनांकापासून (1 नोव्हेंबर 2012 पासून) सन 2014-15 या आर्थिक वर्षाअखेर महानगरपालिका हद्दीत असलेल्या एकूण 3337 व्यापाऱ्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम (3) अन्वये किंवा नियम 5 च्या पोटनियम (7) अन्वये नोंदणीस व/किंवा पात्र असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्यांनी नियम 29 अन्वये नमुना 'इ-दोन' मध्ये वार्षिक विवरणपत्रे वर्ष संपल्यानंतर 90 दिवसाच्या आत तसेच आयात करीत नसलेल्या व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्र निरंक दाखवून आयुक्तास सादर करणे आवश्यक आहे. तथापि, विभागाकडून उपलब्ध माहितीनुसार एकूण 2325 स्थानिक व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्रे विभागास सादर केल्याचे दिसून येते. 299 व्यापाऱ्यांनी शास्तीसह विवरणपत्रे सादर केले असून 126 व्यापाऱ्यांनी अभय योजनेंतर्गत लाभ घेतल्याचे दिसते. अर्थात उर्वरित 587 नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्रे विहित मुदतीत सादर न केल्यामुळे नियम 48(6) नुसार पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहित कालावधीत म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर 5000 रुपयापेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम शास्ती म्हणून वसूल होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील 227 व्यापारांकडून शास्तीची रक्कम 5000 नुसार रुपये 587x5000= 29,35,000 एवढ्या रुपयापर्यंत प्रत्यक्ष किंवा मालमत्ता कराचे स्वरुपात वसूल करून मनपा निधीमध्ये जमा होणे आवश्यक आहे.

(4) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम 21 व 22 नुसार



Scanned by CamScanner

शहराच्या क्षेत्रामध्ये कोणत्याही आयातीत माल जो व्यापारी धारण करीत असेल त्याने असा माल शहराच्या क्षेत्रामध्ये कोणत्याही इतर व्यापाऱ्यास विकला असेल, त्या बाबत नियम 22 मधील तरतूदीप्रमाणे नोंदणीकृत विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याने तसे प्रमाणपत्र लिहून देणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये पुरविण्यात आलेल्या दस्तऐवजामध्ये प्रमाणपत्रे आढळून आलेली नाही.

(5) उक्त अधिनियमातील नियम 33 नुसार आयुक्त, व्यापाऱ्यांना नमुना 'ख' मध्ये नोटीस देऊन नोटीसीच्या अनुपालनाकरिता नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून 15 दिवसापेक्षा अधिक नसेल हे निश्चित करून त्याद्वारे अशा संबंधित निर्धारणाच्या वर्षाच्या अंतिम दिनांकापासून पाच वर्षाच्या आत व्यापाऱ्याने निर्धारण करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश असताना उपलब्ध केलेल्या माहितीनुसार सन 2014-15 मधील एकूण उर्वरित 3275 व्यापाऱ्याचे कर निर्धारण प्रलंबित आहे असे मनपाने पुरविलेल्या विवरणपत्रावरून दिसते. परिणामी, करावरील महसुलापासून मनपा वंचित आहे. 3337 व्यापाऱ्यांपैकी प्रत्यक्षात 62 व्यापाऱ्याचे व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कराचे मूल्य निर्धारण केल्याचे दिसून आले.

50 कोटीवरील रुपयांची वार्षिक उलाढाल करीत असलेल्या पुढील व्यापारी संस्थांनी सन 2014-15 ची वार्षिक विवरणपत्रे सादर केली असली तरी, महानगरपालिकाकडील सनदी लेखापालामार्फत लेखापरीक्षणाचे दिनांकापर्यंत कराचे निर्धारण झालेले नाही.

(i) मे. शिवशंकर मोटर्स प्रा.ली., चंद्रपूर

(ii) मे.महाराष्ट्र राज्य पॉवर जनरेशन कंपनी ली., चंद्रपूर

(iii) मे.राजीव ट्रेडर्स, चंद्रपूर

(iv) मे.वेस्टर्न कोलफिल्ड ली., चंद्रपूर

उक्त अनियमिततेबाबत संबंधित विभागास जारी केलेल्या अर्धसमास पत्र क्र. 33, दि. 25/04/2016 चे प्राप्त अनुपालन विचारात घेवून सदरील परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFSPPMS501 (Ref No : 71, Hmm No : 33)



Scanned by CamScanner

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

Scanned by CamScanner

------------------- निरंक -------------------



Scanned by CamScanner

# भाग दोन

## सर्वसाधारण अनियमितता



Scanned by CamScanner

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी



Scanned by CamScanner

52 बांधकामांची नोंदवही व अपूर्ण बांधकामांच्या नोंदीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 0

शासन/मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

मनपा चंद्रपूर मध्ये विहित पद्धतीने बांधकाम नोंदवही ठेवली नसून वर्ष अखेर एकही बांधकाम अपूर्ण नसल्याची बांधकाम विभागाने पुरविलेली माहिती मोघम व शंकास्पद वाटते.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहितेमधील परिच्छेद 10.7 मध्ये प्रत्येक बांधकामावर वर्षभरात झालेल्या खर्चाच्या कायम व संयुक्त नोंदी ठेवून त्यायोगे बांधकामांची प्रगती व होत असलेल्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने नोंदवह्या ठेवण्याचे निर्देशित आहे. राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेतील (NMAM) प्रकरण 12 मधील Form PW-1 या नमुन्यात तशी माहिती नोंदविण्यासाठी तरतूद आहे. सदर माहिती परिपूर्ण असल्यास बांधकाम पूर्ण झाल्यावर दायित्व व मत्ता यांचा हिशेब चुकता करता येतो व वर्षअखेर अपूर्ण बांधकामांसाठी पुढील वर्षातील अंदाजपत्रकात उचित तरतूद करता येते.

मनपा चंद्रपूर मध्ये वरीलप्रमाणे नोंदवही न ठेवता वार्डनिहाय मंजूर कामाची प्रगतीदर्शक नोंदवही ठेवण्यात आल्याचे दिसते.

शहर अभियंता, मनपा चंद्रपूर यांनी पुरविलेल्या सन 2014-2015 अखेर योजनानिहाय अपूर्ण बांधकामांच्या माहितीदर्शक तक्त्यात 27 कामे नोंदविली असून सर्व कामे पूर्ण होऊन प्रदान होणे बाकी असल्याचे दर्शविले आहे. एकूणच उपलब्ध केलेल्या माहितीनुसार महानगरपालिकेकडील कोणतेही काम सन 2014-2015 अखेर प्रत्यक्षात अपूर्ण नव्हते ही बाब मोघम व शंकास्पद वाटते.

यासंदर्भात मनपाने खातरजमा करावी व उचित नमुन्यामध्ये नोंदवही ठेवून योग्य अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 21, Item No : 67)



Scanned by CamScanner

**53 बांधकामावर वापरलेल्या गौण खनिजाच्या परीमाणाचा खनिकर्म विभागाने जारी केलेल्या ट्रांझीट पासशी मेळ न घेण्याबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| *बांधकामाच्या विविध करारनाम्यांप्रमाणे अंतिम देयक सादर झाल्यानंतर एक महिन्यांचे आत बांधकामावर वापरलेल्या गौण खनिजांच्या परीमाणाचा खनिकर्म विभागांच्या ट्रांजीट पासशी मेळ घालणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याने अनुसूचित मार्गाने गौण खनिजाची वाहतुक व वापर करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.* |

मनपाच्या विविध रस्ता बांधकामावर वाळु, मुरुम, गिट्टी इ. गौण खनिजाचा वापर होत असून मोजमाप पुस्तिकांमध्ये दर्शविलेल्या मोजमापांच्या वापरलेल्या गौण खनिजांचे परिमाण निश्चित करुन रु. 71/- प्रति घनमीटर या दराने राजस्व शुल्काची (Royalty) रक्कम देयकातून कपात करण्यात येते. कंत्राटदाराशी केलेल्या करारनाम्याप्रमाणे अंतिम देयक सादर झाल्यानंतर एक महिन्याच्या आत खनिकर्म विभागाने जारी केलेल्या ट्रांझीट पासशी मेळ घालून राजस्व शुल्क मोकळे करण्याचे प्रमाणपत्र खनिकर्म अधिकारी यांचेकडून प्राप्त न झाल्याने देयकातून कपात केलेले खनिज शुल्क शासनाकडे वेळोवेळी जमा करण्यात येतात.

परंतु असे दिसून आले आहे की, कंत्राटदार खनिकर्म विभागाकडून उपरोक्त प्रमाणपत्र प्राप्त करुन देयकातून कपात केलेल्या राजस्व शुल्काची रक्कम मनपाकडून परत घेत नाही. अर्थात सदर रक्कम कालांतराने मनपाकडून शासनाकडे जमा करण्यात येते. मनपासुध्दा अशा कंत्राटदारांना खनिकर्म विभागाकडून उपरोक्त प्रमाणपत्र प्राप्त न करण्याची पर्यायाने मुभा देत आहे, असे लक्षात येते.

उदा. पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत महाकाली मंदीर प्रभागात श्री.गोवर्धन ते शिवमंदीर व गौतम नगर परिसरात कॉंक्रीट रस्ता बांधकामात 1014.02 घनमीटर रेती, मुरुम व खडी हे गौण खनिज वापरले असून यापोटी मनपाने देयकातून रु.73435/- ची राजस्व शुल्काची कपात केली असली तरी गौण खनिजाचा जिल्हा खनिकर्म अधिकारी, यांचेकडून ताळमेळ घालून राजस्व शुल्क मोकळे करण्याचे प्रमाणपत्र प्राप्त केले नाही.

यावरुन कंत्राटदार राजस्व शुल्क भरलेल्या गौण खनिजाची खरेदी न करता किंवा खनिकर्म विभागाकडून ट्रांझीट पास प्राप्त न करता व त्याचे उचित राजस्व मुल्य शासनाकडे जमा न करता अनुचित मार्गाने रस्ता बांधकामासाठी गौण खनिजाची वाहतुक व वापर करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच बांधकामाच्या प्राकलनातील तरतुदीप्रमाणे आवश्यक त्या योग्य परीमाणाचे गौण खनिज न वापरता तसे वापरल्याने मोजमाप पुस्तकात नोंदविणे व पर्यायाने रस्त्याचा दर्जा उचित स्वरुपाचा नसणे, याचीही शक्यता नाकारता येत नाही. यामुळे शासनाचा/मनपाचा निधी निरर्थक खर्च होण्याचा संभव निर्माण होतो.

मनपाकडील बांधकामाचा सर्वच प्रकरणांच्या बाबतीत सदर बाब लागु असल्याचा संभव आहे.



Scanned by CamScanner

2) कंत्राटदाराच्या देयकातून गौण खनिजावरील स्वामीत्वधनाच्या रकमेची प्रती घनमीटर परिगणना करतांना सर्व प्रकारच्या गौण खनिजांसाठी (रेती, मुरुम, खडी) एकच दर लावण्यांत येत आहे असे दिसून आले. सदरच्या दराची योग्यता तपासण्यासाठी प्रचलीत शासन संदर्भाची प्रतीबाबत मनपास विचारणा केली असता ती उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे शासनाचा महसुल उचित दराने वसुल केला जातो, हे निश्चित करता आले नाही. यासंदर्भात मनपाने अभिप्राय सादर न केल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 23, Hmm No : 90)

## 54 त्रयस्थ लेखापरीक्षण शुल्क या बाबीवर अनियमित खर्च नोंदविण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : 00 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 93

गुंतलेली रक्कम रु. 82955.00 /-

**बांधकामाचे त्रयस्थ लेखापरीक्षणाच्या शुल्काच्या प्रदानाची जबाबदारी कंत्राटदाराची असताना मनपा निधीतून रु 82,955/- खर्च केल्याचे नोंदविण्यात आले आहे.**

बांधकाम विभागांतर्गत करण्यात येणा-या रस्ता बांधकामांचे त्रयस्थ लेखापरीक्षण करण्याची व त्याचे शुल्क अदा करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारांची असल्याचे करारनाम्यांवरुन लक्षात येते. सदर लेखापरीक्षणासाठी महानगरपालिकेने वेळोवेळी चंद्रपूर येथील स्थानिक राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयास कार्यादेश जारी करुन सदर कामासाठीचे शुल्क संबंधित कंत्राटदारांनी अदा करण्याचेही निर्देशित करण्यात आले आहे.

असे असतांना "त्रयस्थ संस्थेमार्फत लेखा परिक्षण खर्च" या (बांधकाम - 238) लेखाशिर्षाखाली 2013-14 मध्ये रु. 82,955/- एवढा खर्च झाल्याचे सन 2014-15 च्या सुधारित अंदाजपत्रकातील 2013-14 च्या प्रत्यक्ष खर्चाच्या आकडेवारीवरुन दिसून येते. या बाबतीत खर्चाचे अभिलेखे उपलब्ध करण्यास अर्धसमास पत्र क्र.91, दिनांक 04.07.2016 अन्वये सुचविले असता तशी कार्यवाही न केल्याने किंवा कोणतेही स्पष्टीकरण उपलब्ध न केल्यामुळे सदरची रक्कम अनियमितपणे खर्च करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATABWM6901 (Ref No : 24, Hmm No : 91)



Scanned by CamScanner

## 55 वाटाघाटीअंती निश्चित झालेला दर निविदा प्रपत्रात न नोंदविताच कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्याची अनियमितता.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 13791833.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13791833.00/-

| |
|---|
| *निविदाप्रपत्रामध्ये कंत्राटदार व आयुक्त यांच्या वाटाघाटी मध्ये मंजूर झालेला दर निविदाप्रपत्रात Tender for works मधील शर्तीनुसार निविदा पत्रात नमूद केला नसतांना कंत्राटदारास नियमबाह्यपणे कार्यारंभ आदेश देण्यात आले.* |

(मूळ परिच्छेद ID-DATBNKM6401)

सन 2014-2015 मध्ये महानगरपालिकेने मंजूर केलेल्या विविध कामाच्या निविदाप्रपत्रात पान क्रमांक 13 व Tender for works हा परिच्छेद असून सदर परिच्छेदामध्ये निविदा प्रपत्र स्विकारण्याबाबत कंत्राटदार व आयुक्त यांच्यामधील वाटाघाटीनुसार मंजूर झालेला कामाचा दर आयुक्तांनी स्वतः नमूद करून स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. जेणेकरून मंजूर दराची नोंद निविदापत्र या मूळ अभिलेख्यात कायम होत असते. परंतु खालील कामाच्या निविदाप्रपत्रामध्ये आयुक्तांनी निविदा स्विकृतीचा दर नमूद केला नसतांना कंत्राटदारांना नियमबाह्यपणे कार्यारंभ आदेश दिला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका मधील परिशिष्ट 12 परिच्छेद 21 अनुसार निविदा उघडणाऱ्या अधिकाऱ्याने उपस्थित कंत्राटदारांस दर जाहीर केल्यानंतरच दर तेथेच स्वतः अक्षरामध्ये लिहिणे आवश्यक आहे. पुढील प्रकरणी आयुक्तांनी निविदेस मंजुरी देवून सुद्धा Tender for works ह्या अटीमध्ये मंजूर निविदादर नमूद केला नसल्याने कंत्राटदारास देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशामधील दराची खात्री झाली नाही. त्यामुळे कंत्राटदारास प्रदान केलेल्या रकमेची निविदा संशयीत असल्याने खालील बांधकामाच्या प्रदानाची रक्कम रुपये 13791833/- फक्त ह्या बाबीच्या मर्यादेत आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

निविदा प्रपत्रात कामाचा दर नमूद करून स्वाक्षरीत केले नसल्याचे विवरणपत्र-

(रकमा रुपयांत)

| अ.क्र | कामाचे नाव | कार्यारंभ आदेश | प्रदान |
|---|---|---|---|



Scanned by CamScanner

| | | क्रमांक | दिनांक | प्र.क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुल वार्ड ते स्प्रे नाल्यापर्यंत रस्ता डांबरीकरण | 302 | 10.07.2013 | 6 | 17.12.2014 | 858696 |
| 2 | महेशनगर वार्ड येथे ताडोबा रोड ते ख्रिश्चन हॉस्पिटल पर्यंत रस्ता विकसित करण्याचे काम. | 316 | 27.02.2010 | 8 | 27.01.2014 | निरंक |
| 3 | हिंदुस्थान लालपेठ कॉलरी प्रभागात इकरान ते संगमवार घर कॉक्रीट रस्ता | 61 | 29.04.2014 | 50 | 02.03.2015 | 786421 |
| 4 | गौरी तलाव प्रभाग रमेश आत्राम ते नळे घर कॉक्रीट रस्ता | 65 | 29.04.2014 | 55 | 02.03.2015 | 837411 |
| 5 | घुटकाळा प्रभागात त्रिसळे ते नागराळे घर कॉक्रीट नाली. | 62 | 29.04.2014 | 56 | 02.03.2015 | 589810 |
| 6 | पठाणपुरा भागात ढोलणे ते देशकर घर कॉक्रीट रस्ता | 47 | 28.04.2014 | 58 | 02.03.2015 | 1827595 |
| 7 | कामगार झोपडपट्टी प्रभागात डोहनकर ते सिंगाडे घर कॉक्रीट रस्ता | 59 | 02.03.2014 | 59 | 02.03.2015 | 932790 |
| 8 | इंडस्ट्रीयल इस्टेट प्रभागात चंदेवार ते जनरल संडास पर्यंत डांबरीकरण. | 48 | 29.04.2014 | 60 | 02.03.2015 | 560537 |
| 9 | कामगार झोपडपट्टी प्रभागात सोरते ते फुलकर घर कॉक्रीट रस्ता | 42 | 28.04.2014 | 61 | 02.03.2015 | 598400 |
| 10 | रयतवारी कॉलनी प्रभागात गडपल्लीवार ते बोकडे घर कॉक्रीट रोड | 51 | 29.04.2014 | 70 | 05.03.2015 | 601619 |
| 11 | अष्टभुजा प्रभागात कपील चौक हायमास्ट उभारणी काम | 59 | 29.04.2014 | 77 | 25.03.2015 | 130688 |
| 12 | तुळजाभवानी प्रभागात मस्जिद जवळील कॉक्रीट रोड | 39 | 28.04.2014 | 47 | 31.03.2015 | 1762581 |
| 13 | पठाणपुरा प्रभाग मिलिंद नगर कॉक्रीट रोड | 48 | 28.04.2014 | 49 | 31.03.2015 | 2447817 |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | बिनबा प्रभागात गोरे ते सातपुते घर सिमेंट कॉंक्रीट नाली. | 70 | 30.04.2014 | 15 | 31.03.2015 | 150103 |
| 15 | हिंदुस्थान लालपेठ मेडलवार ते व्यंकटी घर कॉंक्रीट रोड | 175 | 12.06.2014 | 57 | 02.03.2015 | 1707365 |
| एकूण रुपये | | | | | | 13791833 |

DATABWM6901 (Ref No : 53, Hmm No : 52)

## 56 रस्ता बांधकामांना विनादंड मुदतवाढी देण्याची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 17099181.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 17099181.00/-

***कंत्राटदारानी विहीत मुदतीत काम पूर्ण केले नसतांना त्यांच्या कडून कोणताही दंड वसूल करण्यात आला नाही.***

(मूळ परिच्छेद ID-DATBNKM6401)

महानगरपालिका चंद्रपूर येथे सन 2014-2015 मध्ये करण्यात आलेली विविध बांधकामे कंत्राटदारांनी विहित मुदतील पूर्ण केलेली नसतांना त्यांना कोणत्याही प्रकारचा दंड करण्यात आला नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक.संकीर्ण 05-06/प्र.क्र.53/इमा-2 मुंबई दिनांक 18-09-2006 चे परिच्छेद 3 अनुसार कंत्राटदाराने निविदा सूचनांचे अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे. जर कोणत्याही कंत्राटदरांनी अटी व शर्तीचे पालन केले नाही तर त्यास पदावनत करणे, नोंदणी रद्द करणे, दंड लावणे, काळ्या यादीत टाकणे इत्यादी शिक्षा करण्याबाबत शासनाने कडक धोरण निश्चित केले आहे. त्याला अनुसरून बांधकामे विहीत मुदतीत करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. परंतु खालील बांधकामे विहीत मुदतीत पूर्ण केली नसतांना महानगरपालिकेने विनादंड मुदतवाढी मंजूर केल्या आहेत.

महानगरपालिकेने कंत्राटदारास दिलेल्या विनादंड रकमेच्या मुदतवाढीमुळे सदर बांधकामावर गुंतलेल्या रकमेवरील व्याज कामाच्या संनियंत्रणासाठी वापरण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन व



Scanned by CamScanner

अत्यावरील खर्च, विचाराधीन कामाची उपयोगीता, बांधकामे विहीत कालावधीत पूर्ण न झाल्यामुळे त्यापासून नागरिकांना मिळणाऱ्या लाभाचे नुकसान, रस्त्याच्या कामास झालेल्या विलंबामुळे वाहनाचे नुकसान व ज्यादाचा इंधन खर्च इत्यादी सर्वकष विचार आर्थिक स्वरुपात परीगणित करून निर्धारीत रकमेचा दंड संबंधित कंत्राटदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

कामाच्या आदेशामध्ये बांधकाम पूर्ण होण्याच्या कालावधीचा सर्वंकश विचार करुनच कामे पूर्ण करण्यासाठीची मुदत निश्चित केली असतांना महानगरपालिकेने कंत्राटदारास विनादंड मुदतवाढी देवून कोणते हित साध्य केले याची कारणे सुद्धा अज्ञात असल्याचे दिसून आले. सबब उक्त बाबींचा विचार करून कंत्राटदाराकडून दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक असल्याने खालील बांधकामावर झालेल्या खर्चाची एकूण रक्कम रुपये. 17099181/- आक्षेपीत ठेवण्यात येते.

विनादंड मुदतवाढी दिल्याचे विवरणपत्र

| अ. क्र. | कामाचे नाव | कार्यारंभ आदेश | | काम पूर्ण करण्याची मुदत | कामपूर्ण दिनांक | विलंब कालावधी | प्रदान | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्र. | दिनांक | | | | प्र. क्र | दिनांक | रक्कम |
| 1 | प्रकाशनगर भागात कॉंक्रीट रस्त्याची बांधकाम | 933 | 15.1.2014 | 3 महिने | 29.12.2014 | 6 महिने 14 दिवस | 63 | 5.3.2015 | 487498 |
| 2 | मातानगर प्रभाग गड्डूमवार ते याद घर कॉंक्रीट रस्ता | - | 19.10.2013 | 3 महिने | 24.11.2014 | 1वर्ष 1 महिना | 72 | 25.3.2015 | 932373 |
| 3 | मातानगर प्रभाग नर्मिला ते | 275 | 29.6.2013 | 3 महिने | 24.11.2014 | 2 महिने | 72 | 25.3.2015 | 947026 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भानेश पर्यंत कॉंक्रीट रोड | | | | | | | | |
| 4 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रभागात पोटदुखे ते पाटील घर कॉंक्रीट रस्ता | 777 | 29.11.2013 | 4 महिने | 26.9.2014 | 6 महिने | 95 | 31.3.2015 | 310202 |
| 5 | एम.ई.एल प्रभागात दुर्गा मंदिर ते चनेकर घर कॉंक्रीट रोड | 849 | 13.12.2013 | 3 महिने | 27.6.2014 | 3 महिने | 99 | 31.3.2015 | 317712 |
| 6 | वडगाव रोड हवेली गार्डन ते स्नेह नगर रोड ते दिनुजी भवन पर्यंत कॉंक्रीट रोडचे बांधकाम | 1066 | 20.2.2014 | 5 महिने | 10.11.2014 | 4 महिने | 159 | 2.3.2015 | 700387 |
| 7 | इंदिरानगर प्रभागात भारत चौक ते सोनुने घर कॉंक्रीट रोड | 1133 | 24.2.2014 | 5 महिने | 15.9.2014 | 2 महिने | 160 | 2.3.2015 | 2071555 |
| 8 | अष्टभुजा प्रभाग रविदास ते हनुमान | 1002 | 17.2.2014 | 5 महिने | 5.9.2014 | 2 महिने | 157 | 2.3.2015 | 558914 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंदिर कॉंक्रीट रोड | | | | | | | | |
| 9 | बिनबा प्रभाग रवेल्लीवार ते हनुमान मंदिर रस्ता डांबरीकरण. | 1077 | 20.2.2014 | 5 महिने | 19.9.2014 | 2 महिने | 158 | 2.3.2015 | 1924145 |
| 10 | अष्टभुजा प्रभाग रविदास ते हनुमान मंदिर कॉंक्रीट रोड | 1055 | 17.2.2014 | 4 महिने | 17.2.2014 | 7 महिने | 156 | 2.3.2015 | 1041213 |
| 11 | जुने बी एन आर स्टेशन ते मातानगर चौक ते हनुमान मंदिर रस्ता डांबरीकरण | 178 | 1.6.2013 | 3 महिने | 18.11.2013 | 2 महिने | 1 | 26.6.2014 | 4054342 |
| 12 | बी.एस.एन.एल. ऑफिस ते रेल्वे क्रॉसिंग रस्ता डांबरीकरण | 593 | 4.9.2013 | 3 महिने | 31.3.2014 | 3 महिने | 3 | 25.7.2014 | 2897118 |
| 13 | मुल रोड ते स्प्रे नाल्यापर्यंत रस्ता डांबरीकरण | 302 | 10.7.2013 | 3 महिने | 27.5.2014 | 7 महिने | 6 | 17.12.2014 | 858696 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 14 | महेशनगर वार्ड येथे ताडोबा रोड ख्रिश्चन हॉस्पिटल नाली व फुटपाथ काम | 108 | 25.5.2010 | 5 महिने | 30.6.2012 | 8 महिने | 7 | 27.1.2015 | निरंक |
| 15 | महेशनगर वार्ड येथे ताडोबा रोड ते ख्रिश्चन हॉस्पिटल रस्ता काम. | 316 | 21.7.2010 | 9 महिने | 31.3.2012 | 11महिने | 8 | 27.1.2015 | निरंक |
| | एकूण रुपये | | | | | | | | 17099181 |

DATABWM6901 (Ref No : 54, Hmm No : 53)

***57 चंद्रपूर शहरात वेगवेगळ्या ठिकाणी रस्त्याला भूमिगत केबल टाकण्याच्या कामातील अनियमितता.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 3101250.00/-

| |
|---|
| *महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग याचे दि. 27 एप्रिल 2000 चे शासन निर्णयानुसार 30 वर्षाकरिता अनुज्ञप्ती तत्वावर परवानगी दिल्याबाबत नमूद नाही, अनुज्ञप्तीधारकाच्या एकूण पेड अप कॅपीटल च्या 5 टक्के कॅशलेस इक्विटी शेअर्सच्या स्वरुपात शासनाला भरणा केल्याचे दिसून आले नाही, 2 एम. बी. बॅंडविड्थ विनामूल्य दिल्याचे दिसून आले नाही, दंडाची रक्कम रु. 31,01,250/- चा भरणा झाल्याचे आढळून आले नाही,* |



Scanned by CamScanner

करारनाम्यातील अटीनुसार मौलाना अबुल कलाम आझाद बागेचा सुमारे 100 ते 125 लक्ष पर्यंतची विकास कामे व पाच ठिकाणी 'पैसे द्या व वापरा' तत्वावर शौचालयाचे बांधकाम मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड यांनी करून देलेले नाही, सदर कामावर नियंत्रक म्हणून मनपा अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली नाही व त्याबाबतची नोंदवही सुद्धा ठेवण्यात आलेली नाही.

चंद्रपूर शहरात वेगवेगळ्या 35.66 कि.मी. रस्त्याला भूमिगत केबल टाकण्यास मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम ली. मुंबई यांना पत्र क्र. 790 दि. 16.06.2014 नुसार परवानगी देण्यात आली होती. तरी सदर प्रकरणी खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

1. <u>महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग याचे दि. 27 एप्रिल 2000 चे शासन निर्णयातील</u> -

अ) <u>क्र. 1 नुसार</u> – महाराष्ट्र राज्यात ऑप्टीकल फायबर केबल नेटवर्क पुरविणाऱ्या कंपन्यांना शासन महानगरपालिकेच्या हद्दीतील / मालकीच्या / बिगर मालकीच्या जमिनीच्या खालून वापर करण्यास अशा जमिनी 30 वर्षांकरिता अनुज्ञप्ती तत्वावर परवानगी द्यावी असे नमूद आहे.

परंतु मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड तर्फे अनुराग वर्मा व मा. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यात 30 वर्षांकरिता अनुज्ञप्ती तत्वावर परवानगी देण्यात येत आहे असे नमूद केल्याचे दिसून आले नाही. (कालावधी नमूद नाही)

ब) <u>क्र. 2 नुसार</u> – अनुज्ञप्तीधारकाच्या एकूण पेड अप कॅपीटल च्या 5 टक्के कॅशलेस इक्विटी शेअर्सच्या स्वरुपात शासनास देय असेल. शासनाला भरण्यायोग्य कॅशलेस इक्विटी ही भागभांडवल जसजशा प्रमाणात भरली जाईल (सबस्क्राईब्ड) त्या त्या वेळेस दिली जाईल असे नमूद आहे.

परंतु, रोड कटिंग चार्जेस संबंधीत अनुज्ञप्तीधारकाद्वारे मनपास प्राप्त झालेली एकूण पेड अप कॅपीटल (रक्कम) किती व शासनाला देण्यात आलेली कॅशलेस इक्विटी (रक्कम) किती याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. तरी सदर रकमेचा भरणा शासनखाती झाला किंवा कसे याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

क) <u>क्र. 3 नुसार</u> – अनुज्ञप्ती धारक कंपन्यांनी 2 एम. बी. बँडविड्थ महानगरपलिकेला स्वतंत्रपणे वापरण्यासाठी अनुज्ञप्तीच्या काळात विनामूल्य द्यावी, असे नमूद आहे.

तरी 2 एम. बी. बँडविड्थ महानगरपलिकेला स्वतंत्रपणे वापरण्यासाठी मिळाली किंवा कसे याबाबतचा उल्लेख संबंधीत नस्तीमध्ये करण्यात आला नाही. मनपा विविध दूरध्वनी देयकांद्वारे इंटरनेट सेवेसाठीचे शुल्क बी.एस.एन.एल.कंपनीस अदा करीत असल्यामुळे 2 एम. बी. बँडविड्थ मनपास उपलब्ध होत नसल्याचे दिसते. परिणामी मनपा निधीतून अनावश्यक खर्च होत आहे. तो मे.रिलायन्स कडून वसूलपात्र आहे.

2. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या दि. 14.10.2013 ला झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. 72 नुसार कामगार झोपडपट्टीभागात महानगरपालिकेच्या परवानगीविना काम सुरु केल्याने रु. 75.00 लक्ष दंड करण्यात आला होता. शासनामार्फत महानगरपालिकेकडे रोड कटिंग पोटी जमा केलेली रक्कम रु. 43,98,750/- दंडाच्या रकमेत समायोजित करण्यात आली. मनपाचे पत्र क्र. 3180 दि. 07.12.2013 नुसार उर्वरित दंडाची रक्कम रु. 31,01,250/- चंद्रपूर महानगरपालिकेकडे 7 दिवसांच्या आत (दि. 14.12.2013 पूर्वी) जमा करणेबाबत मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम ली. मुंबई यांना कळविल्याचे दिसून आले.

परंतु, उर्वरित दंडाची रक्कम रु. 31,01,250/- चंद्रपूर महानगरपालिकेकडे जमा झाल्याबाबतचे दस्तऐवज



Scanned by CamScanner

लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही. तरी दंडाची रक्कम रु. 31,01,250/- चंद्रपूर महानगरपालिकेकडे जमा झाली नसल्याचे नाकारता येत नाही.

3. मनपाचे पत्र क्र. 614 दि. 31.05.2014 नुसार चंद्रपूर शहरात वेगवेगळया 35.66 कि.मी. रस्त्यावर केबल टाकण्यास तसेच वेगवेगळ्या ठिकाणी जवळपास 100 टॉवर उभारण्यास खाली नमूद रक्कमांचा भरणा झाल्यानंतर सदर कामास मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम ली. मुंबई यांनी परवानगी देण्यात येईल असे नमूद आहे.

अ) रोड कटिंग चार्जेस रु. 3,50,78,400/-

ब) प्रती टॉवर रु. 1,30,000/-

क) केबल टाकण्याकरिता बँक गॅरंटी रु. 17.83 लक्ष.

तरी उपरोक्त रक्कमा मनपाच्या खात्यात जमा झाल्याबाबतचे दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून देयात आले नाही त्यामुळे उपरोक्त रक्कमेचा भरणा झाला किंवा कसे याची शहानिशा करता आली नाही.

4. मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड तर्फे अनुराग वर्मा व मा. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांच्यामध्ये झालेल्या दि. 16.06.2014 च्या करारनाम्यात मौलाना अबुल कलाम आझाद बगीचा सुमारे 100 ते 125 लक्ष पर्यंतची विकास कामे करून देणे व पाच ठिकाणी पैसे द्या व वापरा तत्वावर शौचालयाचे बांधकाम स्वखर्चाने 9 महिन्यांच्या आत कंपनी करून देईल असे नमूद आहे

त्यानुसार दि. 16.03.2015 पर्यंत बागेचे व शौचालयाचे काम कंपनीने करून देणे अनिवार्य होते. परंतु सदरचे काम झाल्याचे नस्तीमध्ये दिसून आले नाही. तरी करारनाम्याच्या दिनांकानंतर कंपनीने सदरच्या कामास सुरुवात केल्याचे सुद्धा दिसून आले नाही. करारनाम्याच्या दिनांकापासून 9 महिन्यांच्या कालावधीत त्याचा पाठपुरावा मनपाने करणे गरजेचे होते परंतु तसे केल्याचे दस्तऐवजात लेखापरीक्षणास दिसून आले नाही.

6. चंद्रपूर शहरात वेगवेगळया 35.66 कि.मी. रस्त्याला भूमिगत केबल टाकण्यास मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम ली. मुंबई यांना पत्र क्र. 790 दि. 16.06.2014 नुसार परवानगी देण्यात आली होती. रोड कटिंगसाठी देण्यात आलेल्या अटी व शर्तीपैकी काही खालील प्रमाणे दिसून आल्या-

अ) काम करतांना मनपा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात यावी व त्यांच्या उपस्थितीत कामे करावीत.

ब) परवानगी दिलेल्या रस्त्या व्यतिरिक्त इतर रस्त्यावर खोदकाम केल्यास दुप्पट दराने रक्कम वसूल करण्यात येईल.

क) खोदाईचे काम चार महिन्यात पूर्ण करावे लागेल. मुदतीत पूर्ण न झाल्यास प्रथम महिन्यात रु. 3,000/- प्रती दिवस व तदनंतर रु. 5,000/- प्रती दिवस प्रमाणे दंड वसूल करण्यात येईल.

तरी उपरोक्त अटी व शर्तीनुसार -

1) काम सुरु करतांना मनपा अधिकाऱ्यांना लेखी सूचना देण्यात आल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे मनपा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कामे न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) कोणत्या मनपा अधिकाऱ्यांना व केव्हा या कामासाठी नियुक्त करण्यात आले याबाबत नस्तीत नमूद नाही.

3) या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी दिनांकित नोंदी घेतलेली मोजमाप नोंदवही (तारखेनुसार कोणते काम कोठे करण्यात आले बाबतची नोंदवही) उपलब्ध करून देण्यात आली नाही.

58 मनपाच्या लेख्यांची छाननी व लेखापरीक्षा न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :00 मनपा/शासन निधी
अनियमितता कलम : 9३

मनपाचे जमा खर्चाच्या लेख्यांची नियमित तपासणी होत नसल्याने मनपाचे स्तरावरून अंतर्गत नियंत्रणाचा अभाव दिसून येतो.

मनपाकडे स्वतःचे स्त्रोत व शासनाकडून विविध प्रकारचे अनुदानाद्वारे मोठ्या प्रमाणावर निधी जमा असून त्यामधून विविध महसुली व भांडवली योजनेवर खर्च केला जातो तर काही निधी ठेव स्वरुपात बँकांमध्ये गुंतविण्यात येतो. शासन निधी वगळल्यास मनपाकडील जमेच्या मालमत्ता कर, बाजार इत्यादी विविध स्त्रोतांच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने त्यांची व प्रत्यक्ष जमा रकमांची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. तसेच योजना घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता व बांधकामे इत्यादी सारख्या योजनांमध्ये प्रचंड निधी गुंतलेला असतांना या संपूर्ण लेख्यांची सुद्धा नियमित तपासणी करण्याची महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमात तरतूद करण्यात आलेली आहे. जेणेकरून मनपास येणे असलेल्या रकमांची पूर्ण वसुलीसाठी उचित नियोजन करणे शक्य होईल व जमा खर्चाच्या व्यवहारात गैरप्रकार, गैरविनियोग, अनियमितता, अपहार सारख्या गंभीर बाबी टाळता येतील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमध्ये कलम 105 (1)(2) मध्ये नगरपालिका मुख्य लेखापरीक्षणास मनपाच्या लेख्यांची तपासणी व लेखापरीक्षा करून त्याचा अहवाल स्थायी समितीस पाठविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

उक्त अधिनियमाचे कलम 106(1)(2) मध्ये मनपास येणे रकमांच्या वसुलीच्या बाबतीत व तिच्या लेख्यांच्या बाबतीवर आढलेले अयोग्य किंवा नियमबाह्य प्रकार अभिप्रायासह अहवालाद्वारे स्थायी समितीचे निदर्शनास आणणे जरुरी आहे. तसेच पोटनियम (3)(4) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने वार्षिक लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर केला पाहिजे.

तथापि, मनपा चंद्रपूर येथे उक्त तरतुदीची अंमलबजावणी झाली नाही. पर्यायाने मनपाच्या जमा, खर्च व त्यांचे लेखे यावर अंतर्गत नियंत्रणाचा अभाव आहे असे नमूद करण्यात येते.

DATABWM6901 (Ref No : 22, Hmm No : 92)



Scanned by CamScanner

### 59 मनपा आस्थापनेवर प्रवर्गनिहाय कर्मचा-यांची पदे तसेच बिंदूनामावलीनुसार प्रवर्गनिहाय पदाच्या स्थितीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

| |
|---|
| *महाराष्ट्र शासन, सामान्य विभाग, शासन निर्णय क्र. बिसीसी-1097/प्र.क्र.2/15-ब,दिनांक 29/03/1997 नुसार सरळसेवा व पदोन्नती इत्यादीसाठी विहित केलेली 100 बिंदू नामावलीचा वापर करणेबाबत शासनाचे निर्देश आहे. सेवा प्रवेश नियमानुसार प्रत्येक संवर्गाच्या भरती माध्यमाकरिता वेगवेगळी बिंदूनामावली पदभरती करणे आवश्यक आहे. महानगरपालिका चंद्रपूरचे सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान पदोन्नती तसेच अंतर्गत भरतीचे अनुषंगाने प्रमाणित बिंदूनामावली नोंदवही ठेवण्यात आली नसल्याचे आढळून आले.* |

सेवाप्रवेश नियमानुसार पदभरती करणे तसेच पदोन्नतीबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य विभाग, शासन निर्णय क्र. बिसीसी-1097/प्र.क्र.2/15-ब,दिनांक29/03/1997 नुसार सरळसेवा व पदोन्नती इत्यादीसाठी विहित केलेली 100 बिंदू नामावलीचा वापर करणेबाबत शासनाचे निर्देश आहे. सेवा प्रवेश नियमानुसार प्रत्येक संवर्गाच्या भरती माध्यमाकरिता वेगवेगळी बिंदूनामावली पदभरती करणे आवश्यक आहे. महानगरपालिका चंद्रपूरचे सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान पदोन्नती तसेच अंतर्गत भरतीचे अनुषंगाने प्रमाणित बिंदूनामावली नोंदवही ठेवण्यात आली नसल्याचे आढळून आले. त्यामुळे कर्मचा-यांची पदे भरतांना तसेच पदोन्नती देतांना बिंदूनामावलीचा वापर करण्यात आला किंवा कसे याबाबतची पडताळणी करता आली नाही.

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 121 दिनांक 03.08.2016 नुसार अद्यावत असलेली बिंदू नामावली नोंदवही, मनपा आस्थापनेवर नव्याने नियुक्ती करण्यात आलेल्या तसेच पदोन्नतीने भरण्यात आलेली पदे व अंतर्गत भरतीव्दारे पदे भरतांना तयार करण्यात आलेली बिंदूनामावली तसेच सध्या बिंदूनामावलीनुसार प्रवर्गनिहाय रिक्त पदाची संख्या तसेच कुठल्या बिंदूवरील पद रिक्त आहे. याबाबतची माहिती सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. उपरोक्त प्रकरणी अभिलेख तसेच प्रमाणित बिंदूनामावली नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही. करिता परिच्छेद नोंदविण्यात आला.

DATDUBM6401 (Ref No : 33, Hmm No : 121)

### 60 दिनांक 1 नोव्हें. 2005 नंतर नियुक्त कर्मचा-यांचे मासिक वेतनातून परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन रकमेची 10% रक्कम कपात न करणे, व मनपाच्या समसुल्य हिश्श्याची रक्कम संबंधीत खात्यात वळती न करणेबाबत.



Scanned by CamScanner

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 02

*लेखा शीर्ष :447 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

| |
|---|
| चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर कार्यालयाचे आस्थापनेवर दिनांक 1 नोव्हें. 2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या मासिक वेतनातून परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतनाची शासन निर्णयानुसार 10% रक्कम कपात करुन कर्मचा-यांचे खात्यात जमा करणे आवश्यक आहे. माहे मे 2013 चे मासिक देयकाची पडताळणी केली असता काही कर्मचा-यांचे अंशदान वेतनाची शासन निर्णयानुसार 10% रक्कम कपात करण्यात आल्याबाबत वर्षिक विवरण संबंधीत कर्मचा-यास देण्यात आले नाही, असे दिसून आले. |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो/1005/126/सेवा-4 दिनांक 31 आक्टो. 2005 व शासन निर्णय क्र. अंनियो/1007/18/सेवा-4 दिनांक 7 जुलै 2007 नुसार दिनांक 1 नोव्हे.2005 नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-यांना प्रचलित पध्दतीनुसार निवृत्ती वेतन देय नसल्याने नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केली, यामध्ये कर्मचा-यांचे नियुक्ती दिनांकाचे पुढील महिन्यापासून मुळ वेतन अधिक ग्रेड-पे तसेच महा. भत्ता या रकमेच्या किमान 10% रक्कम कपात करुन आलेली रक्कम व वेतनाच्या 10% रकमेएवढे समगुल्य मनपाचा हिस्सा म्हणून मनपा खात्यात ठेवणे आवश्यक आहे. या दोन्ही रकमाची एकत्रित रक्कम विहित व्याज दरासह कर्मचा-यास तो सेवानिवृत्त झाल्यावर लाभ म्हणून देय ठरेल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

महानगरपालिका चंद्रपूरचे आस्थापनेवरील दिनांक 1 नोव्हे. 2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांचे मासिक वेतनातून परिभाषीत अंशदान योजनेची 10 % रक्कम कपात करण्यात यावी. तसेच नियोक्त्याने सदर योजनेखाली परिभाषीत अंशदान योजना या अंतर्गत शासनाचे धोरणानुसार 10 % रक्कम महानगरपालिकेला देय असलेले अंशदान संबंधीत कर्मचा-यांचे खात्यात जमा करुन विवरण पत्रासह अनुपालन सादर करावे.

2. उपरोक्त शासननिर्णयानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर दरवर्षी या योजनेखालील वर्गणी मनपाचे समगुल्य तसेच त्यावरील देय व्याजाचे विवरण संबंधीत कर्मचा-यांना देणे आवश्यक आहे. परंतु वरील कार्यवाही होत असल्याचे दिसत नाही.

DATDUBM6401 (Ref No : 34, Hmm No : 74)

***61 टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या प्रकरणी प्राप्त रकमांचा तपशिल व आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत.***

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*



Scanned by CamScanner

*अनियमितता कलम : ९ड*

**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूरचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणा दरम्यान महानगरपालिकेस प्राप्त निधीचे स्त्रोत इत्यादीपासून प्राप्त होणारे उत्पन्न इत्यादी प्रकरणी पडताळणी केली असता टँकरने पाणी पुरवठा केलेल्या प्रकरणी जमा महसुल तरतुद केली नसल्याचे अंदाजपत्रकात आढळून आले.**

महानगरपालिकेने केलेल्या करारनाम्यानुसार शहरात मे. उज्वल कंट्रक्शन क. लि. चंद्रपूर यांनी अस्तित्वात असलेल्या नळ योजनेव्दारे व दरवर्षी 1.5 कि.मी. पाईपलाईन टाकूण शहरात पाणी पुरवठा करावयाचा आहे. त्याव्यतीरिक शहरातील बोअरवेल्स , विहिरीची दुरुस्ती व परिरक्षण करण्याची जबाबदारी त्यांचेवरच आहे. शहरातील ज्या भागात नळयोजना नाही, त्याभागात बोअरवेल्स चालु स्थितीत ठेवणे व महानगरपालिकेने नव्या जादा बोअरवेल्स बसविणे अपेक्षित आहे. परंतु बोअरवेल्स बंद पाडुन किंवा त्याठिकाणी कायमस्वरुपी उपाय करण्याऐवजी महानगरपालिका टँकरव्दारे मोफत पाणीपुरवठा करीत आहे. त्यामुळे नागरिकांना मुलभूत सोयी कायमस्वरुपी उपलब्द न करता टँकरच्या सतत वापरामुळे त्यावरील इंधनाच्या खर्चात अकारण वाढ होत आहे.

चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील ज्या भागामध्ये नळाव्दारे अथवा इतर स्त्रोतातून पाणी पुरवठा होत नाही,अश्या वस्त्यांना अग्निशमन विभागामार्फत टँकरव्दारे नागरीकांच्या मागणीनुसार पाणी पुरवठा करण्यात येतो. याकरिता स्थायी समितीने अंदाजपत्रकात प्रस्तावित केल्यानुसार प्रति टँकर रु.500/- प्रमाणे आकारणी करण्यास मंजूरी दिली. टंचाईग्रस्त भागास पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने अग्निशमन विभागाने सन 2014-15 या आर्थिक वर्षात टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्याप्रकरणी मनपास किती उत्पन्न प्राप्त झाले, याबाबत अर्धसमास पत्र क्र. 89 दिनांक 04.07.2016 अन्वये माहिती उपलब्ध करुन देण्यास सूचित करण्यात आले. परंतु लेखापरीक्षण कालावधीत अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

मुंबई स्थानिक निधी अधिनियम, 1930 मधील कलम 6 नुसार लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेख तपासणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियम (सुधारणा) 2011 मधील कलम 8 नुसार सदर बाब अत्यंत गंभीर असून लेखापरीक्षणास आवश्यक असलेले अभिलेख विहित मुदतीत सादर न केल्याने सदर प्रकरणी तपासणी करता आली नाही.

तरी याबाबत समर्पक खुलासा करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 35, Hmm No : 89)

### *62 मनपा चंद्रपूर अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register), औषधी साठा व पुरवठा नोंदवहीतील त्रुट्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*



Scanned by CamScanner

अनियमितता कलम : 98

मनपाच्या विविध आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण तपासणी नोंदवहीत परिपूर्ण नोंदी घेण्यात येत नाही. दैनंदिन व्यवहारानंतर गोषवारा काढून प्रमाणित करण्यात येत नाही. रुग्ण तपासणी फी पुरावा म्हणून पावती किंवा तत्सम प्रमाणित चिठ्ठी लेखापरीक्षणास पडताळणी करण्यासाठी उपलब्ध करण्यात आली नाही. तसेच औषधी साठा व पुरवठा नोंदवहीत दैनिक व्यवहारानुसार परिपूर्ण नोंदी घेण्यात येत नाही. नोंदवह्या सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात येत नाही. दैनिक औषधांच्या वापराबाबत तपशील उपलब्ध केलेला नाही.

अ) <u>बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही</u>-

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर अंतर्गत एकूण 10 नागरी आरोग्य केंद्रे असून या आरोग्य केंद्रात दैनंदिन रुग्णांची तपासणी करून उपचार करण्यात येतो. त्याकरिता बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register) ठेवण्यात येत असून रुग्णाकडून रु. 10/- प्रती नवीन रुग्ण व जुने नोंदणीकृत रुग्णाकडून रु.5/- प्रती रुग्ण प्रमाणे तपासणी फी वसूल करून तशी नोंद सदर नोंदवहीत घेऊन दिवस अखेर जमा रकमेचा हिशेब करून पटनी रजिस्टरद्वारे मनपा खात्यात जमा करण्यात येतो.

सन 2014-2015 मधील निवड महिन्यातील बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register) ची तपासणी केली असता सर्वच नागरी आरोग्य केंद्रातील नोंदवह्यात खालील त्रुट्या व अनियमितता आढळून आल्या.

1) सदर बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register) पृष्ठांकन करून सक्षम प्राधिकारी यांचे सही शिक्क्यानिशी प्रमाणित करण्यात येत नसल्याचे दिसून आले.

2) राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावलीतील प्रकरण 15 मधील परिच्छेद 15.7 नुसार सदर नागरी आरोग्य केंद्रात येणाऱ्या बाह्यरुग्णांची नोंद बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register) मध्ये कशाचे आधारे घेण्यात आली त्याचा पुरावा म्हणून पावती किंवा तत्सम प्रमाणित चिठ्ठी लेखापरीक्षणास पडताळणी करण्यासाठी उपलब्ध केली नसल्याने प्रत्यक्ष किती रुग्ण आले व किती रुग्णांकडून तपासणी फी वसूल करण्यात येऊन किती रुग्णांच्या नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या याचा मेळ घेता आला नाही.

3) सदर बाह्यरुग्णतपासणी नोंदवही मध्ये घेतलेल्या दैनिक रुग्ण नोंदीनुसार दिवस अखेर हिशेब करून दैनिक गोषवारा काढण्यात येत नसल्याचे तसेच काढलेला दैनिक गोषवारा सक्षम प्राधिकारी यांचे सही शिक्क्यानिशी प्रमाणित करण्यात येत नसल्याचे दिसून आले.

4) सदर बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही नुसार प्रत्येक दिवस अखेर झालेली जमा रकमेची नोंद पटनी नोंदवहीत (दैनिक जमा नोंदवही) घेऊन व चलान पावती तयार करून मनपाचे रोखपालाकडे जमा करण्यात येत असून सदर पटनी नोंदवही पृष्ठांकन करून सक्षम प्राधिकारी यांचे सही शिक्क्यानिशी प्रमाणित केले नसल्याचे दिसून आले.

5) सदर नागरी आरोग्य केंद्रास प्राप्त झालेल्या चलान पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्याने कोणत्या क्रमांकाचे किती चलान पुस्तक सदर नागरी आरोग्य केंद्रास प्राप्त झाली व किती



Scanned by CamScanner

वापरात आहेत याची पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त त्रुट्या विचारात घेतल्यास नागरी आरोग्य केंद्राचे प्रमुख तसेच आरोग्य विभागाचे प्रमुख यांचे महसुलाच उचित भरणा व त्याचे केंद्रस्तरावर योग्य लेखांकनासंदर्भात आवश्यक वित्तीय नियंत्रण नाही असे दिसून येते. या नियंत्रणा अभावी महसुली रकमांचा गैरविनियोगकिंवा इतर अनियमितता घडण्यास वाव निर्माण होतो.

**ब) <u>औषधी साठा व पुरवठा नोंदवही-</u>**

मनपाच्या आरोग्य विभागाद्वारे विविध आवश्यक औषधी खरेदी करून सदर नागरी आरोग्य केंद्रास मागणीप्रमाणे वेळोवेळी पुरवठा केला जातो, याची नोंद घेण्यासाठी विहित साठा व पुरवठा नोंदवही सदर नागरी आरोग्य केंद्रात व आरोग्य विभागात ठेवण्यात आली आहे.

सन 2014-2015 मधील निवड महिन्यातील औषधी साठा व पुरवठा नोंदवहीची तपासणी केली असता आरोग्य विभागातील व सर्वच नागरी आरोग्य केंद्रातील नोंदवहयात खालील त्रुट्या व अनियमितता आढळून आल्या.

1) राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावलीतील प्रकरण 13 अन्वये सदर औषधी साठा व पुरवठा नोंदवही पृष्ठांकन करून सक्षम प्राधिकारी यांचे सही शिक्क्यानिशी प्रमाणित करण्यात येत नसल्याचे दिसून आले.

2) सदर औषधी साठा व पुरवठा नोंदवहीत प्राप्त औषधांच्या नोंदीनुसार पृष्ठ क्रमांकासह अनुक्रमणिका तयार केलेली नाही. बहुतेक नागरी आरोग्य केंद्रातील नोंदवहीत अपूर्ण व अर्धवट अनुक्रमणिका असून संपूर्ण प्राप्त औषधांच्या नोंदी घेण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले.

3) सदर औषधी साठा व पुरवठा नोंदवहीत व्यवहाराच्या दिनांकानुसार नोंद घेण्यात येत नाही. नोंदवहीतील विहित रकान्यात परिपूर्ण माहिती भरण्यात आली नसून अर्धवट नोंद घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. जसे, औषधांचे नाव, बॅच क्रमांक, मॅन्युफॅक्चर दिनांक, एक्सपायरी दिनांक, इत्यादीची नोंद घेण्यात येत नाही. त्यामुळे मुदतबाह्य झालेली औषधांचा उपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सदर नागरी आरोग्य केंद्राद्वारे विविध उपचारासाठी व शिबिरात मागणीप्रमाणे औषधी पुरवठा करण्यात येत असून नोंदी व्यवहाराच्या दिनांकानुसार घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रारंभिक शिल्लक व अखेरची शिल्लक दिनांकानुसार दिसून येत नाही.

5) मनपाच्या आरोग्य विभागाकडून खरेदी केलेली औषध नागरी आरोग्य केंद्रांना हस्तांतरित करतांना विभागाकडील औषधी साठा पुस्तकात केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या औषधी प्राप्त झाल्याच्या नोंदी घेण्यात येत नाही, असे दिसून आले. प्राप्त औषधांच्या मुद्रित केलेल्या पावत्यावरील संबंधीत रकान्यात विभागाचा साठा नोंदवही क्रमांक व पृष्ठ क्रमांक टाकण्यात येत नसून नागरी आरोग्य केंद्राद्वारे सुद्धा त्यांनी नोंद घेतलेला साठा नोंदवही क्रमांक व पृष्ठ क्रमांकनमूद करण्यात येत नाही. त्यामुळे सदर औषधांच्या अनेक ठिकाणी नोंदी होण्याची शक्यता असून प्राप्त साठा व वापर याचा ताळमेळ



Scanned by CamScanner

संबंधितांद्वारे घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

6) नागरी आरोग्य केंद्रात पुरवठा केलेल्या औषधांचा कसा व किती रुग्णांवर वापर करण्यात आला याचा तपशील लेखापरीक्षणास नागरी आरोग्य केंद्राद्वारे उपलब्ध करून देण्यात आला नाही. त्यामुळे प्राप्त औषधांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

तरी वरीलप्रमाणे त्रुट्या व अनियमितता भविष्यात राहणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

DATYBDM6301 (Ref No : 36, Hmm No : 20)

*63 म.न.पा. चंद्रपूर शहर येथील सामान्य निधी व इतर निधींचे रोखपुस्तक व बँक खात्यातील अखेरच्या शिलकेच्या ताळमेळाबाबत.*

सामान्य निधी/आयएचएसडीपी/इतर निधी (सन 2014-15)

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 02

*लेखा शीर्ष : 00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 93*

*सन 2014-15 मध्ये चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे लेखापरीक्षणात दिनांक 31.3.2015 रोजी सामान्य निधी व आयएचएसडीपी (Integrated Housing and Slum Development Programme) तसेच इतर योजनांचे निधीच्या रोखपुस्तकाची तसेच बँक पासबुक/बँक विवरणपत्र (Bank Statement) ची तपासणी केली असता रोखपुस्तकातील अखेरची शिल्लक व बँक पासबुक/विवरणपत्रातील शिल्लक यामध्ये बरीच तफावत दिसून येते.*

8) <u>सामान्य निधी</u> :-

मनपाने सामान्य निधी पुढील तक्त्यातील तपशीलाप्रमाणे तीन स्वतंत्र बँक खात्यांमध्ये ठेवला असून रोखवहीच्या तीन भागात बँकनिहाय स्वतंत्र जमा खर्चाच्या नोंदी घेतल्या आहेत. लेखाविषयक सर्वसाधारण नियमांप्रमाणे सामान्य निधीतील सर्व नोंदी (जमा खर्च) एकत्र ठेवणे व एकच बँक खाते ठेवणे सोयीचे झाले असते.

सन 2014-15 मध्ये चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे दिनांक 31.3.2015 रोजी सामान्य निधीचे रोखपुस्तक व बँक खाते विवरणपत्र (Bank Statement) ची तपासणी केली असता रोखपुस्तकातील तीन भाग मिळून अखेरची शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यामध्ये बरीच तफावत दिसून येते.

शिलकेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-



Scanned by CamScanner

(रकमा रुपयांत)

| सामान्य निधी - दिनांक 31.3.2015 अखेर | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रोख पुस्तक भाग क्र. | बँकेचे नांव व शाखा/ खाते क्रमांक | खातेपुस्तका-तील/बँक विवरणपत्रातील दि. 31.3.2015 रोजी शिल्लक | रोखपुस्तकातील दि.31.3.2015 रोजी अखेरची शिल्लक | ताळमेळ पत्रकानुसार रोखपुस्तकातील अखेरची शिल्लक (सनदी लेखापालाने तयार केलेले) | ताळमेळ पत्रकानुसार खातेपुस्तकातील शिल्लक (सनदी लेखापालाने तयार केलेले) | |
| 1 | SBI (General Fund) Chandrapur A/c.No. 11014449507 | 6092152.98 | 5502921.09 | Statement Unavailable | Statement Unavailable | 589 |
| 2 | UCO BANK, Chandrapur A/c No. 6910100005840 | 58342639.61 | 29671830.72 | Statement Unavailable | Statement Unavailable | 2867 |
| 3 | SBI (VYF) Chandrapur A/c.No. 1104454878 | 18176931.08 | 10331159.82 | Statement Unavailable | Statement Unavalable | 784 |
| | | 82611723.67 | 45505911.63 | | | 3710 |

{रोखपुस्तक व बँक खातेपुस्तकातील अखेरच्या शिलकेतील तफावत - रु.37105812.04 (रकाना क्र.3-4)}

राष्ट्रीय मनपा लेखा नियमावली (NMAM) मधील प्रकरण 30 मधील कार्यपध्दतीनुसार शिलकेचा दर



Scanned by CamScanner

ताळमेळ करून मनपाच्या महसुलाच्या रकमांची बँक खात्यात प्रत्यक्ष जमा व बँक खात्यातून धनादेशाद्वारे करण्यात येणारे प्रदान यामधील अनियमितता किंवा गैरप्रकार निदर्शनास येऊन त्यास आळा घालता येतो. परंतु सदर बाबतीत अ.क्र.1 नुसार रु.3.71 कोटी व अ.क्र.2 नुसार रु.6.76 लाख एवढी प्रचंड तफावत लक्षात घेता ताळमेळाअभावी अनियमिततांची शक्यता नाकारता येत नाही.

मनपाच्या इतर निधींच्या रोखपुस्तकातील व बँक पासबुक/बँक विवरणपत्रातील वर्षाअखेरच्या शिल्लक रकमेचा ताळमेळ घेण्यात आला असला तरी तफावतीचे निराकरण पुढील काळात झाल्याची नोंद रोखपुस्तकात आढळून येत नाही. त्याप्रकरणी ताळमेळाची प्रक्रीया अपूर्ण असल्याचे दिसून येते.

तरी आवश्यक बाबी तपासून दिनांक 31.3.2015 रोजीच्या रोखपुस्तकातील व बँक पासबुक/बँक विवरणपत्रातील अखेरच्या शिलकेचा अचुक ताळमेळ घेवून अनुपालन सादर करावे.

9) <u>शासन अनुदाने व इतर निधी</u> :-

सामान्य निधी वगळता विविध योजनांवरील शासन अनुदाने, स्थानिक संस्था कर, वृक्ष निधी, वेतन राखीव निधी, कर्ज निवारण निधी, अनामत/ठेव रक्कम, रोड कटींग चार्जेस, अल्पबचत इ.साठी स्वतंत्र बँक खाते व रोखपुस्तक ठेवले असून खाजगी सनदी लेखापालाकडून त्यांचे वर्षअखेर ताळमेळाद्वारे तफावतीचा तपशील शोधून काढल्याचे सनदी लेखापालाने मनपास सादर केलेल्या वित्तीय विवरणपत्रांवरुन दिसून येते. परंतु रोखपुस्तकामध्ये ताळमेळाच्या नोंदी व त्यावर सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या घेतलेल्या नाहीत. बँक खात्यामधील प्रत्येक नोंद रोखपुस्तकात येणे आवश्यक असून दोन्हीमधील तफावतीची नियमित तपासणी व निराकरण होत असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे रकमांचा अपहार, फसवणूक टाळण्याच्या दृष्टीने ताळमेळाची संपूर्ण कार्यवाही करण्यात आलेली नाही. सबब त्याची परिपूर्ण अंमलबजावणी करुन अनुपालन सादर करावे.

I.H.S.D.P. (Integrated Housing and Slum Development Programme )
दिनांक 31.03.2015 अखेर

| रोख पुस्तक भाग क्र. | बँकेचे नांव व शाखा/ खाते क्रमांक | खातेपुस्तकातील/बँक विवरणपत्रातील दि. 31.3.2015 रोजी शिल्लक | रोखपुस्तकातील दि.31.3.2015 रोजी अखेरची शिल्लक | ताळमेळ पत्रकानुसार रोखपुस्तकातील अखेरची शिल्लक (सनदी लेखापालाने तयार केलेले) | ताळमेळ पत्रकानुसार खातेपुस्तकातील शिल्लक (सनदी लेखापालाने तयार केलेले) | फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PNB (IHSDP) | 15850460.93 | 15174254.63 | 15373122.93 | 15850460.93 | 676206.30 |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Chandrapur A/c.No. 1434000108156410 | | | | | |

(रोखपुस्तक व बँक खातेपुस्तकातील अखेरच्या शिलकेतील तफावत - रु.676206.30 (रकाना क्र.3-4))

तसेच वटविल्या गेलेल्या धनादेशाचा न वटविल्या गेलेल्या धनादेशात समावेश करुन ताळमेळ पत्रकात दाखविण्यात आला.

| | | | |
|---|---|---|---|
| Cheque issued But not presented into Bank | | (+) 477338.00 | |
| Total As per Bank Pass Book Balance | | 15850460.93 | |

Details of Cheques issued but not Presented into Bank as below :-

| Sr.No. | Cheque No. | Dated | Amount | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | 227225 | 28.8.2014 | 60000 | Cheque clearing on dated 2.9.2014 |
| 2 | 227230 | 28.8.2014 | 60000 | |
| 3 | 674678 | 31.3.2015 | 25334 | |
| 4 | 674679 | 31.3.2015 | 25334 | |
| 5 | 674680 | 31.3.2015 | 25334 | |
| 6 | 674681 | 31.3.2015 | 25334 | |
| 7 | 674682 | 31.3.2015 | 25334 | |
| 8 | 674683 | 31.3.2015 | 25334 | |
| 9 | 674684 | 31.3.2015 | 25334 | |
| 10 | 674685 | 31.3.2015 | 60000 | |
| 11 | 674686 | 31.3.2015 | 60000 | |
| 12 | 674687 | 31.3.2015 | 60000 | |
| | | TOTAL | 477338 | |

अ.क्र.1 वरील धनादेश हा बँक खात्यातून दि.2.9.14 रोजी वटविल्या गेला तरीसुध्दा हा धनादेश प्रलंबित धनादेशामध्ये समाविष्ठ केलेला आहे. त्यामुळे रोखपुस्तक व बँक पासबुक/बँक विवरणपत्रातील रकमेत तफावत दिसून येत असून ताळमेळपत्रकातसुध्दा तफावत आहे.

सदर ताळमेळ जुळत नसल्यामुळे महानगरपालिकेच्या सामान्य निधी व इतर निधींचे रकमेतील तफावत तपासणे आवश्यक आहे.

याबाबत आवश्यक तो मेळ घेण्यात यावा तसेच खालील बाबी तपासून दिनांक 31.3.2015 रोजीचा



Scanned by CamScanner

लेखापुस्तकातील व बँक पासबुकातील अखेरच्या शिल्लकेचा अचुक ताळमेळ घेवून अनुपालन दर्शवावे.

DATDSTM7301 (Ref No : 42, Hmm No : 83)

**64 महानगरपालिका चंद्रपूरमधील कोंडवाडा व निवडणूक विभागातील अभिलेखे लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध न होणेबाबत.**

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No: of Irregularities: 01

*लेखा शीर्ष :311 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 95*

| |
|---|
| ***मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 मधील कलम 6 नुसार लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करणे आवश्यक होते. तथापि, विहित मुदतीत अभिलेखे उपलब्ध झाले नाही.*** |

1) मनपा चंद्रपूर येथील कोंडवाडा विभागामार्फत सन 2014-15 करिता उज्वल गौरक्षण संस्था, चंद्रपूर यांना मोकाट जनावरे प्रतिबंधन अंतर्गत मनपामार्फत पकडलेल्या मोकाट जनावरांना सदरील संस्थेस सुपूर्द करण्याकरीता मनपा कार्यालयामार्फत पावती पुस्तकांचे वाटप करून जनावरांमार्फत मालकाकडून प्राप्त होणाऱ्या रकमांचा हिशोब ठेऊन मनपाचे पत्र क्र. चशमनपा/आयुक्त/आनि जा./2014/2473, दि.27/11/2014 नुसार मनपास प्रति जनावर वाहतूक खर्च रु.500/- (प्रथम वेळेस) तसेच जनावर एकापेक्षा जास्त वेळेस आल्यास वाहतूक खर्च रु.750/- सदरील संस्थेकडून मनपाच्या निधीत जमा करण्यास आदेशित केले आहे. तथापि, विभागाने अतिक्रमण विभागाकडून कार्यवाही केली असल्याचे कळविले व लेखापरीक्षणास पावती पुस्तक, दैनिक वसुली नोंदवही, पावती पुस्तक साठा व तदसंबंधित निविदा प्रक्रियेची नस्ती तपासणीस उपलब्ध केली नाही. त्यामुळे, मनपास सदरील कामाचा महसूल प्राप्त झाला किंवा कसे याबाबत शंकास्पद स्थिती निर्माण होतो.

2) चंद्रपूर महानगरपालीका, चंद्रपूर येथील निवडणूक विभागात सन 2014-15 मध्ये अंदाजपत्रकीय आकडेवारीनुसार रु. 101057/- खर्च केल्याचे दिसून आले. तथापि, अभिलेखे (संपूर्ण निविदा प्रकिया, कररनामा तसेच त्यासंबंधित इतर अभिलेखे ) लेखापरीक्षणारा उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे, सदरील अभिलेख्यांची तपासणी करता आली नाही. सबब रु. 101057/- हा खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

सदर आक्षेप उपरोक्त बाबतचे अभिलेखे अर्धसमासपत्र क्र.105, दि.26/07/2016, 106, दि.26/07/2016, 116, दि.02/08/2016 चे अनुषंगाने लेखापरीक्षणास उपलब्ध न करून दिल्यामुळे घेण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 74, Hmm No : 116)



Scanned by CamScanner

## 65 विवाह मंडळाची नोंदणी शुल्क व नुतनीकरणाची तसेच विवाह नोंदणी शुल्काची रक्कम शासनाकडे जमा न करणे.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 0 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

| |
|---|
| महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 3 नुसार निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील विवाह मंडळे यांची नमुना 3 मध्ये नोंदणी व नुतनीकरणासाठी अर्ज सादर करुन अर्जासोबत रु. 5,000/- फी प्राप्त करुन घेणे आवश्यक असून नमुना-ह मध्ये नोंदवही ठेऊन विवाह मंडळाची नोंद घेण्याबाबत स्पष्ट निर्देश आहेत. असे असतांनाही चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील सन 2013-14 अखेरपर्यंत विवाह मंडळाची नोंदणी व नुतनीकरण शुल्क, वसुलीची नोंदवही नमुना-ह लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणे तसेच प्राप्त रक्कम शासनाकडे जमा न करणे प्रकरणी झालेली अनियमितता. |

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 नुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. का-13/रवका/ विवाह नोंदणी दिनांक 21/04/2008 अन्वये विवाह नोंदणी करण्याचे काम दिनांक 01 मे 2008 पासून नगरपालिका / महानगरपालिकाकडे हस्तांतरीत झालेले आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिका कार्यालयामार्फत विवाह नोंदणी व नुतनीकरणाची फी वसूल केली जात असून ती शासनाकडे जमा न करण्यात आल्याचे संबंधितांकडून सांगण्यात आले तथापि , प्राप्त रकमेचा अनुषंगाने सन 2014-15 चे अंदाजपत्रकात विवाह लेखा शिर्षाखाली प्रत्यक्ष जमा दिसून येत नाही.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 3 नुसार निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील विवाह मंडळे यांची नमुना अ व नोंदणी मध्ये नुतनीकरणासाठी अर्ज सादर करतांना अर्जासोबत रु. 5000/- शुल्क प्राप्त करुन घेणे आवश्यक असून नमुना – ह नोंदवहीत विवाह मंडळाची नोंद घेण्याबाबत स्पष्ट निर्देश आहेत.

याचप्रकारे विवाह नोंदणीचे काम दि. 01.05.2008 पासून मनपा मार्फत होत असून त्यासाठी मनपाकडे शुल्क जमा होत असते. वरील दोन्ही विषयावरील जमा महसूल राज्य शासनाकडे कोषागारामार्फत जमा होणे आवश्यक आहे. सन 2014-15 मध्ये विवाह नोंदणीसाठी जमा झालेल्या शुल्काची रक्कम रु. 89050/- शासनाकडे जमा करण्यात आली नसल्याचे संबंधीताकडून सांगण्यात आले. तसेच विवाह मंडळ नोंदणीची आकडेवारी प्राप्त झाली नाही. सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 102 दि. 21.07.2016 चे अनुषंगाने आक्षेप नोंदविण्यापर्यंत अभिलेख तपासणीस प्राप्त झाले नाही.

उपरोक्त रकमा शासनाकडे जमा न करणे तसेच शासन निधी शासकीय लेख्याबाहेर ठेवणे ही गंभीर स्वरुपाची अनियमितता आहे. तरी उचित कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

DATPMPM5901 (Ref No : 57, Hmm No : 102)



Scanned by CamScanner

.66 प्रदानाची रक्कम सामान्य रोखपुस्तकात कमी नोंदविणे तथा वसुलीची रक्कम म.न.पा. निधीत काही प्रकरणी कमी जमा करणे व काही प्रकरणी विलंबाने जमा करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 15200.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4500.00/-

| |
|---|
| 1. म.न.पा. ने राष्ट्रीय महानगरपालिका क्र. 30.30 मध्ये नमूदनुसार रोखपुस्तकातील नोंदींचा बँकेच्या विवरणाशी मेळ न घेतल्यामुळे रोखपुस्तकातील अखेरच्या शिलका योग्य असल्याबाबत खात्री करता आली नाही.2. स्वच्छता विभागामार्फत दररोज वसूल होणारी रक्कम पर्यवेक्षकीय अधिकाऱ्याचे आवश्यक ते नियंत्रण नसल्यामुळे म.न.पा. निधीत कमी जमा करण्यात आलेली आहे.3. स्वच्छता विभागामार्फत दररोज वसूल होणारी रक्कम पर्यवेक्षकीय अधिकाऱ्याचे आवश्यक ते नियंत्रण नसल्यामुळे विलंबाने म.न.पा. निधीत जमा करण्यात येत आहे.4. रोखपुस्तकमध्ये नोंदविलेली रक्कम व प्रदान रक्कम यामध्ये रु. 500/- ची तफावत आढळून आली आहे. |

1. प्रमाणक क्रमांक - 2177 दिनांक 31.3.2015 रक्कम - रु. 4,535/-

मनपा चंद्रपूर येथील सन 2014-15 चे लेखापरीक्षणादरम्यान म.न.पा. ने आर्थिक वर्षात रोखपुस्तकात नोंदविलेल्या खर्चाच्या नोंदी प्रमाणकांशी रेखांकन करत असताना लेखा विभागाने मे. साईकृपा ट्रॅक्टर, चंद्रपूर यांना अग्निशमन विभागातील वाहन क्र. MH 31-7491 व MH 31-9491 चे किरकोळ दुरुस्ती खर्चाचे रु. 4,535/- धनादेश क्रमांक 747630 दिनांक 31 .03.2015 अन्वये उपरोक्त प्रमाणकान्वये प्रदान केलेले आहे. तथापि सदर खर्चाची सामान्य रोखपुस्तकातील पृष्ठ क्र. 32 वर रु. 3 ,430/- प्रदान केल्याची नोंद घेतलेली असल्याचे निदर्शनास आले. परिणामी रोखपुस्तकेत रु. 1,100/- ची कमी रकमेची नोंद घेतल्या गेलेली आहे व तेवढ्याच रकमेची रोखपुस्तिकेतील अखेरच्या शिलकेत वाढ झालेली आहे.

सदर तफावतीबाबत म.न.पा. ने राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमपुस्तिकेतील परि क्र. 30.30 मध्ये नमूदनुसार मनपातील संबंधित (लेखा) विभागाने नमुना GEN-3 मध्ये प्रदानाची नोंदवही ठेऊन सदर परिच्छेदामध्ये विहीत केलेल्या तक्ता क्र. 30.11 मध्ये दर महिन्याअखेर प्रदान केलेल्या रकमेचा बँकेशी ताळमेळ घेणे आवश्यक आहे. म.न.पा. ने सदर कार्यवाही केलेली नसल्यामुळे सदर तफावतीबाबत कमी-जास्त प्रदानाच्या रकमेबाबत खातरजमा करता आली नाही. त्याचप्रमाणे रोखपुस्तकातील नोंदवहीत नोंद असलेली अखेरची शिल्लक योग्य व उचित असल्याबाबत तशी अंतिम निश्चिती झाली नाही.

2. मनपा चंद्रपूर येथील सन 2014-2015 मध्ये स्वच्छता विभागातील झोन क्र. 2(अ) मधील स्वच्छता शाखेने



Scanned by CamScanner

दुकानांचा (आस्थापना) व्यवसाय परवाना फी शुल्क वसुलीबाबत श्री. अतुल वसंतराव बुरडकर यांचे मे. वसंत सा मिल व लाकडी वखारकरिता रु. 5,000/- पावती बुक क्र. 388 पावती क्रमांक 38709 दिनांक 31.03.2015 अन्वये व्यवसाय परवाना फी / शुल्क वसूल केले. सदर वसुलीच्या पावतीची नोंद विभागाचे दैनिक जमा रकमांची वसुली नोंदवहीमध्ये फक्त रु. 500/- प्राप्तीबाबत नोंद देऊन त्यांचा भरणा चलन क्र. 2755, दि. 31.03.2015 अन्वये एकत्रित रक्कम रु. 2,06,450/- चा रोखपालाकडे भरणा करण्यात येऊन संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांनी रु. 4,500/- चा कमी भरणा म.न.पा. निधी करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

सदर वसूल केलेल्या रकमेपैकी रु. 4,500/- चा म.न.पा. निधीत कमी जमा केली आहे. विभागाद्वारे दैनंदिन वसूल होणाऱ्या रकमांची पावत्यानिहाय एकूण बेरीज करून त्या पर्यवेक्षकीय अधिकाऱ्याने यथोचित पडताळूनच दैनिक जमा नोंदवहीत नोंदवून स्वाक्षरीसह त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी रोखपालाकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम कमी जमा केल्या गेल्यामुळे त्या दिवशीचे जमा रकमांवर योग्य ते नियंत्रण ठेवले न गेल्यामुळे अथवा हेतूपुरस्सर दुर्लक्ष करून त्याचा गैरवापर केल्या जाऊन अपहार झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. मनपा चंद्रपूर येथील सन 2014-15 मध्ये स्वच्छता विभागातील झोन क्र. 2(ब) मधील स्वच्छता शाखेने दि. 20.03.2015 ला पावती क्र. 34440 ते 34451 चे अनुषंगाने व्यवसाय परवाना फीबाबतची एकूण रक्कम रुपये 7,100/- व दिनांक 25.03.2015 ला बांधकाम साहित्य रस्त्यावर पडून असल्याबाबतची दंड वसूली रु. 2,000/- असे एकूण रुपये 9,100/- चलन क्रमांक 2688 नुसार म.न.पा. निधीत जमा करण्यास रोखपालाकडे सुपूर्द केले. दिनांक 20.03.2015 ला वसूल केलेली रक्कम रु. 7,100/- राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमपुस्तिका मधील प्रकरण 5 चे परिच्छेद 5.7(b) मध्ये नमूदनुसार वसुलीचे दिवशी किंवा दुसरे कामाचे दिवशी त्वरित रोखपालाकडे / बँकेमध्ये जमा करणे आवश्यक आहे. सदर वर्षातील कॅलेंडरचे अवलोकन केले असता दिनांक 21.03.2015 ला चौथा शनिवार व दिनांक 22.03.2015 ला रविवार येत असल्यामुळे वसुलीची रक्कम दिनांक 25.03.2015 ला जमा करण्यात आल्यामुळे वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्याने स्वतःजवळ बाळगली असून तिचा दोन दिवस वापर केलेला आहे. परिणामी सदर रकमेचा म.न.पा. ला आवश्यक व तातडीचे कामाकरिता विनियोग करता आला नाही. त्याचप्रमाणे दररोज वसूल होणारी रक्कम विनाविलंब म.न.पा. निधी जमा करणेबाबत स्वच्छता निरीक्षकाचेसुद्धा आवश्यक ते नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होते.

4. (DATSAJF8301)

चंद्रपूर महानगरपालीकेच्या सन 2014-15 मधील निवडक महिना माहे मार्च 2015 चे लेखापरीक्षणादरम्यान रेखांकन करतांना रोखपुस्तकामध्ये नोंदविलेली व प्रदान रक्कम यामध्ये खालील तफावत आढळून आली.

जनरल कॅशबुक क्र. 3, सन 2014-15

दिनांक 16.02.2015 ते 30.03.2015

पृष्ठ क्र. 38

उपरोक्त रोखपुस्तकमध्ये प्रमाणक क्र. 1754 ची रक्कम रु. 1,32,411/- नोंदविलेली आहे व प्रत्यक्ष प्रमाणकाची रक्कम रु. 1,32,911/- अशी आहे. म्हणजेच प्रदान रक्कम व रोखपुस्तकामध्ये नोंदविलेली रक्कम यामध्ये रु. 500/- ची तफावत आढळून आली आहे.

यावरून असे निदर्शनास येते कि, महानगरपालिकेच्या खाती जेवढी प्रदान रक्कम नोंदविलेली आहे त्यापेक्षा रु. 500/- नी जादा प्रदान करण्यात आले आहे.



Scanned by CamScanner

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 06 दि. 05.032013 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून कोणतेही समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदवीण्यात येत आहे.

DATPVKM6101 (Ref No : 58, Hmm No : 06)

## *67 पंचायत समितीकडून थेट मनपा शाळांना प्राप्त अनुदानातून विद्यार्थ्यांची मापे न घेता शिवलेल्या गणवेशावरील खर्चाबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 02

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 316380.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 316380.00/-

***विद्यार्थ्यांची मापे न घेताच गणवेशासाठी कापड खरेदी व शिलाई वर खर्च दर्शविण्यात आला. मुख्याध्यापकांकडील बँक खात्यामध्ये अनुदानाची रक्कम पंचायत समितीकडून थेट जमा होत असून कोणतेही अनुदान अथवा आदेश पत्र या संबंधाने प्राप्त होत नाही.***

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर अंतर्गत सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळांना, शाळेतील विद्यार्थांना (मुला-मुलींना) गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून प्रत्येक वर्षी अनुदान प्राप्त होते. सन 2014-15 मध्ये प्राप्त अनुदानातून गणवेशासाठी कापड खरेदी व शिलाई यांसाठी खालील प्रमाणे खर्च केल्याचे दिसून आले.

(रक्कमा रुपयांत)

| क्र. | शाळेचे नाव | खर्च |
|---|---|---|
| 1 | महात्मा ज्योतिबा फुले प्राथमीक शाळा, घुटकाळा वार्ड. | 7,800 |
| 2 | सरदार पटेल कन्या प्राथमीक शाळा, ढोर दवाखाना नगीनाबाग. | 4,600 |
| 3 | महात्मा गांधी कन्या प्राथमीक शाळा, रैयतवारी वार्ड. | 15,200 |
| 4 | मौलाना आझाद उर्दू प्राथमीक शाळा, रैयतवारी वार्ड. | 4,400 |
| 5 | महर्षी अण्णासाहेब कर्वे कन्या प्राथमीक शाळा, बाबूपेठ वार्ड. | 12,200 |
| 8 | सरोजिनी देवी नायडू कन्या प्राथमीक शाळा, महाकाली कॉलरी. | 13,800 |
| 9 | महाकाली कॉलरी प्राथमीक शाळा, महाकाली कॉलरी. | 13,000 |
| 10 | चक्रवर्ती राजगोपालचारी प्राथमीक शाळा, भानापेठ वार्ड. | 6,600 |
| 11 | डॉ. राजेन्द्रप्रसाद प्राथमीक शाळा, भानापेठ वार्ड. | 7,600 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 13 | पंडीत जवाहरलाल नेहरू प्राथमीक शाळा, ईंदिरा नगर वार्ड. | 32,600 |
| 14 | लोकमान्य टिळक प्राथमीक शाळा, काळाराम मंदिर समाधी वार्ड. | 3,400 |
| 16 | शहीद भगतसिंग कन्या प्राथमीक शाळा, भिवापूर वार्ड. | 14,400 |
| 17 | लालबहादूर शास्त्री प्राथमीक शाळा, भिवापूर वार्ड. | 9,600 |
| 19 | कर्मवीर कन्नमवार प्राथमीक शाळा, शास्त्री नगर वार्ड. | 14,400 |
| 20 | नरकेसरी अभ्यंकर प्राथमीक शाळा, बालाजी वार्ड. | 8,780 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमीक शाळा, घुटकाळा वार्ड. | 8,800 |
| 23 | सरदार पटेल प्राथमीक शाळा, जटपुरा वार्ड. | 12,800 |
| 24 | रामचंद्रनगर हिंदी प्राथमीक शाळा, जटपुरा वार्ड. | 24,000 |
| 26 | दे. गो. तुकूम मराठी प्राथमीक शाळा, दे. गो. तुकूम वार्ड. | 8,000 |
| 27 | रैय्यतवारी कॉलरी मराठी प्राथमीक शाळा, इंडस्ट्रीअल वार्ड. | 22,400 |
| 28 | रैय्यतवारी कॉलरी तेलगु प्राथमीक शाळा, कॉलरी क्वार्टर. | 10,800 |
| 29 | भारतरत्न डॉ. भीमराव आंबेडकर प्राथमीक शाळा, लुंबीनीनगर वार्ड. | 30,200 |
| 30 | वडगाव प्राथमीक शाळा, वडगाव वार्ड. | 7,200 |
| 31 | सिव्हील तुकूम मराठी प्राथमीक शाळा, साईबाबा वार्ड. | 7,600 |
| 35 | वि. दा. सावरकर हिंदी प्राथमीक शाळा, लालपेठ कॉलरी वार्ड. | 11,600 |
| 36 | आचार्य कृपलानी हिंदी प्राथमीक शाळा, गिरनार चौक. | 4,000 |
| 37 | डॉ. जाकिर हुसेन उर्दू प्राथमीक शाळा, दादमहाल वार्ड. | 600 |
| | एकूण | 3,16,380 |

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत –

1) मुख्याध्यापकांकडील बँक खात्यामध्ये अनुदानाची रक्कम पंचायत समितीकडून थेट जमा होत असून त्यासंबंधाने कोणतेही अनुदान वाटप आदेश पत्र या संबंधाने प्राप्त होत नाही. शिवाय अनुदान प्राप्त होण्याचे अर्थात पंचायत समितीकडून अनुदान वितरणाचे कोणतेही निश्चित वेळापत्रक दिसून येत नाही. काही शाळांना एका टप्प्यात तर काही शाळांना अधिकतम दोन टप्प्यात अनुदान प्राप्त झाल्याचे दिसून येते. महानगरपालिकेकडील शाळांना परस्पर प्राप्त अनुदानातून करण्यात आलेल्या खर्चावर महानगरपालिकेचे नियंत्रण शुन्य असल्याचे दिसते.

2) गणवेश शिवण्यापूर्वी विद्यार्थ्यांची मापे घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेअंतर्गत कोणत्याही शाळांच्या नस्तीमध्ये विद्यार्थ्यांची मापे घेतल्याचे दिसून आले नाही. माप न घेता शिवलेले गणवेश विद्यार्थांना आकाराच्या दृष्टीने उचित असल्याची खात्री होत नाही.

शिक्षण विभागाचे पत्र क्र. चंशमनपा/प्रशि/14/2016 दि. 13.04.2016 अन्वये प्राप्त माहितीनुसार मनपाच्या अंतर्गत सन 2014-15 मध्ये एकूण 40 शाळा होत्या. संबंधीत शाळांमध्ये एकूण विद्यार्थी पटसंख्या 2,119 व लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या अभिलेख्यानुसार एकूण खर्च रु. 3,16,380/- लक्षात घेता प्रती विद्यार्थी रु. 149/- खर्च झाला असे ढोबळमानाने दिसून येते. परंतु सदर दर बाजारभावाप्रमाणे वास्तविक नसल्याने शाळांमधील एकूण विद्यार्थ्यांपैकी मोजक्या विद्यार्थ्यांना हा लाभ दिला असल्याची शक्यता आहे. मनपाने यासंदर्भात पाठपुरावा करून



Scanned by CamScanner

सर्व विद्यार्थ्यांना गणवेशासाठी अनुदान प्राप्त करणे अपेक्षित होते परंतु तसे न झाल्यामुळे शासनाची गणवेश वाटपाची कल्याणकारी योजना फलश्रुत झाली नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATSAJF8301 (Ref No : 59, Hmm No : 17)

### 68 चंद्रपूर महानगरपालिकेअंतर्गत सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळांना, शाळा देखभाल दुरुस्तीसाठी पंचायत समितीकडून परस्पर प्राप्त होत असलेल्या अनुदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 03

*लेखा शीर्ष : 00 शासन निधी*

*अनियमितता कलम : ९इ*

| |
|---|
| *सन 2014-15 अखेर शाळांकडील कामाचा अखर्चित निधी रु. 1,01,700/- शासनखाती जमा झालेला नाही. काही शाळांनी प्राप्त अनुदानापैकी जादा खर्च केला असून उणे अनुदान शिल्लक आहे. खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर, यांचेकडून अनुदान खर्चाचे प्रयोजन, अनुदान वितरणाचे निकष, खर्चाच्या अटी व शर्ती याबाबत आदेश / पत्रे शाळांना किंवा मनपास निर्गमित न होता मुख्याध्यापकांच्या बँक खात्यावर थेट अनुदानाची रक्कम जमा करण्यात येते.* |

सन 2014-15 चे चंद्रपूर महानगरपालीकेअंतर्गत शिक्षण विभागाचे लेखापरीक्षणादरम्यान, चंद्रपूर शहर महानगरपलिका, चंद्रपूर अंतर्गत सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळांना, शाळा देखभाल दुरुस्तीसाठी पंचायत समिती चंद्रपूर यांचेकडून प्रत्येक वर्षी अनुदान प्राप्त झाल्याचे लक्षात आले. सन 2014-15 मधील अनुदान प्राप्त झालेल्या व तपासणीस उपलब्ध झालेल्या शाळांकडील प्राप्त अनुदान, खर्च व शिल्लक अनुदान याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| क्र. | शाळेचे नाव | प्राप्त अनुदान (रु.) | खर्च (रु.) | शिल्लक (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | महात्मा ज्योतिबा फुले प्राथमीक शाळा, घुटकाळा वार्ड. | 5,000 | 3,520 | 1,480 |
| 2 | महर्षी अण्णासाहेब कर्वे कन्या प्राथमीक शाळा, बाबूपेठ वार्ड. | 10,000 | 0 | 10,000 |
| 3 | महाकाली कॉलरी प्राथमीक शाळा, महाकाली कॉलरी. | 10,000 | 7,000 | 3,000 |
| 4 | चक्रवर्ती राजगोपालचारी प्राथमीक शाळा, भानापेठ वार्ड. | 10,000 | 0 | 10,000 |
| 5 | डॉ. राजेन्द्रप्रसाद प्राथमीक शाळा, भानापेठ वार्ड. | 10,000 | 6,000 | 4,000 |
| 6 | माता कस्तुरबा गांधी कन्या प्राथमीक शाळा, एन. ई. एल. वार्ड. | 5,000 | 800 | 4,200 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | लोकमान्य टिळक प्राथमीक शाळा, काळाराम मंदिर समाधी वार्ड. | 10,000 | 1,900 | 8,100 |
| 8 | कर्मवीर कन्नमवार प्राथमीक शाळा, शास्त्री नगर वार्ड. | 10,000 | 8,200 | 1,800 |
| 9 | सरदार पटेल प्राथमीक शाळा, जटपुरा वार्ड. | 10,000 | 5,127 | 4,873 |
| 10 | रामचंद्रनगर हिंदी प्राथमीक शाळा, जटपुरा वार्ड. | 20,000 | 18,100 | 1,900 |
| 11 | वडगाव प्राथमीक शाळा, वडगाव वार्ड. | 5,000 | 0 | 5,000 |
| 12 | सिव्हील तुकूम मराठी प्राथमीक शाळा, साईबाबा वार्ड. | 10,000 | 0 | 10,000 |
| 13 | शहीद अब्दुल हमीद उर्दू प्राथमीक शाळा, घुटकाळा वार्ड. | 10,000 | 0 | 10,000 |
| 14 | लालपेठ कॉलरी मराठी प्राथमीक शाळा, लालपेठ कॉलरी वार्ड. | 20,000 | 17,523 | 2,477 |
| 15 | लालपेठ कॉलरी तेलगु उच्च प्राथमीक शाळा, लालपेठ कॉलरी वार्ड. | 24,000 | 1,900 | 22,100 |
| 16 | वि. दा. सावरकर हिंदी प्राथमीक शाळा, लालपेठ कॉलरी वार्ड. | 20,000 | 17,230 | 2,770 |
| | | 1,89,000 | 87,300 | 1,01,700 |

1) शाळांकडील उर्वरित अखर्चित रक्कम पंचायत समितीला समर्पित / परत करणे आवश्यक होते. परंतु अखर्चित निधी रु. 1,01,700/- परत केल्याचे दिसून आले नाही. संबंधित शाळांना सदर शिल्लक अनुदान समर्पित करणे किंवा पुढील वर्षी वापरणे याबाबत कोणतेही निर्देश नाहीत. सदर शाळा मनपाचे प्रत्यक्ष नियंत्रणात असूनही उपरोक्त खर्चावर मनपातील शिक्षण विभागाने दुर्लक्ष केल्याचे दिसते. परिणामी शाळांच्या देखभाल दुरुस्तीवर वरीलप्रमाणे प्राप्त अनुदान वा मनपा निधीमधून या प्रकारे दुबार प्रदानाद्वारे गैर प्रकारची शक्यता नाकारता येत नाही.

2) याव्यतिरिक्त खालील शाळांनी प्राप्त अनुदानापैकी जादा खर्च केला असून उणे अनुदान शिल्लक आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | प्राप्त अनुदान (रु.) | खर्च (रु.) | शिल्लक रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 8 | सरोजिनी देवी नायडू कन्या प्राथमीक शाळा महाकाली कॉलरी | 12,400 | 13,800 | -1,400 |
| 13 | पंडीत जवाहरलाल नेहरू प्राथमीक शाळा इंदिरा नगर वार्ड | 26,400 | 32,600 | -6,200 |
| 17 | लालबहादूर शास्त्री प्राथमीक शाळा भिवापूर वार्ड | 5,000 | 96,00 | -4,600 |
| 20 | नरकेसरी अभ्यंकर प्राथमीक शाळा बाबाजी वार्ड | 8,000 | 8,780 | -780 |
| 28 | रैय्यतवारी कॉलरी तेलगु प्राथमीक शाळा कॉलरी क्वार्टर | 7,600 | 10,800 | -3,200 |
| 35 | वि. दा. सावरकर हिंदी प्राथमीक शाळा लालपेठ कॉलरी वार्ड | 9,600 | 11,600 | -2,000 |
| | एकूण | | | -18,180 |

3) मनपाच्या विविध शाळांच्या मुख्याध्यापकांच्या बँक खात्यांमध्ये अनुदानाच्या रकमा परस्पर जमा होत असून व त्यासंदर्भात खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर, यांचेकडून अनुदान खर्चाचे प्रयोजन, अनुदान वितरणाचे निकष, खर्चाच्या अटी व शर्ती याबाबत आदेश / पत्रे शाळांना किंवा मनपास निर्गमित होत नाही. सदर बाब वित्तीय नियंत्रणाच्या दृष्टीने अयोग्य असून जिल्हा परिषद प्रशासनाच्या निदर्शनासही आणून देणे जरूरीचे वाटते.

एकंदरीत अत्यंत मोघम पद्धतीने कोणत्याही वित्तीय नियंत्रणाशिवाय अनुदाने प्राप्त व खर्च होत आहेत.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 18 दि. 04.04.2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर



Scanned by CamScanner

करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSAJF8301 (Ref No : 60, Hmm No : 18)

## *69 क्रिडासत्र 2014-15 मध्ये विद्यार्थ्यांसाठी शेंगदाणा चिक्की खरेदीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :238 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 29700.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 29700.00/-

| |
|---|
| ***क्रिडासत्र 2014-15 मध्ये विद्यार्थ्यांना खाण्यासाठी शेंगदाणा चिक्की खरेदीच्या नस्तीमध्ये क्रिडासत्र आयोजनाचा कालावधी, विद्यार्थी संख्या नमूद नाही. चिक्कीच्या नगाच्या वजनानुसार दराची शहानिशा न करता मोघम पुरवठा आदेश देण्यात आला.*** |

<u>प्रमाणक क्र. 2112, दिनांक – 31.03.2015, प्रदान रक्कम – 29,700/-.</u>

चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरतर्फे आयोजित क्रिडासत्र 2014-15 मध्ये चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर, क्रमांक-चंशमनपा/प्रशि/621/2015 दिनांक 07.01.2015 अन्वये मे. आनंद ट्रेडर्स, चंद्रपूर, यांना शेंगदाणा चिक्की प्रती नग 3,000 (तीन हजार फक्त) रु.9.90 पैसे प्रती नग प्रमाणे कोहिनूर मैदानावर स्वखर्चाने पुरविण्याचा आदेश देण्यात आला होता.

अ) सन 2014-15 चे क्रिडासत्र कोणत्या तारखांमध्ये आयोजित करण्यात आले होते हे संबंधीत नस्तीत नमूद नाही.

ब) नस्तीची तपासणी केली असता क्रिडासत्रात एकूण किती विद्यार्थी सहभागी होते याची नोंद आढळून आली नाही. एकूण विद्यार्थी संख्या लक्षात न घेता 3,000 नग चिक्कीची खरेदी केल्याचे दिसून आले.

क) शेंगदाणा चिक्की खरेदीसाठी दरपत्रके प्रसिध्द करतेवेळी शेंगदाणा चिक्की प्रती नगाचे वजन नमूद करणे आवश्यक आहे. मे. आनंद ट्रेडर्स, मे. नवाज कॅन्फेक्सरी, मे. श्री. बालाजी किराणा यांचेकडून जी दरपत्रके प्राप्त झाली त्यामध्ये चिक्कीचा प्रती नग दर नमूद आहे, परंतु प्रत्येक नगाचे वजन किती आहे ते नमूद नाही. तरी वजनानुसार दराची शहानिशा न करता चिक्कीच्या नगाच्या परिमाणाचा (वजनाचा) उल्लेख न करता मे. आनंद ट्रेडर्स यांना मोघम पुरवठा आदेश देण्यात आला व एकूण रु. 29,700/- ची शेंगदाणा चिक्की खरेदी करण्यात आली.



Scanned by CamScanner

ड) विद्यार्थांना चिक्की पुरविण्यात आल्याची नोंद नस्तीत दिसून आली नाही. त्यामुळे मुलांना चिक्की प्राप्त झाली याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

तरी शेंगदाणा चिक्की खरेदी करतांना वित्तीय औचित्याचे उल्लंघन झाले असे लेखापरीक्षणाचे मत आहे. सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 31 दि. 18/04/2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून विहित मुदतीत अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSAJF8301 (Ref No : 61, Hmm No : 31)

***70 मनपा शालेय विद्यार्थांसाठी बुटे, मोजे व दफ्तरची खरेदी शैक्षणिक सत्राच्या मध्यावधीत करून आकस्मिक खर्चाच्या लेखाशिर्षातून केलेल्या खरेदीतील अनियमिततेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :240 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 688532.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 688532.00/-

| |
|---|
| ***सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरी शिवाय उपायुक्त यांच्या आदेशान्वये शैक्षणिक सत्राच्या मध्यावधीत साहित्याची खरेदी अनियमितपणे करण्यात आली. साहित्याचे वाटप दिनांकामध्ये संदिग्धता निर्माण असणे.*** |

प्रमाणक क्र.22, दिनांक - 03/12/2014, रु.297500/-

प्रमाणक क्र.23, दिनांक - 03/12/2014, रु.391032/-

मनपा, चंद्रपूरच्या शिक्षण विभागाने लेखाशीर्ष "240" अंतर्गत विद्यार्थांसाठी बुटे, मोजे व दफ्तरची खरेदी (रु. 688532/- ) शैक्षणिक सत्राच्या मध्यावधीत केली आहे.

दुसऱ्यांदा वर्तमान पत्रामध्ये निविदा प्रकाशित केल्यानंतर प्राप्त पाच निविदांपैकी निम्नतम निविदेची निवड करून वाटाघाटीनंतर (दि.22/08/2014) मे. अरिहंत ट्रेडर्स, चंद्रपूर यांना दि. 01/09/2014 च्या पत्रान्वये बूट, मोजे व दफ्तर पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले.

यावरील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत. -

1) वर्ग 1 ते 7 मधील मनपा शालेय विद्यार्थ्यांकरिता बिना मापाचे दफ्तर लहान (संख्या-1016



Scanned by CamScanner

नग) व मोठे (संख्या-1100 नग) असे अनुक्रमे रु.125 व रु.155 प्रति नगप्रमाणे स्थायी समितीच्या परवानगीशिवाय खरेदी केली असल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे बूट वर्ग 1 ते 4 मधील विद्यार्थ्यांकरिता रु. 150/- प्रति जोडी व वर्ग 1 ते 7 मधील विद्यार्थ्यांकरिता रु.165/- प्रति जोडीप्रमाणे अनुक्रमे 1016 व 1100 खरेदी करण्यात आले. तसेच मोजे रु.27/- प्रति जोडी प्रमाणे 2116 नग खरेदी करण्यात आले.

सदरची खरेदी धोरणात्मक बाब असून सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरी शिवाय उपायुक्त यांच्या आदेशान्वये शैक्षणिक सत्राच्या मध्यावधीत अनियमितपणे करण्यात आली, असे दिसून येते.

2) सदरील संपूर्ण साहित्य जा.क्र.चंशमनपा/प्रअशि/189/2014 व चंशमनपा/प्रअशि/190/2014, दि.01/09/2014 अन्वये मे. अरिहंत ट्रेडर्स, चंद्रपूर यांना स्वखर्चाने 10 दिवसाच्या आत म्हणजे दि.10/09/2014 पर्यंत पुरवठा करणे बंधनकारक होते. प्रत्यक्षात दि. 05/11/2014 ला सदरील साहित्य प्राप्त झाल्याचे साठा नोंदवहीवरील प्रशासन अधिकारी (शिक्षण), मनपा चंद्रपूर यांच्या सहीवरुन आढळून आले. तथापि, दि.12/09/2014 पासून राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसहिंता सुरु झाल्यामुळे एकूण साहित्य प्राप्त होण्यापूर्वीच्या दिनाकांना नगरपरिषदेच्या इतर शाळांना या साहित्याचे वाटप दर्शविण्यात आले.

उदाहरण -

| अ.क्र. | शाळेचे नाव | वाटपाचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | राजे धर्मराव प्रा.शाळा | 15/10/2014 | मनपास साहित्याचा मूळ पुरवठा दि.05/11/2014 रोजी करण्यात आला. |
| 2 | राजेंद्र प्रसाद प्रा. शाळा व इतर शाळा | 13/09/2014 | |
| 3 | नेताजी शुभाषचंद्र प्रा. शाळा व इतर 14 शाळा | 17/10/2014 | |

याचप्रमाणे तारखांमध्ये संदिग्धता असल्याने शैक्षणिक सत्राच्या मध्यावधीत विद्यार्थ्यांच्या पायाची मापे न घेता मोघमपणे आकस्मिकरित्या खर्च झाल्याचे दर्शविल्यामुळे साहित्याची प्रत्यक्ष प्राप्त झाले किंवा कसे याबाबत शक्यता निर्माण होते.

या संदर्भात केलेल्या अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने विभागाने समर्थनीय खुलासा न केल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

DLFSPPM8501 (Ref No : 73, Hmm No : 117)

# 71 अग्निशमन विभागांतर्गत चार ट्रॅक्टर खरेदीतील अनियमितता.

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष:165 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 2157060.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2157060.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 52500.00/-

***अग्निशमन विभागांतर्गत ट्रॅक्टर खरेदी केले असल्यास ट्रॅक्टरचा पुरवठा विहित मुदतीत न करता 105 दिवस विलंबाने केला. ट्रॅक्टर खरेदीची नोंद जंगम व मालमत्ता नोंदवहीत घेतली गेली नाही, तसेच ट्रॅक्टरचा विमा शासकीय विमा निधीकडे किंवा कुठल्याही विमा संचालनालयाकडे काढला असल्याचे आढळून आले नाही.***

प्रमाणक क्र. 2077 दि. 31/03/2015 रक्कम. 2157060/-

कंत्राटदार- नविन ऑटोमोबाईल्स, चंद्रपूर

अग्निशमन विभागांतर्गत सन 2014-2015 चे ट्रॅक्टर खरेदीचे अभिलेखे / नस्ती तपासले असता, खालील अनियमितता आढळून येते.

1. आदेश क्रमांक - चंशमनपा/अग्निशमन/2014/2708 दि.12/12/2014 नुसार चार ट्रॅक्टरचा पुरवठा 15 दिवसाच्या आत महानगरपालिकेला करावा असे नमूद असून करारनाम्यातील अटीशर्ती क्र.01 नुसार वेळेत पुरवठा न केल्यास प्रती दिवस रु.500/- दंड भरण्याचे पुरवठादाराने मान्य केले आहे. ती ट्रॅक्टरचा पुरवठा 27/03/2015 म्हणजेच 105 दिवस विलंबाने झाल्याचे नस्तीवरून दिसून येते. म्हणजेच करारनाम्यानुसार प्रती दिवस रु.500 प्रमाणे 105 दिवसांकरिता 52500/- विलंबाने वसूलपात्र ठरतात.

2. ट्रॅक्टरचा विमा शासकीय विमा निधीकडे किंवा कुठल्याही विमा संचालनालयाकडे काढला असल्याबाबतचे विमापत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही.

3. जंगम मालमत्ता नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही, त्यामुळे ट्रॅक्टर खरेदीची नोंद जंगम व मालमत्ता नोंदवहीत घेतली गेली किंवा नाही ते तपासता आले नाही.



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

वसूलपात्र रु.-52500/-

यासंदर्भात जारी केलेले मूळ अर्धसमास क्र. 71 दि. 04.06.2016 खुलाश्यासह प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DLFSRWF8901 (Ref No : 66, Hmm No : 71)

*72 मनपा हद्दीतील सार्वजनिक विहिरीतील उपसा करुन गाळ, कचरा, साफसफाईतील अनियमिततेबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 04

*लेखा शीर्ष : 163 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 136482.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 136482.00/-

***मनपा हद्दीतील सार्वजनिक विहिरीतील उपसा करुन गाळ,कचरा,साफसफाईच्या कामाच्या प्राकलनास कोणत्याही सक्षम प्रधिकाऱ्याची मंजुरी घेतली नाही. कामाचे मोजमाप पुस्तकात न नोंदविता नियमबाह्य प्रदान करण्यात आले आहे.***

प्रमाणक क्र. 1956 दि. 27/03/2015 रक्कम. 87942/-

प्रमाणक क्र. 2116 दि. 31/03/2015 रक्कम. 48540/-

कंत्राटदार- श्री. गराजी कांवळे

अग्निशमन विभागांतर्गत सन 2014-2015 चे सार्वजनिक विहिरी साफसफाईचे अभिलेखे / नस्ती तपासले असता, खालील अनियमितता आढळून येते.

1. कामाच्या प्राकलनास कोणत्याही सक्षम प्रधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

2. झालेल्या प्राकलनास मोजमापे मोजमाप पुस्तकात नोंदवून मुल्यांकन केल्यानंतरच कंत्राटदारास प्रदान करावयाचे असतांना नियमबाह्यपणे प्रदान केल्याचे आढळले.



Scanned by CamScanner

3. निविदा सुचनेनंतर प्राप्त व मंजूर दरपत्रकानुसार कंत्राटदारास प्रत्येक विहिरीच्या स्वच्छतेबाबत कार्यादेश देवून कामे करण्यात आलेली नाही. तसेच दिलेल्या कार्यादेशामध्ये स्वच्छता करावयाच्या विहिरींचे नावे सुद्धा नमूद केले नाही. यावरून ज्या विहिरीची स्वच्छता करावयाची होती त्याच विहिरीचे कार्यादेश देण्यात आल्याची खात्री झाली नाही.

4. सदस्या सकीना अन्सारी यांचे दि. 03/04/2014 चे पत्रानुसार विहिरींची स्वच्छता करावयाची होती असे आढळले मात्र मा. सदस्यांनी सुचविलेल्या विहिरीची तपासणी महानगरपालिकेने तांत्रिक अधिकाऱ्याकडून करवून घेवून स्थळदर्शक अहवाल प्राप्त केलेला नाही.

वरील 1 ते 4 अनियमिततेमुळे उपरोक्त प्रमाणकाद्वारे करण्यात आलेले प्रदान मोघम काम दर्शवून झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

यासंदर्भात जारी केलेले मूळ अर्धसमास क्र. 72 दि. 04.06.2016 खुलाश्यासह प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DLFSRWF8901 (Ref No : 67, Hmm No : 72)

## *73 मौल्यवान वस्तू अथवा रोख हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र न घेणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

*मुंबई वित्तीय नियम 1959 च्या नियम क्र. 51 नुसार शासनाच्या/ संस्थेच्या, रोख रकमा/ मौल्यवान वस्तू हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा ठेव जमा करणे, विमा उतरविणे अथवा क्षतीपुर्ती बंधपत्र घेणे आवश्यक असतांना मनपा चंद्रपूर येथील अशा कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र, सुरक्षा ठेव न घेतल्याची अनियमितता आढळून आली.*

मुंबई वित्तीय नियम 1959 च्या नियम क्र. 51 नुसार रोखपाल, स्टोअर किपर, रोख संग्राहक इ.



Scanned by CamScanner

कर्मचाऱ्यांना 'रोख रकमा' किंवा 'मुद्रांक शुल्क' यांसारख्या मौल्यवान वस्तू हाताळाव्या लागतात करिता यांसारख्या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा ठेव, विमा काढणे , क्षतीपुर्ती बंधपत्र घेणे आवश्यक आहेत. चंद्रपूर मनपा कर्मचाऱ्यांनी सन 2013-14 मध्ये एकूण 51,30,25,683/- एवढी रक्कम हाताळल्याचे दिसून आले आहे.

अंदाजपत्रकातील आकडेवारी नुसार सन 2014-15 मध्ये कर व इतर उत्पन्नापोटी मनपाच्या विविध कर्मचाऱ्यामार्फत पुढीलप्रमाणे महसूल गोळा करण्यात आला.

| | |
|---|---|
| अ) महानगरपालिका कर व दर | - 43,87,75,854/- |
| क) म.न.पा. मालमत्ता मिळकतीपासूनचा महसूल | - 3,65,10,749/- |
| एकूण | - 47,52,86,603/- |

परंतु संबंधीतांकडून सुरक्षा रक्कम जमा केल्याचे अथवा रकमेचा विमा काढल्याचे तसेच क्षतीपुर्ती बंधपत्र घेतल्याचे दिसून आले नाही. ही गंभीर स्वरूपाची बाब आहे. तरी सदर बाबीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत असून योग्य कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

DLFSRWF8901 (Ref No : 68, Hmm No : 11)

## *74 स्थानिक संस्था कराची आकारणी बांधकामाच्या वास्तविक क्षेत्रफळाप्रमाणे होत नसल्याची अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 93*
आक्षेपाधीन रक्कम रु. 58998.00/-

| |
|---|
| *स्थानिक संस्था कराची आकारणी केल्याचे अभिलेखे उपलब्ध न केल्यामुळे स्थानिक संस्था कराची आकारणी बांधकामाच्या वास्तविक क्षेत्रफळाप्रमाणे न केल्याचे स्पष्ट होते. विवरणपत्र स्थानिक संस्था कर विभागाला दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत सादर करण्यात येत नाही. नोंदणीकृत बांधकाम व्यावसायिकांची यादी मनपाच्या स्थानिक संस्था कर विभागाकडे उपलब्ध नाही.* |

(1) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम (नगर विकास अधिसूचना क्र.स्था.सं.क.0209/प्र.क्र.65/09/नवि.34, दि.25 मार्च 2010) मधील नियम 9 नुसार महानगरपालिका हद्दीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणाऱ्या कोणत्याही बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदारास स्थानिक संस्था कराखाली महानगरपालिकेकडे नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका



Scanned by CamScanner

अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम 27(4) नुसार, एकतर शहराच्या बांधकामाकरिता किंवा व्यापाराकरिता आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा अधिनियमामध्ये दिलेल्या मानकांनुसार स्थानिक संस्था कराचे ठोस प्रदान करण्याचा पर्याय सुचविला आहे. चंद्रपूर महानगरपालिका येथे आदेश क्र.-चंशमनपा/स्था.सं.क.वि/1198/12, दि.25 जुलै 2012 नुसार बांधकाम कंत्राटदार यांना बांधकामाची परवानगी देते वेळी बिल्डींग प्लाननुसार बांधकामाच्या क्षेत्रफळाप्रमाणे स्थानिक संस्था कराची आकारणी करणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार महानगरपालिकेतील नगरविकास विभाग बांधकाम व्यावसायिकांकडून बांधकाम परवानगी शुल्क व स्थानिक संस्था कर एकत्रितपणे पावत्यादवारे वसूल करीत असल्याचे दिसून आले. परंतु बांधकाम क्षेत्रानुसार अशी, वसुली होत असल्याचे अभिलेखे तपासणीस पुरविण्यात आलेले नाही. खाली नमूद बांधकाम कंत्राटदार/ व्यापाऱ्यांकडून माहे मार्च 2015 मध्ये स्थानिक संस्था करापोटी रु. 58998/- एवढी रक्कम वसूल झाल्याचे नगररचना विभागाचे अभिलेख्यावरून दिसून आले. सदर कराची आकारणी बांधकामाच्या वास्तविक क्षेत्रफळाप्रमाणे झाली किंवा कसे हे स्पष्ट होऊ शकले नाही.

| अ.क्र. | पावती क्र. | दिनांक | बांधकाम कंत्राटदार | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 278/27792 | 09/03/2015 | रविकांत वामनराव जक्कुलवार | 24889 |
| 2 | 348/34717 | 19/03/2015 | नियोजित भारतीनगर हाउसिंग सोसायटी | 34113 |
| एकूण रक्कम | | | | 58998 |

(2) बांधकाम कंत्राटदार / बिल्डर्स यांना मनपाच्या नगररचना विभागाने बांधकामाची परवानगी देते वेळेस स्थानिक संस्था कराची अधिसूचनेत नमूद दरानुसार रक्कम वसूल करून त्याबाबतचे विवरणपत्र मनपाच्या स्थानिक संस्था कर विभागाला दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही क्र.-चंशमनपा/स्था.सं.क.वि/1198/12, दि.25 जुलै 2012 नुसार आदेशित केली असतांना सुद्धा विवरणपत्र स्थानिक संस्था कर विभागाला पुरविण्यात येत नसल्याचे कळविण्यात आले.

3) शहरात मोठ्या प्रमाणावर बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांच्या एकूण संख्येबाबत महानगरपालिकेने माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. (अर्धसमास पत्र क्र.10, दि. 15/03/2016) परंतु त्यांची स्थानिक संस्था करअंतर्गत नोंदणी झाल्याचे स्थानिक संस्था कर विभागाकडील अभिलेख्यात दिसून आले नाही. त्यांची सदर प्रयोजनाखालील नोंदणी नगररचना विभागाकडे झाली



Scanned by CamScanner

असावी असे स्थानिक संस्था कर विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांनी लेखापरीक्षणादरम्यान सांगितले. नगररचना विभागाकडे सुद्धा त्यांच्या नोंदणीचा अभिलेख उपलब्ध नाही. यावरून संबंधित बांधकाम व्यावसायिकांना नोंदणीपासून अनियमितपणे मुभा देण्यात आली हे स्पष्ट होते. लेखापरीक्षणाचे दिनांकास स्थानिक संस्था कर बंद असून सदर व्यावसायिक नोंदणी नोंदणी अभावी वार्षिक विवरणपत्रे मनपास सादर करणेबाबत पूर्वलक्षी प्रभावाने बाध्य नाहीत असे वाटते. परिणामी कर निर्धारणाअभावी बांधकाम परवानगीच्या वेळी निश्चित दराने वसूल झालेल्या स्थानिक संस्था कर व्यतिरिक्त लागू/थकीत स्थानिक संस्था कराची मनपाची हानी झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

उक्त अनियमिततेबाबत संबंधित विभागाला अर्धसमास पत्र क्र.10 दि.15/03/2016 ला निर्गमित करून कळविले असता याबाबतचे अनुपालन अद्याप लेखापरीक्षणास प्राप्त नसल्यामुळे सदरील परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 72, Enm No : 10)



Scanned by CamScanner

**<u>अनुपालन व पोच</u> :-** या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 2011 मधील कलम 10(1) तरतुदींनुसार हा अहवाल प्राप्त झाल्यापासुन चार महिन्यांचे आत आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांच्या स्वाक्षरीने पाठवावे. तत्पुर्वी हा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद करुन पोच पाठवावी.

उपसंचालक (मनपालेप),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद उपविभाग क्र.3,
औरंगाबाद

**प्रत अग्रेषित -**

1) मा. प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा) दोन, नागपूर.

2) मा. प्रधान सचिव-2 , नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

3) मा. विभागीय आयुक्त, नागपूर.

4) मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.

5) सहसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, रायगड भवन (2 प्रती).

6) उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद उपविभाग-3.

7) अभिलेख कक्ष, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद उपविभाग-3.

स्वाक्षरीत
उपसंचालक (मनपालेप),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद उपविभाग क्र.3,
औरंगाबाद



Scanned by CamScanner

## लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| अतुलकुमार भाऊराव वासनिक, सहाय्यक संचालक | 1, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 2, 23, 24, 28, 29, 30, 34, 35, 36, 37, 38, 39, 4, 40, 41, 42, 45, 5, 52, 53, 54, 55, 56, 58, 6, 7, 8, 9 |
| दिपक शंकरराव ठाकरे, लेखापरिक्षा अधिकारी | 3, 31, 32, 33, 49, 63 |
| विलास उदेभानजी बोधनकर, लेखापरिक्षा अधिकारी | 17, 18, 19, 20, 21, 46, 47, 48, 59, 60, 61 |
| श्री.प्रमोद माणिकराव पाटील, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 43, 44, 65 |
| प्रकाश वसंतराव कुंबलवार , सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 66 |
| यशवंत बाळकृष्ण ढोरे , सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 62 |
| स्नेहल अविनाश जवादे , कनिष्ठ लेखापरिक्षक | 57, 67, 68, 69 |
| शैलेंद्र प्रभाकर पुरी, कनिष्ठ लेखापरिक्षक | 22, 50, 51, 64, 70, 74 |
| शुभांगी रामरावजी व-हाडे, कनिष्ठ लेखापरिक्षक | 25, 26, 27, 71, 72, 73 |



Scanned by CamScanner

## विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 31488742.00 | 132998.00 | 3120000.00 | ---- | 34741740.00 |
| 2 | 5 | 973052.00 | 120048.00 | ---- | ---- | 1093100.00 |
| 3 | 6 | ---- | ---- | 2330005.00 | ---- | 2330005.00 |
| 4 | 7 | 3245958.00 | 2573534.00 | ---- | ---- | 5819492.00 |
| 5 | 8 | 847461.00 | 181348.00 | ---- | ---- | 1028809.00 |
| 6 | 9 | ---- | 7714120.00 | ---- | ---- | 7714120.00 |
| 7 | 10 | 1390640.00 | 162000.00 | 650603.00 | ---- | 2203243.00 |
| 8 | 11 | ---- | 113735.00 | ---- | ---- | 113735.00 |
| 9 | 13 | ---- | ---- | ---- | ---- | 274007345.00 |
| 10 | 14 | ---- | 60000.00 | 6100000.00 | ---- | 67100000.00 |
| 11 | 15 | 5702617.00 | 517257.00 | ---- | ---- | 6219874.00 |
| 12 | 16 | 630401.00 | 100243.00 | ---- | ---- | 730644.00 |
| 13 | 17 | 626314.00 | 626314.00 | ---- | ---- | 18100000.00 |
| 14 | 18 | 109792.00 | 109792.00 | ---- | ---- | ---- |
| 15 | 21 | ---- | ---- | ---- | ---- | 277984.00 |
| 16 | 22 | 1627020.00 | ---- | ---- | ---- | 1627020.00 |
| 17 | 24 | ---- | ---- | ---- | ---- | 2050000.00 |
| 18 | 25 | ---- | 43445502.00 | ---- | ---- | 160625455.00 |
| 19 | 26 | ---- | 6298038.00 | ---- | ---- | 6298038.00 |
| 20 | 27 | 39697.00 | 39697.00 | ---- | ---- | ---- |
| 21 | 29 | 772796.00 | ---- | ---- | ---- | 772796.00 |
| 22 | 30 | 4564785.00 | 260526.00 | 1983948.00 | ---- | 4825311.00 |
| 23 | 32 | 9134.00 | 3147.00 | ---- | ---- | 9134.00 |
| 24 | 33 | ---- | 781031.00 | ---- | ---- | ---- |
| 25 | 34 | ---- | ---- | ---- | ---- | 67455840.00 |
| 26 | 35 | 68996933.00 | ---- | ---- | ---- | 68996933.00 |
| 27 | 37 | 2897918.00 | ---- | ---- | ---- | 2897918.00 |
| 28 | 39 | 78197296.00 | ---- | ---- | ---- | 78197296.00 |
| 29 | 40 | ---- | 26273174.00 | ---- | ---- | 26273174.00 |
| 30 | 41 | ---- | 12825.00 | ---- | ---- | 12825.00 |
| 31 | 42 | ---- | 201200.00 | ---- | ---- | 201200.00 |



Scanned by CamScanner

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 32 | 43 | 1167158.00 | ---- | ---- | ---- | 1167158.00 |
| 33 | 44 | ---- | ---- | ---- | ---- | 75515000.00 |
| 34 | 45 | 13105488.00 | 1072521.00 | ---- | ---- | 14178009.00 |
| 35 | 48 | 41885.00 | 41885.00 | ---- | ---- | 651022.00 |
| 36 | 49 | ---- | 42278.00 | ---- | ---- | ---- |
| 37 | 50 | ---- | 162813.00 | ---- | ---- | ---- |
| 38 | 51 | ---- | 2935000.00 | ---- | ---- | ---- |
| 39 | 54 | ---- | ---- | ---- | ---- | 82955.00 |
| 40 | 55 | 13791833.00 | ---- | ---- | ---- | 13791833.00 |
| 41 | 56 | 17099181.00 | ---- | ---- | ---- | 17099181.00 |
| 42 | 57 | ---- | 3101250.00 | ---- | ---- | ---- |
| 43 | 66 | ---- | 4500.00 | ---- | ---- | 15200.00 |
| 44 | 67 | 316380.00 | ---- | ---- | ---- | 316380.00 |
| 45 | 69 | 29700.00 | ---- | ---- | ---- | 29700.00 |
| 46 | 70 | 688532.00 | ---- | ---- | ---- | 688532.00 |
| 47 | 71 | 2157060.00 | 52500.00 | ---- | ---- | 2157060.00 |
| 48 | 72 | 136482.00 | ---- | ---- | ---- | 136482.00 |
| 49 | 74 | 58998.00 | ---- | ---- | ---- | ---- |



Scanned by CamScanner

## चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर

### विवरणपत्र क्र. 1 (अ)

### गोषवारा जमाबाजू

रक्कम रुपयात

| अ.क्र. | तपशील | सन 2014-15 वर्षाचे सुधारित अंदाज | सन 2014-15 वर्षाचे प्रत्यक्ष आकडा |
|---|---|---|---|
| | | जमा/खर्च | जमा/खर्च |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | महसुली | 1021265000 | 1073393081 |
| 2 | भांडवली | 600000 | 1984276 |
| 3 | असाधारण ऋण | 93658000 | 99044226 |
| | **एकूण जमा** | **1115523000** | **1174421583** |

(महानगरपालिका, चंद्रपूर यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे वरील तक्ता तयार करण्यात आला आहे)

Scanned by CamScanner

